शनिवार । ३० मे १९८१ । एक रुपया

# माणूस

## सगळेच निघाले....

पृष्ठ ८ (अवतीभवती)



तो नेहमीच
उगवत्याला
सामोरा गेला
मावळत्याला
पाठमोरा झाला
सत्तेच्या सावलीला
सुखानं नांदताना
सत्याचा सल मात्र
हरवून गेला !

ऑक्टोबर १९७७ मध्ये प्रसिद्ध झालेल्या
मा. यशवंतराव चव्हाण यांच्यासंबंधीच्या
'माणूस' कृष्णा-कोयना. विशेषांकातील
कवितेतून....

कवी : अशोक प्रभाकर डांगे

# सप्रेम नमस्कार

■ दि. २५-४-८१ च्या अंकातील 'बुद्धिप्रामाण्यवाद काही गैरसमजुती' हा डॉ. अभ्यंकरांचा लेख वाचला. एका आक्रमक भूमिकेवरून लिहिणारा बुद्धिप्रामाण्यवादी शेवटी 'मला समजून घ्या' या भूमिकेवर यावा याची गंमत वाटली.

डॉ. अभ्यंकर धार्मिक श्रद्धा व गुन्हेगारी प्रवृत्ती यांचा संबंध नाही हे दाखविण्यासाठी आकडेवारी देतात. त्यांनी पंथवार आकडेवारी दिलेली आहे ती देहाताची सजा झालेल्यांची. मला एकच प्रश्न विचारावयाचा आहे की, एकूण धार्मिक श्रद्धा असणाऱ्यांशी गुन्हेगारांचे प्रमाण काय आहे? व ते अल्प असेल तर काय सिद्ध होईल व ते जास्त असेल तर काय सिद्ध होईल? सामाजिक गुन्हे करून ते पचवण्याकरता पूजा-अर्चा करणारे आहेत त्यांच्याविरुद्ध मोहीम उघडा, ते गुन्हे त्यांना पचू देऊ नका व दाखवून द्या की, पूजा-अर्चेने गुन्हे पचत नाहीत— समाजातील मोठा घटक असणाऱ्या सर्वसामान्य माणसाची प्रवृत्ती शुद्ध ठेवण्यास त्याची (मोहिमेची) मदत होईल. सरधोपट धार्मिक श्रद्धांवर हल्ला कशाला? यानेच बुद्धिवादी स्वतःचे हसे करून घेतात. हिंदूधर्म ही एक जीवनपद्धती आहे व ती इतकी Hexible आहे की, बदलत्या काळानुसार ही पद्धती मानणाऱ्यांनी जुन्या पद्धतीचा त्याग करून नव्या पद्धतीही स्वीकारल्या आहेत व हा सतत वाहणारा प्रवाह आहे. हाच बुद्धिप्रामाण्यवाद आहे व ही भारतीय परंपरा आहे. 'बुद्धिप्रामाण्यवादाला भारतीय परंपरा आहे' यात डॉ. अभ्यंकरानी नवीन काय सांगितले आहे?

बुद्धिवाद्यांचा जो मार्ग आहे तो सदोष आहे. हे बुद्धिवादी फक्त आक्षेप घेतात, विधाने करतात; पण ती विधाने सिद्ध करण्याची मेहनत घेत नाहीत. धार्मिक श्रद्धा ह्या अंधश्रद्धा आहेत किंवा फलज्योतिष हे थोताड आहे हे म्हटल्याने (अगदी १९२ विद्वानांच्या परिपत्रकाने) भागत नाही. श्रद्धा किंवा फलज्योतिष विसंगत आहे हे सिद्ध करावे लागते, ती जबाबदारी बुद्धिवादी घेत नाहीत. उदा. श्रद्धा किंवा ईश्वर ही कुणाची तरी अनुभूती आहे, फलज्योतिष हा कुणाचा तरी अनुभव आहे. असा माणूस, बुद्धिवादी 'हे थोताड आहे' म्हणावयास लागला तर त्यावर विश्वास ठेवील का? बुद्धिवाद्यांनी पन्नास-शंभर पत्रिका मांडून 'येथे ज्योतिषाचे नियम लागत नाहीत, म्हणून हे थोतांड आहे' असे सिद्ध करावे. उलट हे बुद्धिवादी फलज्योतिषाचा अनुभव असलेल्या किंवा ईश्वराची अनुभूती असलेल्याला 'हे खरे आहे' हे सिद्ध कर असे सांगतात. त्याची अनुभूती किंवा अनुभव तो कशाला 'सिद्ध' करीत बसेल? एखाद्या ललित लेखकाला-कवीला त्याची अनुभूती तुम्ही सिद्ध करण्यास सांगणार आहात का?

बुद्धिवाद्याचा एक नमुना दाखवतो. माझे एक मित्र (हे स्टेस्टिशिअन आहेत) ज्योतिषाबद्दल आक्षेप घेतात की, व्यक्तीने ज्योतिष विचारणे हा 'रँडम इव्हेंट' आहे का? यावर माझे उत्तर आहे की, ज्योतिष व स्टॅटिस्टिक्सचे अॅक्षमस् वेगवेगळे आहेत, एकाचे दुसऱ्याला लावू नका. हे स्टेटिस्टिशिअन मित्र असताना माझे दुसरे एक इकॉनॉमिस्ट मित्र आले व बोलताना इकॉनॉमिक्सच्या नियमाबद्दल विषय निघाला. त्याबद्दल इकॉनॉमिस्ट मित्र म्हणाले की, 'इकॉनॉमिक लॉज् आर नॉट युनिव्हर्सल' किंवा झाल्या घटना नियमानी स्पष्ट करून सागता येतील; पण उद्या घडणाऱ्या घटना नियमांनीच घडतील असे सांगता येत नाही. तेव्हा माझे स्टॅटिस्टिशिअन मित्र म्हणाले की, 'हे बरोबर नाही. ज्योतिषाप्रमाणे मागे चार घटना घडलेल्या बरोबर आहेत म्हणून उद्या ही घटना घडेल असे सांगता आले पाहिजे.' तेव्हा मला त्याना आठवण करून द्यावी लागली की, 'महाशय, आपण ज्योतिषाला स्टॅटिस्टिक्सचे नियम लावलेत व इकॉनॉमिक्सला ज्योतिषाचे लावत आहात— बहाद्दर आहात' जाता जाता इकॉनॉमिक्स हे शास्त्र आहे, सर्वच social sciences अनुभवसिद्ध आहेत. मग फलज्योतिषच शास्त्र का नसावे?

बुद्धिवादी काही वेळा गैरलागू मुद्दे मांडतात. उदाहरण द्यावयाचे तर डॉ. अभ्यंकरांनी त्यांच्या दि. ३-१-८१ च्या अंकातील 'फलज्योतिष शास्त्र की थोताड' या लेखात डॉ. देव याचा दाखला दिला आहे


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : विसावे

अंक : बावन्नावा

३० मे १९८१

किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४९९

की, ३००० हजार रुग्णांवर पौर्णिमा- अमावास्येचा काहीही परिणाम झालेला दिसला नाही. डॉ. देव याच्या अनुभवाबद्दल शका नाही; पण हे विधान ज्योतिषासाठी डॉ अभ्यंकरांनी वापरले त्याबद्दल आहे. पौर्णिमा-अमावास्येचा परिणाम होण्यासाठी काही संवेदना असणे जरूर आहे म्हणजेच पौर्णिमा अमावास्येचा परिणाम होण्यासाठी ही माणसे मधल्या वेळात नॉर्मल असावी लागतात. नॉर्मल नसलेल्या माणसावर पौर्णिमा-अमावास्येचा कसा परिणाम होणार ? उदाहरण द्यावयाचे तर एखाद्या भारतीयासमोरून (दृष्टी असलेल्या) एखादा गोरा अथवा निग्रो गेला तर ती व्यक्ती भारतीयाच्या दृष्टीचा काही काळ वेध घेईल; पण एखाद्या आंधळ्यासमोरून भारतीय गोरा किंवा निग्रो गेला तर काय परिणाम होणार आहे? कारण त्याला दृष्टी ही संवेदनाच नाही. तेव्हा डॉ अभ्यकरांनी वापरलेले हे उदाहरण ज्योतिषाबाबत गैरलागू आहे, त्याने ज्योतिषशास्त्राबाबत काहीच निष्कर्ष सिद्ध होत नाही.

या बुद्धिवाद्यापेक्षा ज्योतिष अभ्यासू जास्त सशोधक वृत्तीचे आहेत. बदलत्या काळाप्रमाणे 'बाबा वाक्यम्' दुरुस्त झालेली आहेत. डॉ अभ्यकरानी ज्योतिषाचा अभ्यास केला तर त्यानी विचारलेल्या अनेक प्रश्नाना उत्तरे आहेत हे समजून येईल. डॉ. अभ्यकरानी 'गो-स्लो' स्वीकारावे, ते त्यांच्या हितांचे होईल, आजची केविलवाणी अवस्था येणार नाही.

४ मे ८१ श्री. आ. अळवणी
कांदिवली

पुणे वार्ता

# गिरिकन्या नेतृत्व विकास संस्कार

## जिथे शिबिरार्थींनीच ज्ञान दिलं....

महाराष्ट्र राज्य सरकार जी अनेकविध कामं करतं त्या कामापैकी एक चांगलं काम म्हणजे पुण्यातील महाराष्ट्रीय मंडळाने चालविलेल्या चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालय येथे चालू असलेल्या 'गिरिकन्या नेतृत्व शिबिरा'चं नियोजन. अनुसूचित जमातीसाठी अनेक योजना आखल्या जातात व राबविल्याही जातात; परंतु डोंगराळ-दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी कन्यांच्यासाठी पहिल्यांदाच आखलेलं आणि चांगल्या रीतीनं कार्यवाहीत आणलेलं हे शिबीर आहे. आदिवासी कन्यांच्या अंगच्या क्रीडाकौशल्याचा विकास व प्रत्यक्ष कला, छंद, सहजीवन, सहकार्य इत्यादी सहशालेय अनुभव देऊन गुणविशेषाचा विकास असे दोन हेतू यामागे आहेत.

अमरावती, नाशिक, धुळे, रायगड, नांदेड, भंडारा, चंद्रपूर, ठाणे, यवतमाळ या जिल्ह्यामधून मुली आलेल्या आहेत. असे काही भाग आहेत की, जिथं खेचरावरून जावं लागतं. पक्के रस्ते तर राहू द्याच; पण काही ठिकाणी कच्चे रस्ते देखील कमी आहेत. काही भागात पायीच जावं लागतं. त्यामुळं आजूबाजूच्या भागाशी दळणवळण एकंदर कमीच. (तथापि मराठी सिनेमा तिथं पोचलेला आहे.) शिबिरात आलेल्या सर्व मुली शासनाच्या आश्रमशाळामधून शिकणाऱ्या आहेत. शिबिरातल्या मुलीची निवड बहुतेक ठिकाणी शाळेच्या मुख्याध्यापकानी केलेली होती. शिबीर फक्त खेळाचंच आहे, अशीच कित्येक मुलीची समजूत होती. शिबिराची मुदत माहीत नसलेल्याही काही जणी होत्या. सुरुवातीचे काही दिवस इथल्या वातावरणाशी, इथल्या अनेक तऱ्हेच्या कार्यक्रमांशी, इथं वावरणाऱ्या व शिकवायला येणाऱ्या व्यक्तींशी जुळवून घेण्यात गेले आणि नंतर त्या छान रुळल्या किती तरी दिवस त्यांच्याशी काही बोललं किंवा काही विचारलं तर येता-जाता मुरके मारणाऱ्या या कन्या स्टेजवर येऊन गाणे म्हणणे, आभार मानणं अशा गोष्टी धीटपणे करू लागल्या. सुरुवातीला खाली मान घालून वावरणाऱ्या मुली नंतर मोकळेपणानं वावरू लागल्या.

हॉकी, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, हँडबॉल हे खेळ त्याना सर्वस्वी नवीनच होते. हॉकी हे खेळाचं नावही काहींनी पहिल्यादाच ऐकलं होतं. त्यांना आवडणारे म्हणण्यापेक्षा त्याच्या शाळेत खेळले जाणारे खेळ कबड्डी, लंगडी, खो खो असे मर्यादित असल्याने इथ शिकविले जाणारे बॉलगेम्स त्याना विशेष आवडले. आसनांची माहितीसुद्धा त्याना पहिल्यादाच मिळाली. पोहायला तर सर्वांनाच अफाट उत्साह असायचा. इथं येताना छंदवर्गाची कुणालाच कल्पना नव्हती. ओरीगामी, भरतकाम, चित्रकला या गोष्टी त्याना विशेष आवडल्या. चित्रकलेच्या तासाला त्या तासभर रंगात बुडून गेलेल्या असायच्या. परंपरागत स्वस्तिक, पताका, कमळ, कोयरी, बेलबुट्टी असे आकार सहज उमटायचे. हे आकार काढून रंगवताना मुलींना पाहिलं की, याना अतिशय चांगली सौंदर्यदृष्टी आहे अशी जाणीव प्रत्येक वेळी व्हायची. ओरिगामी भरतकाम इ. सुद्धा त्या अतिशय मन लावून करायच्या. एखाद्या विषयातलं त्याचं कुतूहल, ती शिकण्यातली उत्सुकता, प्रत्यक्ष करून पाहायची हौस आणि प्रत्यक्ष जमल्यावर झालेला आनंद हे सगळं पाहताना लक्षात यायचं की, जे जे देऊ, शिकवू ते सगळं हवं आहे, शिकायचं आहे. पुन्हा 'आम्हाला पुन्हा तुम्ही बोलावणार की नाही ?' या प्रश्नातनं हेच जाणवायचं कधी Lettering, कधी पताका, कधी तोरण, कधी रांगोळ्या, कधी मातीच्या गडूवरच रंगकाम या सगळ्या गोष्टी शिकवल्या गेल्या. त्यामुळं रंगाची माध्यमं त्याना समजली, पण त्याहीपेक्षा त्याची कल्पनाशक्ती चांगल्या दर्जाची आहे असं लक्षात आलं. ठिपक्याच्या रांगोळीतनं सर्पाकृती नक्षी तयार झालेली पाहिल्यावर मी थक्कच झाले. याच ठिपक्यांच्या रांगोळीतून हंस, कासव असे प्राणी आकार घ्यायला लागले की, खरच आश्चर्य वाटायचं. कागदाच्या घड्यामधून घड्याळ, चिमणी, टोप्या तयार होतानाच त्याचा आनंद अक्षाच अवर्णनीय असायचा.

या मुलींनी खेळसुद्धा खूप लवकर आत्मसात

केले. तीच गोष्ट गाण्याची. समजावून दिलं की, चाली, ठेका पटकन जमायचा. गाणं म्हणा म्हटलं की, मराठी असो किंवा त्यांच्या आदिवासी भाषेतलं असो, गाणं चटकन ओठावर यायचं. कोळीगीत असो, प्रार्थना असो, त्यांच्या आदिवासी भाषेतलं असो. एका मुलीच्या तोंडून दारु-बंदीचा पोवाडा ऐकल्यावर मी चाटच पडले. पोवाड्याला आवश्यक असा लागलेला खडा आवाज, म्हणण्याची लकब आणि 'जी जी रं जी' म्हणणाऱ्या साथीदार मैत्रिणी पाहिल्यावर यांना चांगली सुराची जाण असल्याचं लक्षात यायचं. वाटायचं सुरांची संगत आवश्यक मानणाऱ्यांच्या या कन्या आहेत. बऱ्याच मुलींच्या कानावर गावच्या देवळात उभं राहिलेलं सप्तखंजरीचं कीर्तन आणि श्रीवारुबाईचं कीर्तन, काही परंपरागत गाणी पडलेली आहेत. गाण्याचं किंवा नृत्याचं नाव निघालं की, साताठ मुली उभ्या रहा-यच्याच. नाचाची पावल इतकी लयबद्ध पडा-यची अन् तीसुद्धा सहज. गाणं आणि नृत्य ही त्यांच्या हाडीमासी खिळलेली प्रवृत्ती असावी. एखाद्या पक्ष्याची घरटं बांधायची प्रवृत्ती जशी मूलभूत असावी तशी. नाचायचं तेही भान विसरून. एकेकटं गाणं, एकेकटं नाचणं माहीतच नसावं बहुधा! आदिवासींना करायला लागणारे कष्ट, अडचणी हे गाण्या-तनंच यायचं! रात्रीचा शेकोटीचा कार्यक्रम अशा नृत्य-गायनानीच भरून गेला होता. कुठलाही आनंदाचा प्रसंग बेभान करणाऱ्या नृत्याशिवाय पूर्णत्वाला जाणारच नाही अशा संस्कारातच जणू त्या वाढलेल्या. शिबिराच्या भरगच्च कार्यक्रमामुळं कितीही दमलं आणि त्यांना जर जाऊन सांगितलं की उद्या आप-ल्याला हे सादर करायचं आहे तर दुसरा दिवस उगवायच्या आधीच ताल-मेळ बस-लेला असायचा. हालचालीसुद्धा सहज आणि लयबद्ध! मनात यायचं की, याबाबतीत आपण शहरी माणसं फार कमी पडतो. गळ्यातनं सर्वांना गाता येईल असं गाणं कुठं उमटतंच नाही. एखाद्या प्रसंगी सर्वांना एकत्र आणणारं एकही गाणं आपल्याला येत नाही. सर्वांना सामावून घेणारं असं नृत्य येत नाही. या सगळ्यापेक्षाही आपल्याला यात कमी-पणा वाटतो. प्रसंगाला शोभेसे शब्द अन् शब्दाच्या संगतीला सूर तर नाहीच नाही. नृत्यासाठी या मुली नटायच्या त्या साध्या. कुरमुरे सुई-दोऱ्यात ओवून केलेल्या जाळ्या डोक्यात माळून. मूठभर चुरमुऱ्यात सुरेख नटणाऱ्या फक्त याच मुली माझ्या पहाण्यात आल्या. मोगऱ्याच्या फुलाच्या जाळीइतक्या किंबहुना त्याहीपेक्षा नाजूक ओवायच्या अन् त्याही थोडक्या वेळात !

शिबिरातला एक दिवस (१० मे) मुलीना पुणे-दर्शन घडवून आणण्यात गेला. पर्वती, शनिवारवाडा, राजा केळकर संग्रहालय, संधिपाद प्राणीसंग्रहालय, आळंदी, आगा-खान पॅलेस, बंडगार्डन इ. ठिकाणं दाख-विण्यात आली. त्यानंतर एक दिवस पुणे स्टेशन आणि राजाबहादूर मिल दाखवली. किती तरी मुलींनी रेल्वे बघितलेली नव्हती. साहजिकच बघण्याची उत्सुकता खूपच होती. दिनांक २३ मे रोजी व्हाइट क्लाउड पेपर मिल व किर्लोस्कर प्रेसला भेट दिली. छपाई कशी होते ही बघण्याची संधी मिळालेली नसल्यानं बऱ्याच मुली छापखान्यातले खिळे जुळवणे, रंगीत छपाई इत्यादी गोष्टी जाणून घ्यायला उत्सुक दिसल्या. या शिबिरात त्यांना हस्तलिखिताची पूर्ण कल्पना देण्यात आली. मुलींनाही ती आवडली. एक-दोन दिवसातच गोष्टी, गाणी, त्यांच्या सहलीची वर्णनं, रांगोळ्या, चित्रं काढलेला एक गठ्ठा समोर आला. प्रत्येकीच्या आश्रमशाळेची माहिती समोर आली. हस्तलिखितं लिहून घ्यायला निरनिराळ्या ठिकाणांना दिलेल्या भेटी उपयुक्त ठरल्या. तसंच त्यांच्याकडून म्हणवून घेतलेली त्यांच्या भाषेतील गाणी याचाही उपयोग झाला. आपण थोडं-फार लिहू शकतो असं त्यांना वाटू लागलं. तसंच आपणच लिहिलेल्या हस्तलिखिताची संपूर्ण सजावट आपल्याला करता येते असंही त्यांच्या लक्षात आलं. आणखी एक नमूद करण्या-सारखी गोष्ट म्हणजे, रोज रात्री आपल्या गेलेल्या दिवसाचं वर्णन त्यांना लिहायला सांगितलं होतं. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला आहे, असं त्यांच्या वह्यावरून लक्षात येईल. ही वही म्हणजे त्यांना स्वत:ला व्यक्त करण्यासाठी दिलेली असावी असं निश्चित लक्षात येईल. थोडक्यात, रोजनिशी लिहिलेली त्यात आढळली. काही काही आवडलेल्या तासांना जे शिकविलं होतं त्याची टिपणं काढलेली आहेत असं लक्षात आलं.

स्वत:ला व्यक्त करण्याची वेळ खूपदा मुलींवर येत असे. जेवणाच्या वेळेला आपल्या आजारी मैत्रिणीचं ताट, घास तोंडात घाला-यच्या आधी नेऊन देण्याची दोन-तीन उदा-हरणं देता येतील. एकच पदार्थ डबल डबल खाणाऱ्यांमध्ये आपल्या वाट्याचं दूध सांडलं असता पुन्हा न घेतल्याचा प्रसंगही अनुभ-वायला मिळाला.

अनेक न बघितलेल्या गोष्टी या शिबिरात त्यांना बघायला मिळाल्या. सारसबागेच्या जवळ म्युनिसिपल ग्राउंडवर भरलेलं औद्यो-गिक प्रदर्शन त्यांना दाखविण्यात आलं. जायंट व्हीलमध्येही त्यांना बसविण्यात आलं. गावच्या जत्रेतल्यापेक्षा ह्या मोठ्या चक्रात बसण्याचा त्यांचा पहिलाच अनुभव होता. चेहेरे अगदी फुलून गेले होते. पेशवे पार्क-मधील किती तरी प्राणी त्यांनी बघितलेले नव्हते. प्रत्येक पिंजऱ्यापाशी जाऊन बघताना डोळे अगदी मोठे झालेले असायचे. त्यांची उत्सुकता ताणलेली दिसली या दिवशी. प्रत्येक भेटीनंतर 'आम्हाला आणखी काय काय दाखविणार ?' असा उत्सुकतापूर्ण प्रश्न हमखास पडलेला दिसायचा व तो ओठा-बाहेरही यायचा आणि मग यांना खूप खूप दाखविलं पाहिजे, हिंडवलं पाहिजे, आणखी काय म्हणतील ते दाखविलं पाहिजे असं वाटायला लागायचं. प्रत्येक क्षणी काही तरी नवीन कळायचं! त्यांना आमच्याकडे ज्ञान घेण्याकरता पाठवलं खरं पण आम्हीही त्यांच्याकडून बरंच काही घेऊ शकू, हे या शिबिराच्या निमित्ताने लक्षात आलं.

—मेधा कुलकर्णी

## बालवाडी शिक्षिकांचं शिबिर

### वि. सा. समितीचा एक यशस्वी उपक्रम

गेल्या रविवारी संध्याकाळी पुण्यातल्या विद्यार्थी साहाय्यक समितीच्या इमारतीत शिरलो त्या वेळी तिथे दोन-तीन कार्यक्रम चालू होते. वरच्या मजल्यावर मुंबईच्या विवेकानंद केंद्राने महिलासाठी आयोजित केलेल्या शिबिराचा समारोपसमारंभ होता, तर तळमजल्यावर ग्रामीण भागातील बाल-वाडी शिक्षिकासाठी विद्यार्थी सहाय्यक

समितीने व्यक्तिमत्त्वविकास शिबीर भरवलं होतं.

हॉलमध्ये गेलो तेव्हा शिबिराच्या संचालिका सौ. निर्मलाताई पुरंदरे शिबिरार्थींची एक छोटीसी नाटिका बसवून घेण्यात गुतल्या होत्या. नाटिकेचा विषयही बालवाडीशीच संबंधित–पालकसभा ! निर्मलाताईंबरोबर श्रीमती पुष्पलता कढे याही नाटिकेतील सवाद-अभिनय यासंबंधी मार्गदर्शन करीत होत्या. शिबिरात सामील झालेल्या शिक्षिका आपापल्या भूमिका उत्स्फूर्तपणे करत होत्या.

हॉलमध्ये एका बाजूला हा सराव चालला असतानाच दुसऱ्या बाजूला काही शिक्षिका शिवणकाम करत होत्या, काहीजणी नीटेड कापडावर भरतकाम करत होत्या. एक-दोघीजणींनी सुदर भरतकाम केलेल्या कापडी पिशव्या पहातापहाता तयार केल्या. समोरच्या कोपऱ्यात शिक्षिकांनीच बनवलेल्या बाहुल्या, खेळणी व कागदाच्या वस्तू होत्या. एकाच हॉलमध्ये हे सर्व उद्योग चालू असूनही कोणाचा कोणाला त्रास होत नव्हता. सारं गुण्यागोविंदानं चालू होतं.

या शिबिराचा उद्देश स्पष्ट करताना निर्मलाताई म्हणाल्या, "ग्रामीण भागातील विखुरलेल्या बालवाडी शिक्षिकामध्ये आपण सर्वजणी एक आहोत, अशी एकत्वाची भावना निर्माण करणं, हा या शिबिरामागचा मुख्य हेतू आहे. त्याचबरोबर शहरात हे शिबीर घेतल्यान विविध विषयामधील तज्ज्ञाशी शिक्षिकाची भेट घडवून आणता येते. काही विचाराची देवाण-घेवाण शक्य होते. शिक्षिकांना सहजीवनाचा अनुभव घेता येतो, त्यातून खूप काही शिकताही येतं.

"मे महिन्याच्या सुट्टीत, बालवाड्या बद असताना शिक्षिका जर निवातपणे आपापल्या घरी जाऊन बसल्या तर या विश्वाशी निर्माण झालेला संपर्क अस्पष्ट होण्याचा, तुटण्याचा धोका असतो. अशा स्वरूपाच्या शिबिरामुळे तो धोका टाळता येतो. उलट शिक्षिकाना आठ-दहा दिवसात बरच काही मिळवता येतं.

"१५ मे पासून सुरू झालेल्या या शिबिरात सुमारे ९० शिक्षिका भाग घेत असून एवढ्या मोठ्या प्रमाणावर होत असलेलं हे पहिलच शिबीर आहे. शिबिरामध्ये योगासनं, समूहगीतं, हस्तकला, चित्रकला, मातीकाम, लहान मुलाचे खेळ, लहान मुलासाठी जादूचे प्रयोग इत्यादी कार्यक्रम आखण्यात आले. कारण आपापल्या बालवाड्यांमधील मुलाना शिकवण्यासाठी, आकर्षित करण्यासाठी हे ज्ञान शिक्षिकांना उपयोगी ठरू शकेल. त्याचबरोबर शिक्षिकाच्या व्यक्तिमत्त्वविकासासाठी बालवाडी कार्यपद्धती, बालमानसशास्त्र, कुटुंबकल्याण व लोकसंख्या, जिल्हा परिषद व समाज कल्याण, महिलाचे प्रश्न, स्त्री-स्वातंत्र्य इत्यादी विषयांवर तज्ज्ञाचे मार्गदर्शन व चर्चा असे कार्यक्रम आयोजित केले. यामध्ये शांता आठवले, शांता ब्रह्मे, उज्वला केळकर, शरद देशपांडे, इंदुताई टिळक, लीला भागवत, विद्या बाळ, श्रीधर राजगुरु, प्रतिभा पराजपे, शकुतला भोपळे, कृष्णाबाई मोटे इत्यादी तज्ज्ञानी मार्गदर्शन केल. हे सर्व कार्यक्रम शिक्षिकाना कितपत उपयुक्त वाटले व त्यामध्ये कोणत्या सुधारणा हव्या आहेत याचा अंदाज घेण्यासाठी आज शिबिराच्या अखेरच्या दिवशी शिक्षिकाकडून मूल्यमापन-पत्रिकाही भरून घेतल्या. त्यामध्ये बहुतेक सर्व कार्यक्रम अतिशय उपयुक्त वाटल्याचे आणि अशा स्वरूपाची शिबिरं जास्तीत जास्त घेण्याच्याच सूचना आल्या आहेत; पण त्या सदर्भात 'तुम्ही हवं तर प्रत्यक्ष शिक्षिकाशीच बोला" अस सागून निर्मलाताईंनी किशोरी उपलेंचवार, कमल निघोजकर आणि सुनीता मिरजकर या तीन शिक्षिकाना बोलावलं.

शिबिरात आणखी काय सुधारणा हव्या आहेत, असं विचारल्यावर श्रीमती उपलेंचवार म्हणाल्या, 'ग्रामीण भागातल्या प्राथमिक शाळामध्ये शिकणाऱ्या मुला-मुलीसाठी अशा प्रकारची शिबिरं तिथल्या शिक्षिकानी आयोजित केली पाहिजेत. ही शिबिरं दोन किंवा तीन दिवसच चालतील, तसच पुण्यासारख्या शहरातील तज्ज्ञमंडळीनाही शिबिरात मार्गदर्शन करण्यासाठी एखादा दिवस नेता येईल. अशा प्रकारच्या शिबिराचा मुख्य फायदा म्हणजे लहानपणापासूनच या मुलावर काही पद्धतशीर संस्कार होऊ लागतील व त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होण्यास मदत होईल.'

आमदाबादला बालवाडी चालवणाऱ्या कमल निघोजकर आपले बालवाडीविषयक अनुभव सागताना म्हणाल्या, 'सुरवातीला बालवाडीतल्या लहान मुलाना घरी जाऊन आणावं लागायचं. स्वच्छतेच्या बाबतीतही त्याच्या पालकाच दुर्लक्षच असायचं; पण आता गेली दोन वर्षं बालवाडी चालू राहिल्यावर गावकऱ्याना बालवाडीचं महत्त्व जाणवायला लागलं आहे. बालवाडीची फीही आता सहजपणं वसूल होते.

'या शिबिरात जे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले त्याचा आम्हाला बालवाडी चालवण्यासाठी निश्चितच उपयोग करता येईल.'

शिरूरपासून चार मैलावरील अन्नापूर इथं बालवाडी चालवणाऱ्या सुनीता मिरजकर आपले अनुभव सागताना म्हणाल्या, 'माझ्या बालवाडीत चाळीस मुलं शिकतात. ही बालवाडी चालवण्यासाठी ग्रामपंचायतीकडून व ग्रामस्थांकडून नेहमीच चागल सहकार्य मिळत. बालवाडी बाधण्यासाठी आता या गावातल्या गावकऱ्यानी वर्गणी काढून सुमारे तीन हजार रुपये गोळा केले आहेत. त्यामुळं बालवाडीची वाटचाल चागल्या तऱ्हेनं चालू आहे, असं म्हणायला हरकत नाही.'

शिबिराचा समारोप २५ मे ला सकाळी पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष बापूसाहेब थिटे याच्या उपस्थितीत सपन्न झाला.

दहा दिवसांच्या एका शिबिराच्या निमित्तानं पुण्यात आलेल्या या शिक्षिका आता पुन्हा आपापल्या भागात जातील तेव्हा त्याच्या कौशल्यामध्ये निश्चितच चागला बदल झालेला असेल. ग्रामीण परिसरात बालवाड्या चालवण्याच काम त्या जास्त प्रभावीपणानं करू शकतील. या सदर्भात श्रीमती किशोरी उपलेंचवार यानी आपल्या डायरीत केलेली नोद फार महत्त्वाची आहे. त्या म्हणतात–

'ज्यांची फक्त दुरून कीर्ती ऐकली होती अशा व्यक्तीच्या व्याख्यानाचा, कलेचा लाभ आम्हाला या शिबिरात निर्मलाताईंमुळे झाला. दोन दिवसात माझी विचार करण्याची दिशाच बदलली. शिबिराला आल्यापासून सारख वाटत–' आपण एका नवीन जगात प्रवेश केला आहे. स्वर्ग स्वर्ग म्हणतात तो इथच असावा !'

ग्रामीण भागात काम करणाऱ्या शिक्षिकेच्या या लिखाणात थोडी अतिशयोक्तीही असेल; पण त्यावरून त्या नेहमी कोणत्या जगात काळ कठत असतील याची मात्र निश्चित कल्पना यते !

–प्रतिनिधी

मुक्ताफळे

# हे मुक्याचे दुःख देवा

तुमच्या एक लक्षात आलं आहे का? पूर्वी म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळात व नंतरच्या काही वर्षांत, नाकेत वर्तमानपत्रांचे गठ्ठे मारून वृत्तपत्रविक्रेते, बातम्या ओरडत रस्त्यातून धावत असत. पहाटे पाच-साडेपाचपासून रस्त्यावर विक्रेते प्रमुख बातमी आरडाओरडा करीत 'ब्रॉडकास्ट' करीत.

'लोकमान्य—नवाकाळ — भाई जयप्रकाश तुरुंगातून पसार-नवाकाळ. नवाकाळ-हजारीबाग तुरुंगातून जयप्रकाश पसार— '

किंवा—

'सकाळ—सकाळ ज्ञानप्रकाश वाचा- कलकत्त्यात भीषण दंगल. हजारो ठार ... सकाळ सकाळ ...'

अशा ललकाऱ्या देत वृत्तपत्रे भल्या पहाटे वाजत गाजत येत. हल्ली विक्रेते वर्तमानपत्रे 'विकत' नाहीत. एक तर ती दाराशी येऊन 'निपचित' पडतात किंवा वाचक ती रस्त्यात वा स्टॉलवर विकत घेतो. वृत्तपत्र खपावे म्हणून ताजी बातमी ओरडून सांगण्याचा काळ आता संपलाच म्हणायचा ! बातमीतले नाट्यच आता संपले आहे. कारण हा 'मघला' नट आता अवाक् झाला आहे. मूळ बातमी काहीही असली तरी ओरडून वर्तमानपत्रे विकणाऱ्याचे कसब ती लोकाना कशी कळवायची यात असे आजच्या बातम्यातली महत्त्वाची बातमी काय,हे तो रस्त्यातून धावणारा मुलगा ठरवीत असे. आता आपण सगळ्याच बातम्यांवरून नजर फिरवतो आणि पाच दहा मिनिटात वर्तमानपत्र शिळे झाल्याचा वास आपल्याला येतो. हल्ली वृत्तपत्रे विक्री करणारी वा वर्तमानपत्र टाकणारी मुले, बातम्या ओरडत का नाहीत, याचे कुतुहल आमच्या मनात निर्माण झाले. ठरवल की; आपल्याकडे वृत्तपत्र टाकणाऱ्या बाबुरावलाच विचारावे.

बाबुराव म्हणजे, बाबुराव सावळाराम शिंदे. सकाळी पेपर टाकणे-विकणे, हा खाजगी कंपनीतील त्याच्या दिवसभराच्या नोकरीचा जोडव्यवसाय. शिक्षण एस. एस. सी. म्हणजे बाबुराव सुशिक्षित आहेत !

'बाबुराव, तुम्ही वर्तमानपत्र विकता पण एखादी महत्त्वाची बातमी—वर्तमानपत्र खपावे म्हणून मोठ्याने ओरडत का नाही ?'

'त्याच काय आहे साहेब, आमचा बाप पण मला हेच विचारतो तो पूर्वी पेपरच विकायचा. तो म्हणतो-सकाळी बातम्या ओरडून घसा सुखायचा आमचा ! तुम्ही का गप गप पेपर विकता ? तुम्ही मला सांगा साहेब- ओरडण्यासारखी बातमी हल्ली असते का ?'

'कमाल आहे बाबुराव, तुमची ! अहो, इतक्या महत्त्वाच्या बातम्या असतात—आता आपले यशवंतराव चव्हाण इंदिरा कॉंग्रेसमध्ये चालले. ही बातमी महत्त्वाची नाही ?'

'आमचा बाप सांगत होता-सुभाषबाबू तुरुंगातून निसटले तेव्हा बाप रस्त्यातून ओरडत होता—सुभाषचंद्र बोस पसार—! आता आम्ही समजा ओरडायचं ठरवलं, तर काय म्हणायचं ?— 'यशवंतराव चव्हाण असं- कॉंग्रेसमधून पसार- सकाळ-सकाळ-यशवंतराव पसार—!' असं ओरडायचं तर ते बरं दिसणार नाही ! खरं म्हणजे असंच ओरडायला हवं-सत्ता मिळण्याचं चिन्ह दिसेना-झाले पसार, पण बातमी कशी आली ? 'चव्हाणांच्या निर्णयात व्यापक देशहित !' खोटं ओरडायचं जिवावर येतं बघा-आणि इतक्या सांस्कृतिक पावळीत गुडाळलेल खोटं ओरडायचं म्हणजे-ते काही खरं नाही !'

'बाबुराव, राजकीय पुढाऱ्याचं सोडा म्हणतो मी, इतर बातम्या असतात की ! धार्मिक-सांस्कृतिक सामाजिक त्या ओरडायला काय हरकत आहे ? आता हेच बघा, 'अरब राष्ट्रे भारतात पैसा ओतून हरिजनाचे मोठ्या प्रमाणावर धर्मांतर करण्याची योजना आखीत आहेत आणि यामुळे केन्द्रीय गृहखाते अस्वस्थ झाले आहे. ही बातमी पत्रात छापून आली. तुम्ही का नाही ओरडला रस्त्यातून— 'हरिजनाचे धर्मांतर, गृहखाते अस्वस्थ !'

'असं कसं म्हणता साहेब! सर्वधर्मसमभाव हाये का नाही ?'

'त्याचा काय सबंध ?'

'वा राव ! आता जर सर्वधर्मसमभाव आहेच तर मग कोणी मुसलमान झाला काय ख्रिस्ताव झाला काय — सर्वधर्मसमभाव पाहिजे का नको ? मग गृहखाते अस्वस्थ झालेच का ? आम्ही म्हणतो, अस्वस्थ होण्याचे कारणच काय ? याचा अर्थ सर्वधर्मसमभाव नाही आहे असा होतो. आता आम्हालाच जर कळत नाही, की सर्वधर्मसमभाव आहे की नाही, तर कळत नाही ते कसं काय रस्त्यातून ओरडायचं ? ते रीतीला धरून होणार नाही साहेब !'

'जाऊ द्या बाबुराव, राजकारण नको, धर्म नको—इतर सांस्कृतिक बातम्या असतात ना ?'

'असतात ना तशा बातम्या! पण खरं सांगू साहेब, हे राजकारणातले बदमाश परवडले. सरळ सरळ ढोंगी, लुच्चे आणि नंबरी स्वार्थी असतात ! बोलतात एक, ठरवतात दुसरेच; पण सांस्कृतिक क्षेत्रातले विचारवंत लबालबा बोलतात; पण दोन सांस्कृतिक पुढाऱ्यांचा काही मेळ आहे का ? आता आपलं ते हे बघा— सरकारने काही पुस्तकांना यंदा बक्षिसे द्यायचे नाकारले ! सरकारने हे करणे बरोबर नाहीच ! आता यावर सगळ्या साहित्यिकाचे एकमत हवे की नको ? आहे का एकमत ? आपले नानासाहेब गोरे—आपण फार मानतो साहेब त्यांना. १५ जानेवारीच्या पेपरमध्ये म्हणाले—

'समितीच्या शिफारशीत हस्तक्षेप करणार नाही असे आश्वासन सरकार देत नाही तोपर्यंत साहित्यिकानी आपली पुस्तके पारितोषिकासाठी सरकारकडे पाठवायची नाहीत, असे ठरवले पाहिजे!'

'म्हणून मग ज्या लेखकाना पारितोषिके मिळाली नाहीत त्याना लोकांनी पैसे जमवून परवा पारितोषिके दिली. तिथे आपले नानासाहेब गोरे व्यासपीठावर बसलेले होते. बरं का— तरी आपले सरदार—

'सरदार ?'

'गं. बा. सरदार हो !'

ते काय म्हणाले समारंभात—

'यापुढील काळात राज्यपुरस्काराची योजना तशीच चालू ठेवण्यास व साहित्यिकांनीही पारितोषिके स्वीकारण्यास काहीच हरकत नाही !'

म्हणजे बघा एक सांस्कृतिक विचारवंत म्हणणार— 'बहिष्कार घाला !' दुसरा म्हणणार— 'पारितोषिके स्वीकारायला काहीच हरकत नाही !' तरी पहिला दुसऱ्याला तिथल्या तिथे विचार नाही, की हे तुम्ही काय बोलता ? आता सांगा आम्ही बातमी म्हणून आज एक बोंबलायचं— उद्या त्याच्या विरुद्ध बोंबलायचं— बरं दिसेल का ?'

बाबुरावाची अडचण आमच्या लक्षात आली. बाबुरावानी ठरवले तरी बातम्याची ललकारी त्याच्या गळ्यातून का बाहेर पडत नाही याचा उलगडा झाला.

सोसवेना सोसता अन्
बोलवेना बोलता
हे मुक्याचे दु.ख आता
कोण आहे जाणता ?

—ग्यानबा

## उत्तरमीमांसा : ७ :

स. शि. भावे

# देशी आधुनिकतेचे नवे प्रबोधन

गेल्या वेळी ( उत्तरमीमासा : ६ : ) नव्या ग्रामीण साहित्यिक चळवळीचा विचार केला. तेव्हा म्हटले होते की, नव्या ग्रामीण प्रबोधनाचा विचार होण्याची आवश्यकता आहे. स्वातंत्र्यानंतरच्या या तिसऱ्या प्रबोधनाचा येथे विचार करू या.

स्वातंत्र्यानंतर येथील बहुजनसमाजाला शासकीय सत्तेचा प्रथम परिचय झाला. या सत्ताजाणिवेतून पहिले प्रबोधन सुरू झाले. खरे म्हणजे गावपातळीवरील सत्ता बहुजनसमाजाला नवी नव्हती. पाटील, देशमुख या वतनांच्या रूपाने मुलकी आणि फौजदारी अशी दुहेरी सत्ता या वर्गाचे हाती पूर्वापार होतीच. स्थानिक स्वराज्यापोटी म्युनिसिपालिटचा व लोकल बोर्डे यात बहुजनसमाजच अधिकारावर होता पण पारतंत्र्यातील ही मेहेरबानीने मिळालेली सत्ता वेगळी आणि स्वातंत्र्यानंतर आलेली पूर्ण शासकीय सत्ता वेगळी होती. हे म्हणजे माडलिकापासून एकदम राजपदी जाणे होते.

या राजपदामुळे पहिले प्रबोधन आवश्यक झाले. राजकीय गुणवत्तेची व ती नसल्यास गुणवत्तेच्या आभासाची गरज निर्माण झाली. मध्यम वर्गाचा आदर्श डोळ्यापुढे असणे या वेळी अपरिहार्यच होते. प्रत्यक्ष नसले तरी अप्रत्यक्षपणे आवश्यक होते. काकासाहेब गाडगीळ व जेधे ही जोडी स्वातंत्र्याच्या आधीची. पण स्वातंत्र्यानंतरच्या, धनंजयराव गाडगीळ-भाऊसाहेब हिरे आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्रीजी-यशवंतरावजी या जोड्याही विचारात घ्याव्यात अशा आहेत.

पण प्रत्यक्ष अनुभवात या आदर्शाच्या मर्यादा ध्यानात येऊ लागल्या. सत्तेसाठी केवळ लायकी पुरत नव्हती. लोकमताची प्रतीक अशी मतपेटी महत्त्व पावली आणि मतपेटीत मते जमा व्हायची तर मतदारांस संतुष्ट राखावयास हवे होते. यासाठी मतदारांना सामाजिक आदर्श पटवून देणे, तो त्यांना पटावा यासाठी त्यांना शहाणे करणे, हा मार्ग योग्य खरा, पण तो लांबचा आणि कष्टाचा होता. दर पाच वर्षांनी व्हावयाच्या निवडणुकीची दंगल त्यासाठी थांबणे शक्यच नव्हते.

बरे, निवडणुकी तरी किती आणि किती प्रकारच्या ? लोकसभा, विधानसभा, जिल्हा परिषद, नगरपरिषद, महानगरपालिका, ग्रामपंचायत, सहकारी सोसायटी, सह पतपेढो, सहकारी साखर कारखाना, सहकारी बोर्ड, मग विधानपरिषद, राज्यसभा, विद्यापीठ विधिसभा, शिवाय पक्षांतर्गत समित्या, पार्लमेंटरी समित्या, आणखी अक्षरशः शेकडो समित्या. काटेकोर हिशेब केला तर आठवड्याला एक निवडणूक असे प्रमाण निश्चितच पडायला हवे.

या प्रत्येक निवडणुकीसाठी वेगवेगळे मतदारसंघ. प्रत्येक मतदारसंघाचे वेगवेगळे हितसंबंध. ते सांभाळले तर मत मिळणार. दुसरा पर्याय म्हणजे मतदार संघ शहाणे करणे. तात्त्पुरत्या हितसंबंधापेक्षा व्यापक समाजहिताकडे पाहून मते देण्यास त्याना शिकविणे. आधी म्हटले तसे हे काम वेळखाऊ. शिवाय जिकिरीचे. एवढी जिकीर कोण करणार ? निवडणुकांची घाई अशी की, श्वास घ्यायलाही फुरसत नाही. ( मग पुढाऱ्याचे हृद्रोग व हाय बी पी. कॉमनच असणार. ) तेव्हा मतदारांना शहाणे करणे, समाजाला शहाणे करणे, हा पर्याय अव्यवहार्य. तो घेताच आला नाही, घेतला गेला नाही.

उरले हितसबंध तात्पुरते. हे हितसंबंध मुख्यतः जातीच्या व्याकरणाने समजण्याजोगे होते. म्हणूनच जातीचे, पोटजातीचे, गावाचे, पंचक्रोशीचे असे वेगवेगळे हितसंबंध ध्यानात ठेवणे, त्यांचा कुठे परस्पर छेद जातो का ते पाहणे, उरलेल्या हितसंबंधाचे पौर्वापर्य (Priority) ठरवून त्याचे संरक्षण करणे—हाच मार्ग त्वरित फलदायी. बहुजनसमाजाने तोच स्वीकारला. या मार्गाची सारी तंत्रे बहुजनसमाज शिकला बहुजनसमाजाचे पहिले सत्तासापेक्ष प्रबोधन फार झपाट्याने पुरे झाले. १९४७ नंतर अवघ्या तेरा वर्षात महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली.त्या वेळी या सत्तासापेक्ष प्रबोधनाचा पहिला वळसा जवळजवळ पूर्ण झाला होता.

या प्रबोधनाचे एक वैशिष्ट्य लक्षात घेण्याजोगे आहे. ते हे की, मध्यम वर्ग देखील आपली जुनी प्रबोधन परंपरा सोडून या नव्या सत्तासापेक्ष प्रबोधनाशी जुळवून घेऊ लागला. बहुसंख्य मध्यम वर्गीय विरोधी पक्षात होते. या सर्व विरोधी पक्षानी, १९५२ मधील निवडणुकातील दणदणीत पराभवानंतर विशेषतः, सत्तारूढ बहुजनसमाजाचे नवे निवडणूक नियंत्रित तंत्र उचलले. '५७, आणि नंतरच्या निवडणुकात, काही अपवाद सोडले तर, विशिष्ट मतदारसंघात विशिष्ट जातीचाच उमेदवार उभा राहू लागला. पक्ष कोणताही असो. जात एकच !

स्वातंत्र्यपूर्व काळातले उदारमतवादी प्रबोधन या नव्या प्रबोधनाने मागे पडले इतकेच नव्हे, ते साफ कोलमडले. निवडणुकांच्या प्रत्यक्ष, किंवा राजकीय क्षेत्राबाहेरदेखील या नव्या प्रबोधनाचा आश्रय घेतला जाऊ लागला. तथाकथित बुद्धिजीवी पंडितानी, अन्य सांस्कृतिक, शैक्षणिक इत्यादी क्षेत्रांतही हे नवे प्रबोधन स्वीकारले. म्हणजे ५५ सालापर्यंत साधारणतः जो आदर्श बहुजन समजासमोर, अस्पष्ट रूपात का होईना होता, तोही संपला. प्रथम नाइलाज म्हणून, मग सवय म्हणून, मग प्रवृत्ती म्हणून, हाच नवीन वाद-आमचे एक ज्येष्ठ मित्र याला 'सोयवाद' असे म्हणतात— स्वीकारला.

अर्थात या सोयवादालाही मर्यादा उमतात किती जणांच्या किती सोयी एका वेळी एकाच नेत्याला पाहता येणार ? यातून गरज म्हणून पुढे आला आश्वासनवाद. आश्वासने द्यावयाची. नव्या निवडणुकीचे वेळी जुनी आश्वासने का पुरी करता आली नाहीत हे सांगायचे आणि जुन्याच्या जोडीला नव्या आश्वासनाची भर घालायची'. यातून चलन-

वाढीसारखी आश्वासनवाढ झाली. आणि आश्वासनपूर्तीमध्येही तुटीचे अर्थकारण सुरू झाले म्हणजे असे झाले की, सर्वच क्षेत्रातले नेतेलोक हुशार झाले, मतलबी झाले, कसबी झाले, पण ही हुशारी, हे कसब देखील उपयोगी पडेनासे झाले.

६२ चे चिनी आक्रमण, ६५ चे पाकिस्तानी युद्ध, ७१ चा बंगलादेशसंग्राम— या साऱ्यांनी आपले आर्थिक पेकाट असे काही मोडलें की ५१ च्या पहिल्या पंचवार्षिक योजनेतले उद्दिष्ट आता स्वप्नातले वाटू लागले. आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक अशा साऱ्या क्षेत्रात आपण ४७ साली होतो तेथेच आहो, हे सत्य लोकसंख्यावाढीने तर विशेषच ध्यानात आले.

६० नंतर बहुजनसमाच्या ज्या पिढीनें उच्च शिक्षण घेतले त्या पिढीच्या लक्षात हा प्रकार आलेला नाही असे नाही. शरदराव पवार हे या पिढीतले आहेत, पण ही कोंडी फोडण्यासाठी नेमके काय करायला हवे हे या पिढीच्या लक्षात आलेले नाही आणि शरदरावांसारख्या ज्या थोड्याच्या हे लक्षात आले आहे, ते थोडेजण सर्वांच्यासमोर हा विचार मांडायला धजावत नाहीत असे दिसते.

बहुजनसमाजाने खऱ्या अर्थाने आधुनिक होणे हाच तो मार्ग. या तिसऱ्या प्रबोधनाची महाराष्ट्रात आज गरज आहे, पण त्या विचाराआधी गेल्या पंधरा वर्षांतील स्वातंत्र्योत्तर दुसऱ्या प्रबोधनाचा थोडक्यात विचार करू. *त्याच्या पार्श्वभूमीवर मग या आगामी* तिसऱ्या प्रबोधनाचा विचार चांगल्या रीतीने आकळेल.

हे दुसरे प्रबोधन म्हणजे दलितांचे नवे प्रबोधन. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भीमप्रयत्नामुळे स्वातंत्र्य मिळाले त्या काळी दलित वर्ग हा मध्यम वर्गीयांखालोखाल आधुनिक झालेला होता. स्वातंत्र्यानंतर त्याला सत्तेत वाटा मात्र त्या मापाने मिळाला नाही मध्यम वर्गाला बरेचसे सांभाळून घ्यावे असे बहुजनसमाजाचे सुरुवातीचे धोरण होते. तसेही दलिताबाबत नव्हते. मध्यम वर्गीयानीही दलितांना जवळीक दाखविलेली नव्हती. परिणामी, त्या वेळच्या दलित नेत्यानी मध्यम वर्गीयांचा आणि बहुजनसमाजाचा सोयवाद स्वीकारला. यामुळे दलित अनुयायी मात्र आपल्या जुन्य नेतृत्वापासून वेगळे झाले. घटनेतील तरतुदीप्रमाणे सवलती नसत्या तर दलित हे आज दिसताहेत तितकेही एकत्र राहिले नसते. त्याच्या अनेक फळ्या झाल्या असत्या.

या तुटून पडलेल्या दलित अनुयायांना खऱ्या बुद्धिवादी आधुनिकतेखेरीज पर्यायच नव्हता. बहुजनसमाजाची बहुसंख्या त्याचेजवळ नव्हती. मध्यम वर्गीयाचे पारंपरिक मोठेपण नव्हते. असे काही डबोले जवळ असल्याखेरीज सोयवादही चालत नसतो. अशा कोंडीतून बाहेर पडण्यासाठी दलिताना आणि एकूणच समाजाला, खऱ्या अर्थाने आधुनिक होण्याखेरीज दुसरा उपाय नाही, अशा खात्रीने त्या वेळच्या दलित विचारवंतानी नवे प्रबोधन मांडले हे दुसरे प्रबोधन.

अण्णाभाऊ साठे, अमर शेख यानी या प्रबोधनाची बीजें स्वातंत्र्य आले त्या काळीच रोवून ठेवली होती स्वातंत्र्यानंतरची, मराठी समाजाला उपकारक अशी खरी क्रांतिकारक भूमिका त्यांनी आपल्या कथा-काव्यात मांडलेली होती. मध्ययुगीन मूल्यांत आणि वातावरणात संपूर्ण क्रांती झाल्याखेरीज या समाजातील कोणत्याही एका घटकाची समस्या सुटणार नाही, हा या दोघांचा उद्घोष होता. मध्यम वर्गातले शरश्चन्द्र मुक्तिबोध आणि विंदा करंदीकर यांनी हाच उद्घोष आपल्या काव्यात केला होता.

बाबुराव बागूल, नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ, राजा ढाले यांची मूळ भूमिका अशी संपूर्ण क्रांतीची भूमिका होती. नंतर नंतर त्यांच्यात व्यक्तिसापेक्षता आली. त्यांच्या नव्या विचारांची मोठी चळवळ होऊ शकली नाही. त्यांची आपसातील फूट या चळवळीला भोवली. हे सारे खरे. हेही खरे की, दलितेतर क्रांतिविरोधी प्रेरणानी ही फूट पडावी आणि वाढावी म्हणून सूक्ष्म प्रयत्न केले. परिणामी, यांच्या विचारात आणि बंडात जी स्फोटक ताकद होती तिची स्फोटकता विकसित रूपाने प्रकट झालीच नाही.

मात्र यांच्या प्रयत्नाची दिशा योग्य होती. ते साहित्य लिहीत होते; पण त्यांची प्रेरणा केवळ साहित्य क्षेत्रात क्रांती करण्याची नव्हती. सर्वच समाजापुढे त्यांना नवीन भूमिका मांडायची होती. सर्व समाजाला परखडपणे वास्तव प्रश्न विचारायचे होते. 'भारतीय स्वातंत्र्य आम्ही आमचे स्वातंत्र्य का मानायचे ?' 'आम्हाला या भारतीय समाजाशी एकजीवपणा का वाटावा ?' असे त्यांचे प्रश्न समाजधुरीणाना फार लागले. या प्रश्नांवरून ढाले इत्यादी मंडळीना समाजधुरीणानी 'देशविरोधी' वगैरेही म्हटले.

पण गेल्या पंधरा-अठरा वर्षांत या प्रश्नाची योग्य उत्तरे मिळू शकली का ? या प्रश्नाचे उत्तर नकारार्थीच द्यावे लागेल. मराठी समाज तिभंगणाऱ्या, चौभंगणाऱ्या दऱ्या कायमच आहेत याची खंत अजूनही, ज्याना या दऱ्यांमुळे झळ पोचत नाही अशा, समाजधुरीणांना वाटत नाही. मराठवाड्यातील नामातरविरोधी दंगलीनी समाजाला थोडी जाग आल्यासारखी वाटली; पण थोडीशी कुरकूर करून धुरीणसमाज पुन्हा झोपी गेलेला दिसतो.

तुम्हाला असा उपरेपणा का वाटतो, असा प्रश्न या दलिताना नेहमी विचारला जातो; पण हा उपरेपणा दूर करण्याची कसलीही विधायक योजना वरिष्ठ समाजाजवळ आज नाही. बुद्धिमान विद्यार्थी परदेशी जातात, परदेशीच राहतात, म्हणून आम्ही खंतावतो. फार आपुलकीने म्हणतो, 'अहो, त्यांना इथे राहावेसे वाटेल असे अनुकूल वातावरण तयार केले पाहिजे. त्याशिवाय भारतातच राहावे असे त्याना कसे बरे वाटेल ?'

परदेशी जाणाऱ्या व राहणाऱ्या, ज्यांच्यावर दरडोई लाखो रुपये समाजाने शिक्षणासाठी खर्च केलेले असतात, अशा या *विद्यार्थ्यांसंबंधी वरिष्ठ समाजाची भाषा* अशी आपुलकीची, लाडाची असते; पण पूर्वपरंपरेने जे 'उपरेपण' भोगीत आहेत, त्यांना तो उपरेपणा टोचला-जाणवला तर मात्र त्यांना असा उपरेपणा जाणवावा हाच अपराध ठरतो.

दया पवार, यशवंत मनोहर, अरुण कावळे, लक्ष्मण माने, माधव कोंडविलकर यांच्यासारख्या नव्या बंडखोराना सध्याच्या समाजात ही कुरूपता, जी मूलभूत अनैतिकता जाणवते आहे तिचे मूळ वरिष्ठ समाजाच्या या सोयवादात आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातले, फुले-आगरकराचे आणि विठ्ठल रामजी शिंदेशाहू महाराजाचे किंवा माटे-आंबेडकरांचे प्रबोधनच जर पुढे चालू राहिले असते तर या नव्या दलिताना, स्वातंत्र्यानतर पचवीस--

तीस वर्षे होऊन गेल्यानंतर, या नव्या प्रबोधनाची हाक द्यावीच लागली नसती; परंतु स्वातंत्र्यानंतर जे पहिले (कृतक) प्रबोधन झाले त्यामुळे हे दुसरे प्रबोधन त्यांना सुरू करावे लागले आहे आणि सुर्वे, ढसाळ, ढाले आज मागे पडल्यासारखे झाले असले तरी या नव्यांमागे त्यांचीच प्रेरणा आहे यात शंका नाही.

इथे आपण तिसऱ्या प्रबोधनाशी येऊन ठेपतो. हे तिसरे प्रबोधन म्हणजे मराठी समाजाचे नवे प्रबोधन! हे तिसरे प्रबोधन झाल्याखेरीज दलितांचे प्रबोधन यशस्वी होणार नाही.

दलित अल्पसंख्य आहेत, अगदी प्रत्येक खेड्यात अल्पसंख्य आहेत, ही गोष्ट हवी त्या प्रमाणात लक्षात घेतली जात नाही. या वस्तुस्थितीकडे सामान्यपणे तसे दुर्लक्ष करण्यात येते. ते अल्पसंख्य असल्याने त्यांचा लढा त्यांच्या एकट्याच्या बळावर यशस्वी होणार नाही. सर्व समाजाने, विशेषतः सवर्ण समाजाने, दलितांचा लढा यशस्वी करण्याची आज आवश्यकता आहे.

असे करण्यात दलितांवर एखादा मोठा उपकार होत नाही हे सवर्ण समाजाने लक्षात घेतले पाहिजे. दलितांच्या मुक्तीची चळवळ ही सवर्ण भारतीय समाजाच्या मुक्तीची चळवळ आहे, हे लक्षात घेतले गेले पाहिजे. दलित दलित आहेत ते आपला सारा समाज सांस्कृतिक दृष्टीने मागासलेला आहे म्हणून, हे सत्य ध्यानात येण्याची आज खरी गरज आहे. हा मागासलेपणा गेला नाही तर जसा दलितांचा दलितपणा जाणार नाही, तसा एकूण समाजालाच आधुनिक शास्त्र-तंत्र-ज्ञानाचा लाभ घेता येणार नाही, की आधुनिक जागतिक प्रगतीत वाटेकरी होता येणार नाही.

मागासलेपणा दूर करण्याची ही चळवळ ग्रामीण भागातील सुशिक्षित तरुणच करू शकेल. कारण तो नव्या शिक्षणामुळे आधुनिक तर होतोच आहे, पण त्याचे देशीपणही अजून कायम आहे.

तथाकथित आधुनिक मध्यम वर्गाकडून मात्र हे काम होणारे नाही. दलितांना उपरे म्हटले जाते. पण हा नवा मध्यम वर्गच मराठीपणाला खरा उपरा झाला आहे. हा वर्ग मराठी-देशीपणापेक्षा इंग्रजीपणाला मानतो आहे. मुलांना इंग्रजी माध्यमाचा आणि इंग्रजी वळणाच्या संस्थांत शिकवतो आहे. मराठी भारतीय समाजाची सुख-दुःखे, उत्सव-समारंभ यांत या वर्गाला आपलेपणा वाटत नाही. निवडणुकीत मतदान करावेसे वाटत नाही. आपली मुले परदेशी स्थानिक व्हावीत आणि निवृत्तीनंतर आपणही तेथेच जाऊन राहावे असे यांचे स्वप्न असते.

जसे मन तशी भाषा. म्हणूनच हा वर्ग भारताला 'इंडिया' म्हणतो. चीनला 'चायना' म्हणतो. मुंबईला 'बॉम्बे' म्हणतो. पत्नीची ओळख चक्क 'आमच्या वाइफ' किंवा 'आमच्या मिसेस' अशी करून देतो.

'आंतरराष्ट्रीय नागरिकवृत्ती' असे नाव या साऱ्या तपशीलाला दिले जाते. 'आधुनिकता' असेही नाव दिले जाते. पण अंतःकरण आणि बुद्धी तपासली तर हा वर्ग खऱ्या अर्थाने आधुनिक नाही, हे सहज लक्षात येते. साईबाबा, सत्यसाईबाबा, रजनीश अशांसारख्या कुणाकडे तरी आपली सारी जबाबदारी सोपवून ते 'सत्यसंगा'त दंग झालेले दिसतात.

या समाजाकडून 'आधुनिक, पण देशी' या नव्या प्रबोधनाची स्फूर्ती मिळणार नाही. खेडोपाडी गेल्या वीस वर्षांत बहुसंख्य तरुण पदवीधर झालेले आहेत. होत आहेत. बिन-इस्त्रीचा, धुवट लेंगा-सदरा घालून, वडिलांना शेतीत मदत करून, घरची सारी उसाभर करून, रोज दोन-तीन मैल चालत जाऊन-येऊन ज्यांनी कॉलेजाचे शिक्षण केले असे हजारो बहुजनसमाजीय तरुण आज खेड्यात आहेत. हे तरुण शाळेत, महाविद्यालयात शिकवतात. काही शेती करतात. काही बेकारही आहेत. सध्या यातले कितीतरीजण कथा कविता-नाटक लिहून आपली नवी अस्मिता व्यक्त करीत आहेत.

'देशी आधुनिकते'चे नवे प्रबोधन आता या तरुणांकरवी साकार होणार आहे.

हे प्रबोधन कसकसे साकार होईल, त्याच्या देशीपणामुळे ते साऱ्याच समाजाला कसे कवेत घेईल हे सांगायचे आहे, पण तो वेगळचा 'उत्तरमीमांसे'चा विषय आहे.

आज इतकेच सांगायचे आहे की, या प्रबोधनाची चाहूल लागली आहे आणि पहिली पावले पडू लागली आहेत. तेव्हा निराश होण्याचे काही कारण नाही.

भारताला पूर्ण देशी आधुनिकता प्राप्त झाली आहे, असा तो उज्ज्वल क्षण केव्हा येईल बरे? चुकत-माकत, चाचपडत, पण असा क्षण आणखी शंभर वर्षांनी नक्कीच येईल! तोवर आपल्या पाच-सहा पिढ्या खपलेल्या असतील, पण सन २१०० सालचा तो ऐतिहासिक समालोचक मात्र म्हणेल... 'दीड-दोन हजार वर्षांचा मागासलेपणा टाकून भारत अवघ्या दीडशे वर्षांत आधुनिक झाला!' □


सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही. —डॉ. य. दि. फडके

# महाडचा मुक्तिसंग्राम

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर / प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये. राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

अवतीभवती । शरद कृष्णन्

# शरदरावांचाही निर्णय झालेला आहे...मग नाटक कशाला ?

अपघाताच्या, बलात्काराच्या व वाढत्या महागाईच्या बातम्या वाचून लोक तसे कंटाळले होते. बऱ्याच दिवसांत तशी चमचमीत बातमी नव्हती आणि अचानक बातमी सुटली की, अरस काँग्रेसचे ज्येष्ठ नेते खासदार यशवंतराव चव्हाण इंदिरा काँग्रेसमध्ये जाणार ! आणि या बातमीपाठोपाठ पूरक बातम्यांचे पेव फुटले. शरद पवार काय करणार ? यशवंतरावांबरोबर अन्य कोण कोण जाणार ? इंदिरा काँग्रेसमध्ये गेल्यावर चव्हाणांचे काय होणार ? आणि चव्हाणांसारखा शक्तिशाली नेता जागचा हालल्यावर अरस काँग्रेसचे काय होणार ? प्रश्नांच्या या भेंडोळ्यांवर वर्तमानपत्रांच्या पहिल्या पानावर उत्तरे दिली जाऊ लागली. चव्हाणांचे इंदिरा सेवेत रुजू होणे हा जणू काही जीवन-मरणाचा प्रश्न आहे असे भासवून 'केसरी'चे संपादक स्वत च्या नावाने पहिल्या पानावर याच विषयावर जवळजवळ आठवडाभर उतारी करत होते. बातम्या जरी चवीने वाचल्या जात होत्या, तरी अशा बातम्यांना पूर्वी जो एक थरार असे, तो मात्र आता कुठे अनुभवास येत नव्हता. राजकारणाची खेळी खेळणारी मंडळी सोडली, तर जातोय ना बापडा, जाऊ द्या ! अशीच सर्वसाधारण मंडळींची प्रतिक्रिया होती. किंबहुना एखादी अपेक्षित गोष्ट घडावी अशा पद्धतीच्याच प्रतिक्रिया उमटत होत्या.

यशवंतरावांचा पिंडच असा आहे की सत्तेशिवाय त्यांचे चालू शकत नाही. राष्ट्रीय पातळीवरील नेतृत्वाच्या टक्करीत आपण पदरी हार घेतली आहे, हे त्यांना उमगले आहे. इंदिराजींशी आपण टक्कर घेऊ शकत नाही हे लक्षात आल्यावर चव्हाण तसे नरमच पडले होते. कागदापत्रांची चळत रचून आपली काँग्रेस खरी असा आरडाओरडा करण्यात काही मतलब नाही, हेही त्यांना उमगले. कारण काँग्रेस म्हटल्यावर लोक निर्विवादपणे इंदिराजींमागे धावतात हे निवडणुकीच्या निकालावरून वादातीतरीत्या सिद्ध झाले होते. मोठा आव आणून देवराज अरस टक्कर द्यायला उभे राहिले आणि बाईंनी त्यांना कर्नाटकात अक्षरशः माती चारली ! ८० सालच्या लोकसभा निवडणूक-निकालानंतर ज्या महाराष्ट्रातून चव्हाणांनी शक्ती संपादन केली होती, त्या महाराष्ट्रातून चार-दोन माणसेही त्यांना निवडून आणता आली नाहीत ! विधानसभा निवडणुकीत थोडे-फार यश पदरी आले तरी दिलासा वाटावा असे फारसे काही त्यात नव्हते. चव्हाणांसमोर ज्यांची नजर उचलण्याची हिंमत नव्हती असे नेते त्यांच्याबद्दल वाटेल ते वेडेवाकडे बोलू लागले. महाराष्ट्राचे कायदामंत्री श्री. भोसले यांनी तर सध्या मिळेल त्या व्यासपीठावरून चव्हाणांची खरड काढण्यास प्रारंभ केला आहे. वसंतदादा किंवा प्रेमलाताई चव्हाणांबद्दल थोडे-फार आपुलकीने बोलतात, ते केवळ त्यांचे राजकारण सोयीचे व्हावे म्हणून. सत्ताधारी पक्षात असूनही ही मंडळी सध्या कोंडी झालेल्या अवस्थेत आहेत. चव्हाण इंदिरा काँग्रेसमध्ये आल्यावर काही तोड निघाली तर ती त्यांना हवी आहे म्हणून तर सध्या ते चव्हाणांना अंजारत-गोंजारत आहेत इतकेच.

इंदिरा काँग्रेसमध्ये जाणे म्हणजे हात बांधून दरबारात हजर होणे हे निश्चित माहीत असूनही इंदिरा काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याचा निश्चय चव्हाणांनी का केला असावा ? चव्हाणांमागे महाराष्ट्रात थोडी-फार शक्ती असली तरी त्यांची प्रतिमा पूर्ण डागाळलेली आहे. काळजीवाहू चरणसिंग सरकारमध्ये उपपंतप्रधानपद मिळावे म्हणून त्यांनी जी धावाधाव केली ती लोक विसरलेले नाहीत. सत्तेवरून फेकले जाऊनही अटलजींसारख्या नेत्याला किंवा मधु दंडवते यांच्यासारख्या नेत्याला जे तेज आहे ते तेज चव्हाणांना उरलेले नाही ! 'सधिसाधू' हा शिक्का त्यांच्यावर फार पूर्वीपासून बसलेला आहे. विरोधी पक्षाशी चव्हाणांचे सूत जमू शकत नाही. आज तरी विरोधी पक्षामध्ये शक्तिशाली पक्ष फक्त डावे कम्युनिस्ट, भाजप आणि काही प्रमाणात लोकदल. या तिघांशीही चव्हाणांची कुंडली जमण्यासारखी नाही. केवळ महाराष्ट्रापुरता विचार करायचा झाला तर प्रादेशिक पातळीवरही त्यांचा प्रभाव राहिलेला नाही. तेव्हा उगाच घालमेल करत आयुष्य घालवण्यापेक्षा सरळ दरबारात रुजू होणे चांगले; असा हा साधा, सरळ निर्णय आहे. आता या निर्णयाला चव्हाण जो मुलामा चढवतात तो साफ खोटा आहे. देश संकटात आहे, तेव्हा इंदिराजींचे हात बळकट केले पाहिजेत, यासारखे ते जे बोलतात त्याला काडीचा अर्थ नाही. इंदिराजींच्या कार्यपद्धतीत काहीही बदल झालेला नाही. एक नेता पकडून त्याच्या इच्छेनुसार कारभार चालवला जाण्याची परंपरा रुजली गेली आहे. जवाहरलालजींचा दृष्टिकोन थोडा विशाल असेल, पण नेते ते एकटेच होते ! इंदिराजी आल्या आणि भल्याभल्यांची वाट लावून त्यांनी आपले नेतृत्व प्रस्थापित केले. सामूहिक नेतृत्वाची कल्पना गोड असली तरी प्रत्यक्षात ती कधी रुजू शकली नाही. अरस काँग्रेसमध्ये तसा प्रयत्न झाला; त्याचे तीन तेरा वाजले. जनता शासन असताना एकाच पातळीवर तीन नेते उभे करण्याचा प्रयत्न झाला. एक पंतप्रधान आणि दोन उपपंतप्रधान हेरून झाले. उपपंतप्रधानातही क्रमवारी लागली आणि इतके करूनही सरकार गडगडले ! हे काही खरे नाही, हे जनतेला पटले. निवडणुकीच्या निमित्ताने बाबूजी का इंदिराजी असा सरळ सवाल विचारण्यात आला आणि जनतेने पुष्कळ झाले, इंदिराजीच बऱ्या ! असे म्हणून

सत्ता त्यांच्या हाती सुपूर्त केली. एकखांबी नेतृत्वाची ही परंपरा चव्हाणानी महाराष्ट्रातही चालवली होती अत्यंत महत्त्वाच्या अशा रेड्डी विरुद्ध गिरी या राष्ट्रपति निवडणुकीच्या वेळी त्याच्या एका इशाऱ्याबरोबर मराठी मताची सगळी चळत रेड्डीच्या पदरात पडली. त्या वेळी चव्हाणानी गिरीच्या बाजूने हात वर केला असता तर मतांची हीच चळत गिरीच्या पदरात पडली असती. चव्हाण महाराष्ट्रात असेपर्यंत त्याच्याशी टक्कर देईल असा नेता उभा रहाणार नाही याची दक्षता त्यानी घेतली. ते दिल्लीत गेल्यावर महाराष्ट्र म्हणजे चव्हाण असे दिल्लीकराना वाटले पाहिजे, एवढे सामर्थ्य त्यानी तेथे पैदा केले. महाराष्ट्राचे राजकारण त्याच्या मर्जीनें हालले आणि नजर उचलताच हात जोडून समोर उभे राहातील असे कन्नमवार आणि वसंतराव नाइकासारखे मुख्यमंत्री त्यांनी महाराष्ट्राच्या गादीवर बसवले. या त्याच्या वागण्यात कुठे लोकशाही होती? सारी पक्षीय आणि शासकीय यंत्रणा त्यानी अशा पद्धतीने बांधली होती की, त्याच्या मर्जी-शिवाय एकही गोष्ट घडू नये! चव्हाण संपवायचे असतील तर त्यांना महाराष्ट्रातून हुसकले पाहिजे हे इंदिराजीनी हेरले; पण किती तरी वर्षे चव्हाणाना डावलून त्यांच्या चरणी सेवा रुजू करणारा नेता त्याना मिळत नव्हता आणि मिळणार तरी कसा? साहेबाची पुण्याईच तशी ब्रक्कळ होती; पण पुढे बाईंच्या कर्तृत्वाचे तेज फाकल्यावर आणि चव्हाणाचे सद्दीचे दिवस संपल्यावर बाईंनी त्यांना त्याची जागा दाखवून दिली केवळ याच हट्टापायी, पोरखेळ करावा तशी त्याची खाती बदलली; पण चव्हाण बैठक जमवून राहिले. कॉंग्रेसच्या शक्तिशाली हत्तीचे कौतुक करत निवडणुकांना सामोरे गेले. आणीबाणीनंतर जनता सरकार सत्तेवर आल्यावर चव्हाणाच्या राजकारणाने वेगळे वळण घेतले. मोरारजी पंतप्रधान असताना इंदिराजी त्यांच्याबद्दल काही तरी वेडेवाकडे बोलल्या तेव्हा उपहासाने यशवंत-राव म्हणाले, 'या बाई अजूनही स्वत ला देशाच्या पंतप्रधान समजत नाहीत हे भाग्य समजले पाहिजे!' देशामधील राजकारणाने कोण-तेही वळण घेतले तरी इंदिराजीच्या पदरात इतकी बदनामी झाली आहे की त्या पुन्हा सत्तेवर येतील असे त्यांना जराही वाटत नव्हते. 'इंदिराजी कोणत्याही परिस्थितीत पुन्हा सत्तेवर येणार नाहीत ही काळ्या दगडावरची रेघ आहे' असे विधानही त्यांनी या संदर्भात केले होते. इंदिराजी येणार नाहीतच असा आडाखा बांधूनच त्यानी पुढचे राजकारण केले. व्यक्तिगत महत्त्वाकांक्षेने पुन्हा उभारी घेतली आणि चौधरी चरणसिंगाच्या मंत्रिमंडळामध्ये हे उपपंतप्रधान म्हणून दाखल झाले! ते विनबुडाचे मंत्रिमंडळ बघताबघता कोमळले आणि मातीत बसलेल्या बाई पुन्हा सत्तास्थानी आल्या. त्यानंतरही उभारी घेण्याचे प्रयत्न चव्हाणानी केले; पण जनतेचे पाठबळ मिळू शकले नाही. वसंतदादा सारा पक्ष इंदिराजींच्या दावणीला नेऊन बांधतील असा धाक वाटल्यावर त्यानी महाराष्ट्राला त्या वेळेपर्यंत अपरिचित असलेले फाटाफुटीचे राजकारणही खेळून पाहिले. शरद पवार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. प्रथम इंदिराजीनी आणलेल्या शंकररावांची हकाल-पट्टी करून चव्हाणांनी पहिला सूड उगवला आणि पुढे वसंतदादांना माती चारून शरदरावाना सत्तेवर आणले. वसंतदादाना उचलण्याचे सारे राजकारण शरदरावाचे होते असे सध्या जे भासवले जाते त्याला तसा काही अर्थ नाही जे झाले ते साहेबांच्या मर्जीने आणि त्यांच्या सल्ल्यानेच! आता हे संदर्भ त्याना गैरसोयीचे आहेत म्हणून केवळ शरदरावांचे नाव पुढे करण्यात काही मतलब नाही.

इंदिराजी सत्तेवर आल्यापासून त्यांच्या बाबतीत चव्हाणांचे धोरण तसे नरमच होते; पण तसे असले तरी त्यांच्याबद्दल भलत्या अपेक्षा ठेवून त्याना त्यांच्या ताकदीपेक्षा मोठे समजणाऱ्या मित्र-मंडळींना आणि पत्रकाराना चव्हाण पुन्हा इंदिरासेवेत रुजू होतील असे मात्र वाटले नव्हते. चव्हाणांचे धोरण नरम असले तरी संजय असेपर्यंत त्यांचाही तसा विचार नसावा. त्याच्या अपघाती निधना-नंतर परिस्थितीमध्ये आणखी बदल पडला. राजीव गांधी क्षितिजा-वर उगवल्यावर परिस्थिती आणखी निवळली. आपण जायचे ठरवले तर आपले स्वागत कसे होईल याची चाचपणी त्यानी सुरू केली. राजीव प्रत्यक्षात आज तसा कोणी नसेलही; पण आतून तो मम्मीला मदत करतो हे काही तसे गुपित नव्हते. आतून मदत करण्याच्या या प्रकारातच त्याने अनेकांशी संपर्क साधला. अनेकांनी अगदी शरद पवारासह सर्वांनी त्याच्याशी संपर्क साधला; काही जुनी-जाणती मंडळी, झाले गेले विसरून जर पुन्हा परत आली तर ती हवी आहेत हे लक्षात आल्यावर चव्हाणाच्या हालचाली सुरू झाल्या. बाबुजीही काही स्वस्थ नव्हते अरस कॉंग्रेसच्या अध्यक्षपदाच्या खुर्चीवर नजर लावून मागल्या बाजूने तेही इंदिरा कॉंग्रेसशी संपर्क साधून होतेच. काही जुन्या मंडळींना प्रवेश द्यायचे नक्की झाल्यावर याद्या बनवल्या गेल्या हा प्रवेश तसा काही सरसकट नाही. जे आले त्याचे स्वागत होईल अशाच्या यादीत चव्हाणाचे नाव अग्रस्थानी होते; त्यांच्याशी संपर्क साधून त्याना याची जाणीव दिली गेली- खेरीज, सिद्धार्थ शंकर रे, स्वर्णसिंग, बी. आर भगत, के. सी. पंत, प्रियरंजनदास मुन्शी या नावाबाबत अनुकूल प्रतिक्रिया होती, तर जगजीवनराम, देवराज अर्स, जे के. बरुआ, रजनी पटेल, डॉ. करणसिंग यांच्या-बाबतचा दृष्टिकोण ताठर होता आणि आहे. एकाधिकारशाहीबद्दल आपण जे काही बोललो ते सारे विसरून यशवंतराव इंदिरा कॉंग्रेस-कडे निघाले आणि त्याचा हा प्रवास विजनवासी कॉंग्रेसकडून सत्ता-धारी कॉंग्रेसकडे असला तरी ते जे करू पहात आहेत ते पक्षांतर नसले तरी मतांतर जरूर आहे आणि जितक्या निर्लज्जपणाने ते हे मतांतर करू पहात आहेत त्याच पद्धतीने ते करावे लागते. विचार-विनिमय करून ठरवण्यासारखी ही गोष्ट नव्हे. आता ते निघाल्यावर त्याचे गणगोत त्याच्यापाठी येतील. शरदरावही काही वेगळे करतील असे नाही. टू बी ऑर नॉट टू बीचे नाटक चालवले असले तरी त्याच्या-सह सर्वांचा निर्णय झालेलाच आहे त्याच्या अंमलबजावणीचा वेगही इतकी ओढ घेणारा आहे की, हा मजकूर प्रसिद्ध होईपर्यंत साहेब पुन्हा एकदा बे एके बे चा पाढा गिरवायला संरक्षणमंत्रीपदी विराज-मान झाले नसतील असे नाही अमेथी दौऱ्याची आखणी करून व हि-लेल्या निष्ठा वादातीत असल्याचे सिद्ध करण्यासही ते उत्सुक अस-तील आपल्या तोला-मोलाला साजेल, मानवेल असे आणि इतपत स्वागत होत आहे याची खातरजमा करून घेऊन चव्हाण इंदिराजीं-कडे चालले असले तरी बहुगुणाचे ढळढळीत उदाहरण समोर अस-ल्याने नेमके काय होईल याबाबत थोडा-फार संदेह जरूर असेल, परंतु एवढा धोका पत्करल्याखेरीज पल्ला कापून पैलतीरावर जाणे

शक्य नाही, हे माहीत असल्याने त्यांनी काय व्हायचे ते आता तिथे होऊ दे, असे ठरवूनच आपले चंबूगबाळे आवरले आहे.

इंदिराजी, राजीव आणि अन्य जबाबदार मंडळी यशवंतरावांचे आणि अन्य काही मंडळींचे स्वागत करण्यास निघाली आहेत त्याला कारणेही तशीच आहेत. केवळ निष्ठावंतांचा मेळावा भोवती जमवून राष्ट्राचा कारभार हाकता येत नाही, याची जाणीव सत्ताधाऱ्यांना झाली आहे. गुणवत्ता नावाची चीज आहे आणि त्याची कदर झाली तरच शासनाची प्रतिमा थोडीफार उजळू शकेल, हे जाणवल्यावर प्रदीर्घ प्रशासकीय अनुभव असलेला चव्हाणांसारखा नेता इंदिराजींचे नेतृत्व निमूट मानून जर सेवेत रुजू होत असेल तर तो सत्ताधारी पक्षाला हवाच आहे. आज गुणवंत मंडळींची सत्ताधारी पक्षाला खरोखरच गरज आहे. येणाऱ्यांचे व्यक्तिगत मोल हिणकस असले आणि जनतेच्या दृष्टीने एक शंकरराव चव्हाण शिक्षणमंत्रीपद सभाळतात तर दुसरे यशवंतराव चव्हाण संरक्षणमंत्रीपद किंवा अन्य काही पद संभाळतात याची कदर होण्यासारखी नसली तरी चव्हाणांसारखा अनुभवी मनुष्य उपलब्ध झाला तर शासनाच्या कार्यक्षमतेवर त्याचा अनुकूल परिणाम झाल्याखेरीज रहाणार नाही. चव्हाणांचे आणखी अवमूल्यन होऊन आपले मोठेपण जर आपोआप वाढणार असेल तर इंदिराजी तरी कशाला हरकत घेतील ? मुंबईमध्ये बिनधास्त राज्य करणारे अब्दूल रहमान आणि दुसऱ्या फळीमधील काही नेते चव्हाणांच्या आगमनाने अस्वस्थ होणे स्वाभाविक आहे. एखादे दान त्यांना अनुकूल पडले तर झपाट्यात चार चाली करण्याची ताकद चव्हाणांजवळ असल्याने अनेक नेत्यांच्या पोटात खड्डा पडल्याखेरीज रहाणार नाही. निष्ठावंत मंडळी आपल्या आगमनाने धास्तावली असल्याची जाणीव चव्हाणांनाही असल्याने ते जबाबदारीने वागतील आणि त्याच्या ज्या काही खाशा खेळी आहेत त्या हुषारीने खेळतील यात संदेह नाही. महाराष्ट्रापुरते बोलायचे तर जवळजवळ सर्व अरस काँग्रेस सगती घेऊन चव्हाण इंदिराजींच्या सेवेस जात आहेत. आजही महाराष्ट्रापुरती का होईना, त्यांनी बांधलेली संघटना बरोबर नेण्याचे सामर्थ्य त्यांच्याजवळ निश्चितच आहे. मग प्रश्न उरतो, उरल्या सुरल्या अरस काँग्रेसचे काय ? आणि—विरोधी पक्षाची या बाबतची भूमिका काय ? भाजपच्या जबाबदार नेत्याने अजून तरी याबाबत फारशी प्रतिक्रिया व्यक्त केलेली दिसत नाही. जनता पक्षाचे नेते मात्र काहीसे हवालदिल झालेले दिसतात. केवळ जुन्या जनसंघीय नेत्याकडे मुख्यमंत्रिपद जायला नको म्हणून शरदरावांसारख्या फुटीराला मुख्यमंत्रिपदाची खुर्ची बहाल करून सगळ्यात ओंगळ राजकीय सौदा करणाऱ्या एस. एम. जोशी यांनी, यशवंतरावांवर दुगाण्या झाडून शरदरावांना चुचकारण्याचा प्रयत्न चालवला आहे आणि आपणही जुने काँग्रेसवाले असल्याचे सांगून त्यांना जनता पक्षात येण्याचे आवाहनही केले आहे. एस. एम. च्या या आवाहनाला शरदराव दाद देण्याचा जराही संभव नसला तरी एस. एम. यांचे आवाहन हा एक राजकीय विनोदच म्हणावा लागेल. मधाचे पोळे कुठे लटकले आहे हे शरदरावांना माहीत असल्याने ते असल्या आवाहनाला भीक न घालता एकमताच्या निर्णयापुढे मान तुकविण्याचे पूर्वनियोजित नाटक पूर्ण करून इंदिरा काँग्रेसमध्ये सहभागी होतील महाराष्ट्र विधानसभेमध्ये इंदिरा-काँग्रेसचे बळ वाढेल. तरीही अब्दूल रहमान अस्वस्थ राहतील नानासाहेब गोरे म्हणतात त्याप्रमाणे यशवंतरावांच्या निर्णयाने विरोधी पक्षाच्या बळकट बांधणीला निश्चितच मोठा छेद जाईल. तथापि सर्वसामान्य जनता, राजकीय नेत्यांच्या निर्णयाबाबत कमालीची उदासीन झाली आहे आणीबाणीनंतर झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर इंदिराजी सत्ताभ्रष्ट झाल्या खऱ्या; परंतु त्यामुळेच ज्यांना आम्ही राष्ट्रीय स्तरावरचे नेते समजत होतो, त्या मोरारजीपासून ते बाबूजींपर्यंत सगळ्यांच्या सत्तावासनेचे इतके गलिच्छ दर्शन जनतेला घडले आहे की, राजकीय नेत्यांच्या निर्णयाबाबत जनता संवेदनाहीन झाली आहे.

उर्वरित अरस काँग्रेसची थोडी-फार ताकद केरळमध्ये राहील. प. बंगालमध्ये या पक्षाचे थोडे सामर्थ्य असले तरी तेथीलही अनेक मंडळी इंदिरा काँग्रेसमध्ये सहभागी होत असल्याने तेथेही हा पक्ष बळ गमावून बसेल. कर्नाटकामध्ये अरस काँग्रेस नामशेष झाली असली तरी देवराज अर्स यांच्या पाठी जे काही थोडे-फार बळ आहे तेही पातळ होऊन जाईल तात्पर्य, लोकसभेमध्ये पक्षाच्या नेतेपदाची झूल मिरवणारा चव्हाणांसारखा नेता सत्ताधारी पक्षाला जाऊन मिळाल्यावर या पक्षाचे अस्तित्व उरलेच तर ते केवळ कागदोपत्री उरेल. अन्य विरोधी पक्षांपैकी, भाजप आणि डावे कम्युनिस्ट या दोनच शक्ती बळकट होतील. लोकदलाची बांधणी कमालीची ठिसूळ आहे. चौधरी चरणसिंग यांचा प्रभाव उत्तर हिंदुस्थानामधील मोठ्या भागावर आहे. लोकसभेमध्ये त्यांचे खासदारही आहेत, परंतु या पक्षाचे जे काही बळ आहे ती सारी चौधरींची शक्ती आहे आणि त्यांच्यानंतर लोकदलाची वाताहात झाल्याखेरीज रहाणार नाही. काँग्रेस, कम्युनिस्ट आणि भाजप अशा तिहेरी बांधणीवरून तेव्हा परिस्थितीवशात काँग्रेस आणि भाजप जवळीक साधून कम्युनिस्टांशी मुकाबला करतील. बदलत्या राजकीय परिस्थितीमुळे जनता पक्षालाही भवितव्य उरणार नाही. आजही जनता पक्षाची अवस्था जुन्या समाजवाद्यांप्रमाणे झाली आहे. नेते उदंड आणि अनुयायांचा अभाव, या परिस्थितीमधून जनता पक्षाला जावे लागत आहे. जनता पक्षाच्या भवितव्याबद्दल उगाच स्वप्नाळू कल्पनात रंगून जाण्यात हशील नाही. चव्हाणांच्या निर्णयामुळे राजकीय पक्षाच्या पुनर्बांधणीस थोडी वेगाने चालना मिळेल अशी आशा आहे. □

विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

मूल्य बहा रुपये

'राजहंस प्रकाशन, पुणे ३०

श्यामचा संसार (कथा तेरावी)

फिरोज रानडे

# राधाचे मित्र व श्याम

'अभी आज नही, कल या परसू आना!' राधा अत्यंत अजिजीच्या स्वरात म्हणत होती. 'लेकिन इसी वक्तपे आना हाँ!' अर्धवट दार उघडून राधा कोणाशी तरी हे वाक्य बोलली व झटकन् दार लावती झाली. तिच्या आवाजात त्या माणसाला परत जावयाला सांगावे लागावे ह्याबद्दल थोडे दु:ख झाल्यासारखे वाटत होते.

श्याम हे सगळे ऐकत होता. तसा आजचा कामाचा दिवस व त्या हिशेबाप्रमाणे श्याम कचेरीत असावयास पाहिजे होता; पण त्याच्या नावाचे काही रजिस्टर्ड पत्र आले होते ते घेण्याकरता म्हणून तो घरीच राहिला होता व बाहेरच्या खोलीत काही तरी वाचत बसला होता

ह्या मराठी बायकाचे हिंदी, कितीही वर्षं हिंदी प्रदेशात राहिले तरी पिकणे कठीण आहे म्हणजेच कच्चे राहणार, असा शेरा श्यामने मनाशीच, राधाच्या 'अभी आज नही, कल या परसू इसी वक्त आना' ह्या कुजबुजत व अजिजीने बोललेल्या वाक्यावर मारला व हातात जे काय पुस्तक वा मासिक होते ते पुढे वाचावयास सुरुवात केली.

पण एक-दोन मिनिटातच त्याची आगा ह्या विनोदी नटाची कशी late-reaction होते तशी झाली व तो मनाशी एकदम चपापला व म्हणाला—

'अरे, मी खुळचासारखा राधाचे व तमाम मराठी बायकाचे हिंदी कधी सुधारणार नाही वगैरे म्हणालो; पण मुख्य मुद्दा म्हणजे राधा हे वाक्य एवढचा कुजबुजत काणाला म्हणाली व एवढे घाईघाईने तिने दार लावून का घेतले असेल ह्याचा विचारच केला नाही. कोण असेल तो? मी कचेरीत व मुले शाळेत गेली असणार म्हणून तो नेहमीप्रमाणे आला असणार—राधाला भेटायला—पण मी घरी आहे तेव्हा 'आज नही, कल या परसू' असे घाईघाईने पण आर्जवी शब्दात राधाने सांगून त्य चो बोळवण केली व तितक्याच घाईघाईने दार बद करून घेतले!'

'नाही, आपण त्या वेळी तो कोण हे पाहिले, नाही पाहिले की राधाचा चेहरा बावरला होता की काय ते. आपल्याला फक्त राधाचे हिंदी कसे व केव्हा सुधारणार ह्याचीच काळजी; पण हिची वर्तणूक कुधारत चालली आहे त्याच्याबद्दल आपल्याला काहीच कसे वाटले नाही? म्हणजे आपले हे भारत सरकारच्या परराष्ट्रीय धोरणासारखेच झाले म्हणावयाचे.' 'मराठी दैनिकाचे संपादक साध्याही विषयात राजकारण बघतात त्याची बाधा श्यामला पण झाली होती.

तसे श्याम व राधा काही तरुण जातीतले राहिले नव्हते. त्याच्या लग्नाला आता दहा-बारा वर्षं होत आली होती. साधारण सुखाचा ससार म्हणता येईल असा त्याचा संसार होता. श्याम व राधा साधारण ज्याला 'नेक' म्हणता येईल अशी नेक होती. राधाच्या बोलण्यात वा वागण्यात त्याला तसे कधी संशयास्पद दिसले नव्हते. त्या आपल्या अशा राधेचा संशय तरी कसा आला ह्याचे श्यामला थोडे नवल वाटले व चुटपुटही लागली; पण संशयरसाची हीच तर मजा आहे!

पूर्वी तर अशा संशयावर कल्लोळ माजून चांगली तीन-तीन अंकी नाटके लिहीत असत. मग श्यामच्या मनात लहानशी संशय-लाट आल्यास नवल ते काय?

आधीच माणसाचा म्हणजे पुरुषाचा स्वभाव संशयी व त्यात मराठी मासिकात स्त्री—लेखिकानी लिहिलेल्या काही आत्मचरित्रात्मक व काही काल्पनिक अशा परपुरुषसंबंधाच्या गोष्टी वाचून वाचून श्यामच्या मनात अशी संशय-लाट आल्यास तो सर्वस्वी दोषी ठरू नये. जीवनाचा साहित्यावर परिणाम होतो तसाच साहित्याचा जीवनावर होतो तो असा! परत मराठी दैनिक संपादकायोग्य निष्कर्ष!

त्या संशय-लाटेतच राधाने 'कल या परसू' बोलावलेला माणूस बिल्डिंगबाहेर पडला नसला तर आपल्याला पाहायला मिळेल ह्या हिशेबानं श्याम तातडीने उठला व बाहेर बालकनीत गेला. रस्त्यावरून नेहमीचीच फालतू माणसे जात-येत होती. राधाचे मन ओढन घेईल असा पुरुषोत्तम त्याला आढळला नाही.

तेवढयात शेजारच्या कर्वेबाई उन्हात तांदूळ वाळत घालायला म्हणून बाहेर आल्या. आज सगळी पुरुषमाणसे कामावर गेली आहेत ह्या कल्पनेने त्याची वेषभूषा व केशभूषा 'इन्फॉर्मल' होती. तेव्हा तांदूळ वाळत घालताना कर्वेबाईंची होणारी कमनीय हालचाल बघत श्याम राहिला व त्या नादात तो राधाने 'कल या परसू' बोलावलेल्या माणसाबद्दल अगदी विसरून गेला.

तेवढयात राधाच्या 'जेवून घ्या एकदाचे म्हणजे तुम्ही मोकळे व मी मोकळी' ह्या वाक्याने श्यामची विचार-सूतकताई भग पावली व त्याला राधाच्या 'कल या परसू' मित्राची आठवण झाली. का कोणास ठाऊक, श्याम आज घरी राहिला ह्याबद्दल राधाला वाटावा तेवढा आनद वाटला नव्हता हे श्यामच्या लक्षात सकाळीच आले होते. आता त्याला त्याचे कारण म्हणजे 'कल या परसू' मित्र हे असावे असे ठामपणे वाटले.

खरे म्हणजे आपण एका बाजूला राधाचा संशय घेतो व दुसऱ्या बाजूला कर्वेबाईंच्या कमनीय हालचाली पाहून मनात मराठी कथा-लेखिका योग्य वाईट-साईट विचार आणतो याचे त्याला थोडे वैषम्य वाटत होते; पण मग आपण फक्त मनाशी वाईट-साईट विचारच आणतो, राधासारखे मित्राला 'कल या परसू' बोलावत तर नाही असे आपल्या वागण्याचे समर्थन करून तो घरात गला व अत्यत छद्मीपणाने राधाला विचारता झाला—

'जेवून घेतल्यावर मी मोकळा व तू पण मोकळी हे खरे; पण मोकळी होऊन तू करणार काय आहेस?'

'माझ्या भानगडीत तुम्ही पडू नका!' राधा नेहमीच्याच वृत्तीने म्हणाली.

पण श्यामने आता संशयाचा गॉगल लावला होता. त्यामुळे त्याला सगळया गोष्टी काळया काळया दिसू लागल्या होत्या. गॉगलचे एक बरे असते. ता लावल्यामुळे निदान थड-थंड तरी वाटते; पण श्यामच्या संशय-गॉगलमुळे त्याला जास्तच गरम वाटू लागले होते.

'वा! म्हणजे तुम्ही भानगडी करावयाच्या व आम्ही त्यात पडावयाचं पण नाही ! हा खासा न्याय झाला!'

'हे बघा, तुमचे फालतू विनोदाचे कौतुक करावयाच्या व कुजके बोलणे ऐकून घेण्याच्या बिलकुल मनस्थितीत मी नाही बघा. आधीच तुमच्या अशा अनपेक्षितपणे घरी राहण्याने माझ्या सर्व कार्यक्रमावर बोळा फिरला आहे. चटकन जेवून घ्या, मला मोकळी करा व बसा पोस्टमनची वाट पहात !'

'अच्छा, बोळा फिरला काय तुमच्या 'सगळ्या' कार्यक्रमावर ?' छद्मी रसाने ओथबलेले वाक्य गणपतराव बोडस 'संशय कल्लोळा'त ज्या स्टाईलने म्हणत, त्या स्टाईलमध्ये श्याम म्हणाला. अर्थात हे म्हणताना त्याने 'सगळ्या' ह्या शब्दावर खास भर दिला होता. पण राधाने त्याच्या गणपतराव बोडसपणावर—'सगळ्या' ह्या शब्दावर भर देण्यावर—ढुकूनही पाहिले नाही. ती जेवणाचे खोलीत गेली व तिच्यामागोमाग श्याम पण गेला.

जेवताना श्यामने काही तरी बोलून सकाळच्या 'कल या परसू' मित्राबद्दल जास्त माहिती काढावयाचा प्रयत्न केला पण राधा अगदी मूडमध्ये नव्हती. तिने एका वाक्यात श्यामला चूप बसवले.

'आता जेवा सरळपणे व मला मोकळी करा! दर बुधवारी आम्ही बायका एकीएकीकडे जमतो. आज भागवतबाईंकडे जायचे आहे. आज तुम्ही घरी राहिलात व सगळा घोटाळा झाला !'

अशी जेवणे झाली-राधा गेली. योग्य वेळी पोस्टमन येवून गेला. ३—३॥ ची वेळ होती. दारावरची बेल वाजली. राधा तर पाच वाजल्याशिवाय येणे शक्य नव्हते. मग कोण असेल बुवा, असा मनाशी प्रश्न विचारत श्याम दार उघडता झाला. तर दारात कर्वे बाई उभ्या ! त्यांना बघून श्याम चाट पडला. पण श्याम घरी आहे व एकटा आहे ह्याची कर्वेबाईंना खात्री होतीसे वाटत होते.

कर्वेबाई सकाळसारख्याच कमनीय किंबहुना सकाळपेक्षा मुठभर जास्तच कमनीय—म्हणजे जेथे मुठभर जास्त कमनीय दिसणे शक्य आहे तेथे कमनीय दिसत दारात हसत उभ्या होत्या.

श्यामच्या मनात कर्वेबाईंबद्दल वेळी—अवेळी अमंगळ विचार येत असत; अगदीच नाही असे नाही, पण एक तर काही करायला मन धजत नसे व संधी मिळत नसे. आज मधी मिळणार होती. तिचा त्याने पुरेपूर नफा उठवण्याचे ठरवले होते. आपण करतो त योग्य नाही अशी टोचणी त्याला लागली. पण राधा तर दिवसाढवळ्या आपल्या मित्राना बोलावते तर आपणही मैत्रिणीशी संबंध ठेवायला काय हरकत आहे, असे मनाला नैतिक अधिष्ठान देत तो कर्वेबाईंना म्हणाला,

'या, या, या !' आता त्याने हुषारीने कर्वेवहिनी वा उषाताई वगैरे म्हटले नाही.

आतापर्यंत श्यामने मराठी मासिकातल्या बायकानी लिहिलेल्या बायकांच्या भानगडीबाबतच्या गोष्टी मोठ्या रसाळपणे वाचल्या होत्या; पण त्या सर्व भानगडीना actually सुरुवात कशी करतात हे काही त्याला आठवत नव्हते. जे आठवत होते ते असे की, साधारणपणे नायक व नायिका बाळपणीचे मित्र-मैत्रिणी असतात. बाळपणापासूनच त्यांचे प्रेम संबंध असतात. काही कारणाने त्यांची फारकत होते. मग काही वर्षांनंतर भेट वगैरे ..

पण त्या सुरुवातीचा श्याम – कर्वेबाई या गोष्टीला काही उपयोग होणार नव्हता. कारण त्याच्या बाळपणी अशी प्रेमात पडण्याची वगैरे पद्धत नव्हती व कर्वेबाईंना त्याने त्या हौसिंग-सोसायटीत रहायला आल्यावरच पाहिले होते.

ह्या मराठी लेखिका, बाळपणी मित्रमैत्रिणी नसणाऱ्या लोकांच्या गोष्टीची सुरुवात कशी होते, ते कधीच कसे लिहीत नाहीत ? असा प्रश्न श्यामला पडला व त्यावरून त्याच्या मनात राग निर्माण झाला; पण आता कर्वेबाई एवढ्या दारात असताना राग निर्माण होऊ देणे योग्य नाही, हे श्यामने ओळखले व हसत हसत तो परत म्हणाला, 'या, या, या !'

'हे काय ? तुम्ही घरी कसे ? बरी आहे ना प्रकृती ? आणि तुम्हाला सोडून राधा गेली कशी बाहेर ?' कर्वेबाई मराठीत ज्याला लडिवाळपणे म्हणतात तशा श्यामला म्हणाल्या.

आपल्याला प्रकृती आहे हे कर्वेबाईंच्या प्रश्नावरून श्यामच्या चटकन ध्यानात आले व तो केळकरी पद्धतीने म्हणाला, 'म्हटलं तर चागली आहे, म्हटलं तर वाईट आहे.' कर्वेबाई घरात आल्या. राधा घरात नाही हे कळूनसुद्धा बाई घरात आल्या हे बघून श्यामचा उत्साह दुणावला; पण त्याचबरोबर त्याची छाती धडधडायला लागली.

बाई आल्या. सोफ्यावर बसल्या. श्यामने चहा विचारल्यावर त्याला नको म्हणत म्हणाल्या, 'कशाला चहा ? बसू या गप्पा मारत.' मग बोलण्यावरून बोलणी निघाली. कर्वेबाईंनी राधा भागवतबाईंकडे गेली आहे ही माहिती हुषारीने काढून घेतली व ही माहिती मिळाल्या मिळाल्या त्या ताबडतोब जावयास उठल्या. कर्वेबाई राधा +भागवतबाई Power block मधल्या नव्हत्या. त्यांना फक्त एवढीच माहिती हवी होती. ती त्यांना मिळताच प्रवासी जसा बसप्रवास झाल्यावर बसचे तिकिट कस्पटासमान टाकून देतो त्याप्रमाणे श्यामला टाकून देत त्या निघून गेल्या !

मग मराठी लेखिका काय नेहमी गोष्टी लिहितात की बायकाना परपुरुषाची ओढ असते म्हणून ? आणि मग राधा कशी जमवते हे सगळं ? ह्या दोन प्रश्नांचा विचार-ताप इतका वाढला की संध्याकाळपर्यंत त्याला खरंच ताप भरून आला व दुसऱ्या दिवशीही तो कचेरीत जाऊ शकला नाही !

दुसऱ्या दिवशी सकाळची गोष्ट. श्याम कॉटवर पडला होता तरी त्याचे सगळे लक्ष दाराकडे होते. केव्हाही बेल वाजली की तो कान देऊन राधा कोणाशी काय बोलते ते ऐकत होता.

साधारण ९॥–१० च्या सुमाराला राधाने दार उघडले व त्याच अजिजीच्या स्वरात म्हणाली, 'देखो, आज भी नही. हमारे ये को बहुत ताप है !' राधाने एवढे वाक्य म्हटले व स्वत: बाहेर जाऊन दार अर्धवट लोटून घेतले; पण श्याम उठून दाराजवळ आला होता त्यामुळे त्याचे बोलणे श्यामला ऐकू येत होते

'आप हमेशा ऐसाही कहती हो, कल कहा, कल या परसू आना.'

'तुम्हारा बराबर है; पण ...' राधा इतक्या मऊ आवाजात बोलू शकते ह्यावर श्यामचा विश्वास बसेना. 'पण कल पक्का. कल नही नही कहूँगी.'

राधाचे हे वाक्य ऐकताच श्यामचा ताप एकदम चढला व त्याने अर्धवट लावलेले दार उघडले. बघतो तो रद्दीवाला अत्यंत उदास चेहऱ्याने पायऱ्या उतरत होता !

'चला घरात नाही तर परत ताप वाढायाचा !' राधा काळजीच्या स्वरात म्हणाली.

'काही वाढत नाही ताप. आता तापाचं कारण कळले—आता गेला ताप नि विप !' श्याम मोठ्या आनंदात म्हणाला.

राधा काही न कळल्यावर माणसाचा चेहरा कसा होतो तसा चेहरा करून राहिली ! □

## श्री. गोविंदराव मानवी यांची मुलाखत

# वंचनाग्रस्त

लेखक : विजय परुळकर । लेखांक : चवथा

निपाणीमध्ये मी आलो होतो देवदासींच्या मुलींसाठी एखादे वसती. गृह स्थापन करता येईल का ह्याची प्राथमिक पाहणी करण्यासाठी ! त्या संदर्भात आवश्यक ती माहिती मी जमवली होती; पण त्याचबरोबर तंबाखू उत्पादक शेतकरी, विडी आणि तंबाखू कामगार स्त्रिया ह्यांच्या अनंत अडचणी मला ऐकविण्यात आल्या. निपाणीला येऊन तीन दिवस झाले होते. पुण्याला परतणं आवश्यक होतं. तत्पूर्वी एखाद्या व्यापाऱ्याची मला मुलाखत घ्यायची होती आणि आयेशा दिवान ऊर्फ 'चाची' ह्यांच्याशीदेखील बातचीत करावयाची होती. जमल्यास अकोळच्या युवक मंडळाच्या तरुण कार्यकर्त्यांची गाठभेट घ्यायची होती. शेतकऱ्याचा सहकारी तंबाखू खरेदी-विक्री संघ स्थापन करणाऱ्या एस्. टी. चौगुलेंना भेटून आणखी काही नवीन माहिती मिळते का असा प्रयत्न करायचा होता; पण हे सगळं अर्ध्या दिवसात कसं काय उरकायचं, म्हणून मी काहीसा अस्वस्थ होतो. माझी अस्वस्थता सुभाष जोशींच्या लक्षात आली असावी. प्रसन्न हसत 'सर' म्हणाले, 'तुम्ही विनाकारण गडबड करू नका. मी सर्वांच्या गाठीभेटी घालून देतो. निवांतपणे सगळ्यांशी बोला आणि मगच पुण्याला जा !'

तंबाखूचं पान जमवून आम्ही घराबाहेर पडलो. सर म्हणाले, 'मी तुम्हाला निपाणीचे सुप्रसिद्ध तंबाखू व्यापारी गोविंदराव मानवी ह्यांच्याकडे घेऊन जातो, पण त्या अगोदर आपण जरा देवचंद शेठजींच्या वखारीवर फेरी मारूया. तिथं चार–पाचशे तंबाखू कामगारस्त्रिया संपावर बसल्या आहेत. त्यांच्या मुलाखती घ्या; मग आपण मानवींच्याकडे जाऊ !'

देवचंदशेठजींच्या एका वखारीसमोर कामगार–स्त्रियांचा एक मोठा घोळका डांबरी सडकेवर ठाण मांडून बसला होता. सरांना पहाताच कामगार–स्त्रियांनी घोषणा द्यायला सुरुवात केली 'कामगार एकजुटीचा विजय असो !' 'आमच्या मागण्या मान्य करा !' त्यांच्याजवळ पोहचताच मी एका कामगार–स्त्रीला विचारलं, 'तुमच्या कसल्या मागण्या मान्य कराव्या असं तुमचं म्हणणं आहे ?' कोरडे ओठ फाटक्या पदरानं पुसत ती कृश भगिनी म्हणाली,

'अहो, चार वखारी बंद आहेत. पंधरा दिवस झाले. आमचं काम बंद केलंय शेठजीनं ! शेठजी म्हनत्यात, आमच्या इथं कामच नाही तर द्यावं कुठनं तुम्हाला काम ? खेड्यापाड्यांतून द्यायला मात्र ह्यांच्याकडे काम हाये. तिथं पगार कमी देऊन काम करून घेता येतं. तिथं साडेतीन रुपये हजेरी. इथं आमची पाच रुपये हजेरी आहे. त्यामुळे शेठजीनं सगळा माल खेड्यावर नेलाय, तिथून जर्दा करून इथं आणलाय. नऊ 'अंकण' 'चाकी' इथं वखारीत पडून आहे. पन्नास पन्नास जणींच्या दोन दोन पाळ्या करून चाकीला पाणी लावायचं काम आम्ही करावं असं त्यांचं म्हणणं आहे. फक्त पन्नासजणींना दोन दिवस काम, मग बाकीच्या पाचशेजणींनी काय उपाशी मरावं का काय ?'

'शेठजींचं नाव काय ?' माहीत असूनही मी मुद्दाम विचारलं.

'देवचंद शहा. चार वखारी बंद होऊन पंधरा दिवस झालेत. पाचशे बायांना रोजगार बंद झालाय ! पंधरा दिवसांपासून आम्ही इथं वखारीसमोर धरणं धरून संपावर बसलोय; पण मालक किंवा त्यांचं दिवाणजी आमच्याकडे ढुंकून देखील पहायला तयार नाहीत. आम्ही असं बसून राहिलो काय किंवा उपाशी मेलो काय–मालकाला त्याची पर्वा नाही. हे दिवाणजी लोक रस्त्यावरून जाता–येता दात काढून हसत असतात. त्यांना लाज म्हणून नाही !'

'असं किती दिवस बसून रहाणार ? हे कोडं सुटायचं कसं ?'

'तुम्ही विचारताय तर तुम्हीच काही तोडगा काढून द्या. तुम्हाला जमलं नाही तर आम्ही काढणारच आमचा तोडगा ! आम्ही आता माघार घेणार नाही. दसऱ्यापासून हे असं चाललंय, दोन दिवसांची पाळी की काम बंद ! दोन दिवसांच्या पाळीनं–दहा रुपयानं पोट भरतयं का ? आम्ही शेठजीला इथली महागाई सांगितली तर ते आम्हाला उलट मुंबईची महागाई ऐकवतात. तिथं मुंबईला हजार–बाराशे पगार मिळतोय. इथं पाच रुपये रोज देताना ह्यांच्या नाकाला ढगासारा शिंका येतात ! पूर्वी आम्ही आठ आणे कमी चार रुपयावर सोळा–अठरा तास काम करायचो तेव्हा हाच शेठजी नऊ महिने काम पुरवायचा; मग आताच कुठं गेलं काम ? खेड्यावर मात्र साडेतीन रुपये रोज आणि बारा तासांची पाळी म्हटल्यावर ह्यांच्यापाशी भरपूर काम आहे पुरवायला ! वीस–पंचवीस वर्सं आम्ही ह्या

वखारीत काम करतोय, कामाचा कधी तुटवडा पडला नाही. आता आम्ही आठ तासाची पाळी आणि पाच रुपये रोज मागितल्यावर मात्र लगेच काम बंद, हे कसं काय ? शेठजी म्हणतोय, बायांनो ! तुम्ही संघटना सोडा ! आम्ही तुम्हाला कायम काम देतो !'

'तुम्ही इथं पंधरा दिवस वखार अडवून बसलाय म्हणून शेठजींनी पोलिसात तक्रार दिली का नाही ? पोलीस येऊन गेले का ?'

'नाही–कुणीच आलं नाही गरिबाची चौकशी करायला फौजदार आणि पोलीस येत नाहीत. ते जातात शेठजीलोकांचा बंगला राखायला. पोलीस फक्त श्रीमंतांची राखण करायला; गरिबासाठी पोलीस नाहीत असलेच तर लाठ्या मारायला ! दिवाळीच्या टायमाला आम्ही संप केला तर पोलिसानी अश्रुधूर सोडून आम्हालाच लाठ्यांनी मारलं !'

'महिला पोलिसांनी मारलं की पुरुष पोलिसांनी ?'

'महिला पोलीस आहेत कुठं इथं ?'

'आमच्या बेळगाव जिल्ह्यात दोन महिला पोलीस ह्यायेत–त्या कुठं पुऱ्या पडणार ? पुरुष पोलिसांनीच कामगार–बायांना मारलं. खाली आडवं पाडून मारलं !'

ज्यांचं सर्वस्व हरवलं आहे अशी माणसं खोटं बोलत नाहीत. खोटं बोलून पदरात काही पाडून घ्यावं एव्हढादेखील प्राण त्यांच्या मनी शिल्लक नसतो. ह्या तंबाखू कामगार–स्त्रिया गेले पंधरा दिवस उपाशी असणार ! तशा तर त्या कैक वर्षं उपाशीच असणार ! पण उपाशी असूनदेखील त्या भीक मागत नव्हत्या हे विशेष ! आठ तास इमानदारीनं काम करून घाम गाळायची त्यांची तयारी होती. त्या घामाचं दाम म्हणून त्या मागत होत्या पाच रुपये...फक्त पाच रुपये ! भुकेल्या मुला-बाळांच्या पोटाची खळगी भरण्यासाठी, स्वतःचा अर्धमेला जीव अजून कष्ट करता यावेत म्हणून जगविण्यासाठी, घासभर अन्नासाठी आठ तास काम केल्यानंतर त्यांना हवे होते फक्त पाच रुपये ! पण मालक त्यांना अन्नाला मोताद करू पहात होता. असल्या लोकांना वठणीवर आणू शकेल असा एकही शासनकर्ता, स्वातंत्र्य मिळून चौतीस वर्षं झाली तरी, ह्या भारत देशात अस्तित्वात नसावा हे केव्हढं मोठं दुर्दैव ! मी स्वतःला सावरण्याचा प्रयत्न करत होतो आणि सुभाष जोशी काहीशा कठोर वाणीनं कामगार–स्त्रियांना सांगत होते–

'आया–बहिणींनो, तुम्ही इथं पंधरा दिवस संपावर आहात ही बातमी शेठजींच्यापर्यंत पोहचली असेलच, ह्याची मला खात्री नाही. शेठजींची इकडची माणसं त्यांना खरं काय ते कधीच सांगत नाहीत, असा आपला आतापर्यंतचा अनुभव आहे. मी शेठजींच्यासाठी एक सविस्तर पत्र आणि निवेदन तयार केलं आहे. शेठजी आज संध्याकाळी मुंबईहून परत येणार आहेत असा निरोप मिळालाय. ते आल्यावर आपण निवेदन सादर करू या !

'ह्या वखारातील काम बंद ठेवण्यापूर्वी मालकानं–शशिकांतभाईनं आपल्याला सांगितलं की, बंगल्यातल्या वखारीत दोन दोन दिवसाची पाळी करा ! त्याप्रमाणे तुम्ही पाळ्या केल्यात. ह्या वखारीमध्ये आता नऊ अंकण चाकी पाणी लावण्यासाठी पडून आहे, तरीदेखील तुम्हाला काम मिळत नाही.

'तुम्ही कमी मजुरीवर सोळा–अठरा तास काम करायच्या तेव्हा गेली पस्तीस वर्षं ह्याच वखारी दिवस–रात्र चालू असायच्या. आज त्याच वखारी, तुम्ही तुमच्या घामाचं दाम मागताच, फटाफट बंद केल्या जात आहेत ही गोष्ट ध्यानात घ्या !

'मालकानं आपल्याला सांगितलं होतं की, बंगल्यातील पाळी मोडू नका ! आपण मालकाची सोय पाहिली, बंगल्यातील पाळी मोडली नाही. आपण मालकाचं ऐकलं आणि काम पुरं करून दिलं. दसऱ्यापासून तक्रार न करता तुम्ही दोन दोन दिवसाची पाळी करत आहात. दहा रुपयात कसाबसा आठवडा भागवता आहात. मालकानं बोनस द्यायचं कबूल केलं होतं, पण अजून दिला नाही; तरीदेखील आपण तक्रार केली नाही. सबुरीनं घेतलं.

'आतापर्यंत ह्या वखारीत कधी संप झाला नाही. तडजोडीनं प्रश्न सुटत गेले; पण गेल्या पंधरा दिवसांपासून मालकानं 'काही वेगळंच धोरण आखलेलं दिसतंय ! त्याला उत्तर म्हणून इथून पुढं आपण ह्या दोन पाळ्या आणि फक्त पन्नास बायकांना हजेरी हे मान्य करायचं नाही. वखारीत पडून असलेल्या नऊ अंकण चाकीला तुम्ही पाणी लावून द्यायचं नाही. एकदा ह्या चाकीला तुम्ही पाणी लावून दिलंत की तुमचं पुढचं कामदेखील बंद आणि तुमच्या हाती नारळाची करवंटी हे पक्कं ध्यानात ठेवा.

'उद्या दुपारपर्यंत शेठजींच्या हाती हे पत्र देण्याची आम्ही व्यवस्था करणार आहोत. शेठजींनी आपल्या निवेदनाकडे दुर्लक्ष केले तर आपल्याला नाइलाजास्तव वखारीसमोरून उठून त्यांच्या दुकानासमोर धरणं धरून बसावं लागणार ! आतापर्यंत वेस ओलांडायची नाही म्हणून आपण वखारीसमोर बसून आहोत; पण जरूर पडल्यास उद्या आपल्याला पुढचं पाऊल उचलावं लागेल, त्याची सर्वजणी तयारी ठेवा !'

कामगार-स्त्रियांना नमस्कार करून आम्ही गोविंदराव मानवींच्या वखारीच्या दिशेनं झपाझप पावलं टाकत निघालो. मी काहीही बोलण्याच्या मनस्थितीत नव्हतो. सर स्वतःशीच बोलल्याप्रमाणे म्हणाले– 'विजयराव, तुमच्या पुण्याच्या समाजकार्यकर्त्याबाई म्हणतात मला तुमच्या युनियनमध्ये घ्या, मी कामगार-स्त्रियांच्या वतीनं व्यापाऱ्यांशी वाटाघाटी करते !–काय करायचं बोला ?'

उत्तरादाखल मी हातातील सिगरेट फेकून टाचेखाली विझवली आणि समोर बघत चालत राहिलो.

¤

गोविंदराव मानवी हे निपाणीमधील एक बडं प्रस्थ. 'टोबॅको किंग' देवचंदशेठ इतकाच ह्यांचाही ह्या परिसरात दरारा ! गोविंदराव मानवी व्यापारात तर मुरलेलेच, पण राजकारणातही तरबेज. मानवींची शरीरयष्टी एखाद्या कसलेल्या पहिलवानासारखी. इतर व्यापारी-दलालांप्रमाणे ह्यांची ढेरी सुटलेली नाही. रुंद मजबूत खांदे, चौकोनी जबड्याचा, बिलंदर डोळे असलेला चेहरा. त्यांच्या वखारीत आम्ही पोहोचलो तेव्हा त्यांनी नोकराकरवी खुर्च्या मागविल्या आणि आम्ही मोकळ्या हवेत मुलाखतीसाठी बसलो.

गोविंदराव मानवींची मुलाखत पेश करण्याअगोदर मी एक गोष्ट स्पष्ट करू इच्छितो. ही मुलाखत मी मानवींच्या परवानगीनं टेप केली आहे आणि 'जशीच्या तशी' सादर करणार आहे. निपाणीमधील एका प्रतिष्ठित व्यापाऱ्यानं आपली बाजू मनमोकळेपणो

मांडली आहे. त्यांचं म्हणणं जसच्या तसं वाचकापुढं ठेवणं हे माझं कर्तव्य आहे. त्याची मुलाखत लिहून झाल्यावर, ' नंतर सुचलेले विचार ' माडण्याचं मी मुद्दामच टाळणार आहे. मुलाखत वाचून वाचकानी विचार करणं जास्त सुयोग्य !—मी काही प्रश्न विचारण्या-अगोदर मानवी स्वतःच सागू लागले :

मानवी : आमच्या ह्या धंद्याचं वैशिष्ट्य म्हणजे आजची जी नवीन सुधारित कारखानदारी आहे, मोठमोठे नवे कारखाने, रोखीचा व्यवहार, कॅश सिस्टिम—हे सगळं आमच्या इथं जवळजवळ नाही असं म्हटलं तरी चालेल ! निपाणी गावातील तंबाखू व्यापाऱ्याची हिंदुस्थानातील सर्व बाजारपेठात तीस-चाळीस कोटी रुपयाची उधारी असेल ! ही जवळजवळ ' परमनंट ' उधारी असते. इतके पैसे गुतून पडलेले असतात. ज्याच्याकडे आमची उधारी थकली आहे त्यापैकी काहीजण व्याज देतात, काहीजण देत नाहीत. विडी कारखानदार आणि निपाणीतील आम्ही तंबाखूचे दलाल, आमचे संबध जुने आहेत. पन्नास वर्षापूर्वीपासून चालत आलेले आहेत. आमच्यामुळे त्याचं भलं झालय, त्याच्यामुळं आमचा फायदा झाला आहे. असं हे जवळचं नात आहे. तंबाखू व्यापारातील हा एक प्रमुख घटक.

त्यानंतर ह्या भागात दुसराही एक वर्ग आहे. ही माणसं शेतकऱ्याकडून तंबाखू खरेदी करतात. त्याचं ' हाफ प्रोसेसिंग ' करून ' जर्दा ' बनवतात आणि आम्हाला विकतात. हा व्यवहारदेखील रोखीचा नसतो.जर्दा विकणाऱ्याची परिस्थिती चागली असते त्याच्याकडून आम्ही चार पाच हजार रुपयाचा माल घेतला तर तो म्हणतो— आमची काही गडबड नाही, पैसे सावकाश दिले तरी चालतील !

प्रश्न . तुम्ही जी माहिती सागणार ती सगळीच बरोबर लक्षात राहणं कठीण. मी मुलाखत टेपवर रेकॉर्ड करतो—चालेल ना ?

मानवी : हो, करा ना !—तर अशा प्रकारे हा धदा आहे. एकमेकाच्या सोयीनुसार, सवलतीप्रमाणे चालणारा. पूर्वी कसं होतं की, शेतकऱ्यांचा माल उधार वगैरे घेतला जात असे. परंतु गेल्या दहा-पधरा वर्षापासून ऐंशी टक्के माल ' कॅश परचेस ' केला जातो. आमच्या इथं निपाणीपासून पाच-सात मैलातील एक ठराविक भाग आहे—म्हणजे अकोळ, गळदगा वगैरे. हा जो चागला तंबाखू पिकविणारा भाग आहे तिकडच्या शेतकऱ्याची दोन-तीन महिने, चार महिनेपर्यंत सवलत राहू शकते, पण कापशी, पाच्छापूर ह्या भागातील तंबाखू मात्र रोख पैसे देऊनच खरेदी केला जातो. थोडक्यात काय, तर उधारीचा धंदा असा नाहीच. त्यामुळे शेतकऱ्याची पिळवणूक वगैरे जे प्रकार पेपरमधून येतात ते एकतर्फी असतात असं आमचं म्हणणं आहे.

वास्तविक सगळे शेतकरी आता शहाणे झाले आहेत, खुळे राहिले नाहीत. तंबाखू साफ करून व्यवस्थेशीर ठेवणारे जे असतात त्याना त्यांच्या इच्छेप्रमाणे भरपूर दर मिळतो. सूट, साडम शेकडा हे इकडच्या बाजूला आम्ही काही धरत नाही. ह्या पद्धती बंद झाल्यात. दहा रुपये सूट, पाच रुपये सूट वगैरे पूर्वी मिळत असे. ती आता सगळी बंद झाली आहे. काही भागात चालू आहे. काही भागात वजन चढ असतं. उदाहरण सांगायचं तर, पाच्छापूर बाजूचा शंभर किलो तंबाखू आम्ही जर आणला तर तो आम्ही इथं तयार केल्यावर सत्तर किलो होतो. त्यामध्ये काडी-माती, कचरा, घाण वगैरे असतं. पण आमच्या भागातील तंबाखू आम्ही जर घेतला तर आम्हाला तयार चौऱ्याण्णव किलो माल मिळू शकतो. अशा मालाला अर्थातच भाव मिळतो आणि हलक्या प्रकारच्या तबाखूला किलोमागे दोन-तीन रुपये भाव कमी मिळतो.

आता शेतकऱ्याच्या बाबतीत अधूनमधून काही कानावर पडतंय, व्यापारी अन्याय करतात, जुलूम करतात पण ह्या गोष्टी जवळ जवळ नव्वद टक्के अस्तित्वात नाहीत असं म्हटलं तरी चालेल !

आता काय असतय, तुमचा माल दाखवताना एक आणि घेताना दुसराच निघतो. त्यात जास्त काडी-माती निघाली तर आम्ही म्हणतो बोद चाळून-तंबाखू साफ करून दे ! शेतकरी काय म्हणतो, कशाला उगाच चाळत बसता ? अदाजानं काडी माती धरा की ! मग अशा वेळी आम्ही अदाजानं काडी-माती सूट धरतो. त्यात एखादवेळी आमचं एक किलो नुकसान होतं. कधी शेतकऱ्याचं होतं. त्याच्या-आमच्या ' अडरस्टॅडिंग 'नं हे सगळे व्यवहार होतात.

आता खेड्यावर जाऊन आम्ही स्वत. माल घेत असतो. कापशीच्या बाजूला तंबाखू सगळा काडी-माती ' मिक्स्ड ' असा असतो. तिथल्या रिवाजाप्रमाणे एक मण एकवीस किंवा बावीस किलोचा असतो. मालामध्ये जास्त काडी-माती असेल तर आम्ही म्हणतो, ' माल साफ करून दे किंवा वजन एक-दोन किलो चढ दे. ' असे हे ' म्युच्युअल अंडरस्टॅडिंग ' नं सगळे धदे होत असतात. अर्थात हे सगळं ' स्मूथली ' सर्व ठिकाणी चालू असतं. चुकून एखाद्या ठिकाणी वेगळं घडत असेलही—आम्ही नाही म्हणत नाही. परंतु ' जनरली ', ' नाइंटीफाइव्ह परसेंट ' हे सगळे ' ट्रॅजॅक्शन ' असे आहेत. त्यातला बहुतेक सगळा ' कॅश ' बिझनेस.

आमच्या ठराविक ' एरियातला ' बिझनेस वेगळा. आम्हाला नेहमी माल देणारे लोक असतात. समजा, एक लाख रुपयाचा तंबाखू आम्ही एखाद्याचा घेतला तर तो काय म्हणतो, ' मी दर महिन्याला मला लागतील तसे पैसे घेऊन जातो !' हे एकमेकाच्या सोयीन ठरवल जातं.

शेतकऱ्याशी आमचे जे संबंध आहेत त्याविषयी बाहेर जे सागितलं जातं तितका हा प्रकार वाईट नाही असं आमचं स्पष्ट मत आहे.

आता यदाची परिस्थिती सांगतो. आमच्या इकडचा जवळजवळ चाळीस टक्के तंबाखू अवेळी पावसामुळ भिजला आहे. यंदा शेतकऱ्याना चांगला दर येणार नाही. तबाखू भिजल्यामुळं त्याच्यात जे गुण पाहिजेत ते असत नाहीत. माल तांबडा निघतो, काळपट होतो.

प्रश्न : ह्या तंबाखूचा दर्जा तुम्ही शास्त्रोक्त पद्धतीनं, लॅबॉरेटरी टेस्ट घेऊन ठरवता को, अंदाजानं ?

मानवी : लॅबॉरेटरी टेस्टनं ह्यातलं काहीच ठरत नाही. तुम्ही दुकानावर आलात तर मी तुम्हाला चागला माल आणि भिजलेला माल दाखवतो. ह्या वर्षी तबाखूला चागला दर मिळणं जरा कठीण दिसतय !

## जुलूम जवळजवळ नव्वद टक्के अस्तित्वात नाही असे म्हटले तरी चालेल !

प्रश्न : तुम्ही ज्या वेगवेगळ्या 'सुटी' घेता त्या जबरदस्तीनं....

मानवी : हवासूट, काटासूट वगैरे वगैरे ज्या सुटी आहेत त्या आम्ही जबरदस्तीनं काढून घेतो हा जो आमच्याविरुद्धचा प्रचार आहे, त्यात काही फारसा अर्थ आहे असं आम्हाला वाटत नाही जी काही थोडी-फार सूट घेतली जाते त्यात जबरदस्ती अजिबात नसते. शेतकऱ्यात आणि आमच्यात हे 'अंडरस्टँडिंग' असत. एखाद दुसरा व्यापारी ह्या सुटी जबरदस्तीनं घेत असेलही–नाही असं नाही; पण त्यामुळं सगळ्यानाच दोष लावणं बरोबर आहे असं मला वाटत नाही. हल्ली सगळीकडे वजन, माप वगैरे सगळं अगदी काटेकोर असतं.

पूर्वी शेतकऱ्याला काही समजत नव्हतं. आता आम्ही वजन करायला लागलो तर ते काट्याजवळ उभे राहतात. आता ते शहाणे झालेले आहेत. एखाद्या खेडेगावामध्ये जरी शहाणे शेतकरी नसले तरी चार-दोन स्थानिक पुढारी असतात, ते लक्ष ठेवतात व्यापारी लोकाना त्यामुळं आता कसलाच गैरफायदा घेता येण शक्य नाही.

व्यापारी लोकांची परिस्थिती किंवा मनःस्थिती काय आहे ते तुम्हाला सागतो. आम्ही काय म्हणतो, शेतकऱ्याच्या अडाणीपणाचा गैरफायदा घेऊन, पैसे कमवून, आम्ही इन्कम टॅक्स भरण्यापलीकडे काही करत नाही ! आम्ही फार पैसे मिळवले तर सगळे टॅक्सला जातात म्हणून आम्ही म्हणतो, हा उपद्व्याप वाढवा कशाला ? जेवढं जमतय तेवढं करायचं-जास्त भानगडीत पडायच नाही, असं आता आमचं धोरण आहे. अशी वृत्ती आता व्यापारी लोकांच्यात येत चालली आहे. ह्यासानंच आता कुठल्या तरी गोष्टी कराव्यात ही प्रवृत्ती एखाद-दुसऱ्या व्यापाऱ्याची असेलही; पण सर्वसाधारणपणे माझ्यासारखे व्यापारी म्हणतात–आहे एवढा धंदा पुरे, वाढवायचा नाही !

प्रश्न : शेतकरी तंबाखू पिकविल्यानंतर तुम्हाला विकतो ज्या किंमतीत तुम्ही त्याचा तबाखू घेता त्यामधून तंबाखूचा उत्पादन खर्च वगळता शेतकऱ्याला किती टक्के नफा मिळतो ?

मानवी : शेतकऱ्याचं विचारता ?–त्याला काय होतंय बघा,... शेतावर काम करणारे, शेत कडे बघणारे जे मजूर असतात ना, त्यांना पहिल्यादा एकचतुर्थांश तबाखू द्यावा लागतो. म्हणजे रुपयातले चार आणे अगोदर शेतावर राबणाऱ्याला द्यावे लागतात ! त्यानंतर शेतात लागणारं खत, औषधं, रोपं वगैरेसाठी आणखी चार आणे खर्च नक्की येतो. उरलेल्या आठ आण्यातून इतर खर्च वगळता त्याला नफाच उरतो !

शेतकऱ्यांनी स्वतःच राबायचं ठरवलं, घरचच शेणखत वगैरे घातलं तर मग चौथाईचा भाग त्याला दुसऱ्याला द्यावा लागणार नाही, म्हणजे सहज रुपयातला दहा-अकरा आणे नफा मिळू शकेल !

पण आता आमच्यासारखे जे आहेत, व्यापारामुळं आम्हाला शेताकडं स्वतः लक्ष देणं, स्वतः राबणं शक्य नसतं–त्यांना तंबाखू-पिकात काहीच मिळत नाही. चार-सहा आणे सुद्धा मिळत नाहीत; पण शेतकरी स्वत. राबला तर त्याला सहज रुपयामागे दहा-अकरा आणे नफा सुटायला हरकत नाही. आमच्यासारख्याला मजुरी खूप द्यावी लागते, स्वतःचा खर्च खूप असतो, तेव्हा तबाखूचं पीक फारसं परवडत नाही.

प्रश्न : तुम्ही तंबाखूची शेती करणं पसंत कराल का तंबाखूचा व्यापार करणं ?

मानवी : शेतीत आम्हाला फायदा झाला असता; पण आम्ही स्वतः राबू शकत नाही. हा आमचा दोष आहे. आमची स्वतःची शेती आहे; पण व्यापारात अडकल्यामुळं शेतावर आम्ही महिन्यातून एकदाही जाऊ शकत नाही शेतीमध्ये हल्ली उसाचं उत्पादन आणि त्यातला फायदा चांगला आहे. तबाखूपेक्षा ऊसात फायदा जास्त ! आम्हाला टनाला अडीचशे रुपये असा भाव जरी मिळाला तरी तबाखूपेक्षा ते पीक फायद्याचं !

प्रश्न : यदा तर तुम्हाला अडीचशेपेक्षा जास्त भाव मिळणार असेल ना ?

मानवी : आमच्या शेतावर इरिगेशनची, म्हणजे पाटाच्या पाण्याची सोय नसली तरी विहिरीच्या पाण्याची सोय आहे. एकरी चाळीस-पन्नास टन ऊस आम्हाला सहज येतो. पन्नास टन आला तर आम्हाला पाच अडच साडेबारा हजार रुपये मिळतात ! तंबाखूचं तसं नाही

आता तंबाखूच्या नवीन सुधारलेल्या जाती वगैरे इकडे आलेल्या आहेत. काही शेतकरी हजार किलोपर्यंतसुद्धा तंबाखूचं उत्पादन काढतात–परतु हे उदाहरण अगदी क्वचित. हजारात किंवा लाखात एक ! सर्वसाधारणपणे एकरी तीनशे किलोच्या आसपासच तंबाखूचं पीक निघत समजा चारशे किलो निघाला आणि त्याला आठ रुपये दर मिळाला तर आठ चोक बत्तीसशे रुपये त्याला मिळणार. ह्या बत्तीसशेपैकी निम्मे पैसे तर मजुरी, खतं, औषधं वगैरेसाठी सरळच जातात. इतर आणखी काही खर्च सोडले तर त्याला एकरी हजार-बाराशेच्या वर काही मिळत नाही. म्हणून मी स्वतः तंबाखूपेक्षा ऊस जास्त लावण्यावर भर देणार आहे.

प्रश्न : तुमच्या म्हणण्याप्रमाणे तंबाखू पिकविणाऱ्या शेतकऱ्याला रुपयात सहा आणे नफा मिळतो. तुम्हाला स्वत.ला तंबाखूच्या व्यापारात किती नफा सुटतो ?

मानवी . आमचा हा सगळा व्यापार मुख्यतः कमिशनवर चालतो. आम्हाला शेकडा पाच रुपये कमिशन मिळतं. जे विडी कारखानदार आमच्याकडून प्रक्रिया केलेला तबाखू घेऊन जातात, ते आम्हाला तबाखू खरेदी करण्यासाठी रक्कम अॅडव्हान्स देतात. त्यावर व्याज आकारतात–पण ते व्याज काही बँक रेटप्रमाणे नसतं. आम्ही आमची रक्कम गुतवली असेल तर त्याचं व्याज आम्ही हिशेबात धरतो.

आमच्या व्यापाराची एकूण उठाठेव पाहिलीत तर ह्यामधील खर्च फार मोठे आहेत, हे तुमच्या ध्यानात येईल निपाणीमध्ये साधी दुकानदारी चालवायची झाली तरी दुकानाचं भाडं, चार-पाच नोकर, एक-दोन लिहिणारी माणसं, गोडाउन्सची देखरेख, माल खरेदी करणारे अडते–ह्या सगळ्यांचा पगार, दुकानाचा खर्च, आमचं मुंबईला जाणं येणं, व्यापारासाठी करावा लागणारा इतर प्रवास, गाड्या सांभाळायचा खर्च, हे सगळं नफ्यातूनच वजा होतं ! समजा, आम्ही एक कोटी रुपयाचा व्यापार केला तर आम्हाला फक्त पाच लाख रुपये उरतात. व्यापारी थोडे-फार पैसे मिळवू शकतो, नाही असं म्हणता येणार नाही

प्रश्न : तुमच्याकडून प्रक्रिया केलेला जर्दा घेऊन त्यापासून विडी

तयार करणाऱ्या कारखानदाराचं रुपयामागे नफ्याचं प्रमाण काय असतं ?

मानवी : त्याचं तरी काय असणार हो ? असंच की, आमच्या सारखंच ! अलीकडे सगळेच खर्च वाढले आहेत. जो तबाखू इथून पाठवायला आम्हाला पंधराशे रुपये भाडं द्यावं लागायचं तेच आज पंचवीसशे रुपये द्यावं लागतं ! म्हणजे तयार माल इकडून नेण्याचा खर्च वाढला. पूर्वी एक किलो जर्दा बनवायला चार आणे खर्च यायचा आता तोच खर्च आठ आणे झाला. म्हणजेच विडीकारखानदाराना तयार तंबाखू अर्थातच आता महाग घ्यावा लागतोय !

शेतात पिकलेला तंबाखू विकत घेतल्यापासून त्यावर प्रक्रिया करून तो पोत्यात भरेपर्यंत किलोमागे एक रुपया पचावन्न पैसे इतका खर्च येतो. हा खर्च आमच्यावर पडत नसतो, विडीकारखानदाराला तो द्यावा लागतो.

विडीकारखानदाराला आणखी एक तोटा सहन करावा लागतो. समजा, त्याला पावसाळयात तंबाखू वजन करून दिला आणि त्यानं तो ठेवला तर उन्हाळयात पोत्यामागे दोन किलो वजन घटतं ! आता त्यानं उन्हाळयात तबाखू खरेदी करून पावसाळयात पुन्हा वजन केलं तर पोत्यामागं दोन किलो वजन वाढतं हेदेखील खरं आहे—म्हणजे काय तर हवामानाप्रमाणे वजनात फरक पडतो. समुद्र-काठाला तंबाखूच्या वजनात वाढ होते. तंबाखूची पोती नुसती बोटीनं पाठवली तरी पोत्यामागे दोन किलो वजन वाढतं ! विडीकारखान-दारानं चागल्या प्रतीचा तंबाखू जर खरेदी केला तर सगळा खर्च लक्षात घेता त्याला तयार तंबाखू बारा ते पंधरा रुपये किलोच्या हिशोबानं पडतो. पाच हजार विडीला दोनशे ग्रॅम तंबाखू लागतो—तो त्याला तीन रुपयाला पडतो असं समजायला हरकत नाही.

आता विडीसाठी जे पान लागतं त्याचे दर खूप वाढले आहेत. मागच्या वर्षी ओरिसामध्ये जो लिलाव झाला तो बारा रुपये किलो-प्रमाणे झाला. कमी दर्जाच्या पानांचा लिलाव सहा रुपये किलोनं झाला. पाच हजार विडीला सहाशे-सातशे ग्रॅम पान लागतं—चागल्या प्रतीचं पान असल्यास ! हलक्या दर्जाचं पान कधीकधी एक किलो-पर्यंत देखील लागतं, विडीच्या पानाची किंमत यंदाच वाढली. पूर्वी सर्वसाधारणपणे तीन रुपये किलो असा दर असायचा.

आता सगळेच दर वाढले. विडी कामगाराची मजुरी वाढली, लेबलचा खर्च ... असं सगळं होत होत सगळयाचा जर विचार केला तर हया विडीकारखानदाराना एक हजार विडीमागं एक रुपया नफा होत असेल. जास्तीत जास्त एक रुपया ! आणि तरीदेखील बोनस, लेबर प्रॉब्लेम हया सगळयाला त्यांना सतत तोड द्यावं लाग-तच. एकूण काय, त्यांचही काही फार सुखाचं आणि फायद्याचं आहे असं म्हणता येणार नाही. आमचं काय म्हणणं आहे, आज तंबाखू शेतकऱ्याला दर वाढवून दिला तर आमची काही हरकत नाही— द्या वाढवून ! विडीकारखानदाराना आम्ही चढ दरानं तयार तंबाखू विकणार ! ते विडी महाग करून विकणार ! आमचं काय जातंय त्याच्यामध्ये ?

हयात आणखी एक भानगड आहे. लेबल असलेल्या विडीला हजारी तीन रुपये साठ पैसे इतकी सरकारी ड्यूटी भरावी लागते. बिगर-लेबलच्या विडीला ही ड्यूटी भरावी लागत नाही. रोज पन्नास-साठ हजार विडी बाधणाऱ्या छोटया कारखानदाराना हा धंदा किफायत-शीर व्हावा म्हणून सरकारनं ही सवलत ठेवली आहे. त्यामुळं लेबल-वाल्या विडीचा दर वीस रुपये असेल तर बिगरलेबलवाला सतरा रुपयाना विकू शकतो.

आता ह्या सवलतीचा गैरफायदा घेणारे अनेक विडीकारखानदार आहेत. बिगरलेबलची विडी विकत घ्यायची आणि लेबल चिकटवून महाग विकायची हा एक मोठा किफायतशीर धंदा आहे.

पण चागले विडीवाले असला प्रकार करत नाहीत. ज्याना एका विडीमागे दोन पैसे नफा सुटतो, ते असल्या भानगडी करत नाहीत. गणेश विडी बनविणारा दरवर्षी एककोटी पचाण्णव लाख रुपये इन्कम-टॅक्स भरतो. तो असले धंदे करत नाही. त्याला आहे त्याच्यातच भरपूर नफा सुटतो. तो कशाला असले उद्योग करणार ?

आता आमचा सगळा धंदाच उधारीचा असतो. एक एक विडी कारखानदाराकडे आमची सत्तर-ऐंशी लाखाची उधारी असते. अर्थात हया उधारीवर आम्हाला व्याज मिळत असत. हे आम्ही मानतो. पण हया धंद्यात ‘ रिस्क ’ फार. हे जोपर्यंत ठीक चाललय तोपर्यंत चांगलं दिसतंय !

प्रश्न : तुम्ही सुरुवातीला म्हणालात की, शेतकरी आता शहाणा झालाय. काडी-माती सूट, हवासूट, काटासूट वगैरे तो आता ऐकत नाही आणि वजनदेखील काटकोरपणे केलं जातं. क्षणभर तुमच म्हणणं खरं आहे असं आपण समजू, पण स्वातंत्र्य मिळाल्यापासून आतापर्यंत तेहतीस वर्षे व्यापाऱ्यानी रिवाजाच्या नावाखाली शेत-कऱ्याला लुटलं हे तरी खर को नाही ?

मानवी : छे ... छे ... अहो, हया सुटी वगैरे रिवाज एक्साईजचा कायदा तबाखूला लागू केल्यापासूनच बद झाले. फार पूर्वी हे रिवाज होते, पण १९४३ साली तबाखूवर एक्साईजचं नियंत्रण आलं आणि तेव्हापासून हे सगळे रिवाज बद झाले. तेव्हापासून शेतकऱ्याच्या तबाखूचं वजन, हिशेब वगैरे सगळं सेन्ट्रल एक्साईजच्या इन्स्पेक्ट-रच्या समक्षच केलं जायचं. शेतकऱ्याला फसविण्याचा प्रश्नच नव्हता !

प्रश्न : त्या काळची असल्या खात्याची सरकारी माणसं सर्वसाधा-रणपणे ‘ विकत ’ घेता येण्यासारखी असावीत का ?

मानवी : अहो विकत सगळयानाच घेता येत. आजसुद्धा कुणाला विकत घेता यत नाही सागा ! कुठल्याही माणसाला विकत घता येतं.

आता आमच्या व्यापारी क्षेत्रात बऱ्यावरोबर वाईट गोष्टीदेखील आहेत. सगळेच पवित्र होते किंवा आहेत असं मी म्हणत नाही — — परतु आता हे जे शेतकरी आंदोलन (नासिक) वगैरे सुरू झालय हे काही फारस बरोबर आहे असं आम्हाला वाटत नाही.

आता ऊसाला तीनशे रुपय भाव दिला तर आम्हाला साखर सहा

**पण या धंद्यात ‘ रिस्क ’ फार. जोपर्यंत ठीक चाललंय तोपर्यंत चांगलं दिसतंय !**

रुपये किलोनं घ्यावीच लागणार की नाही ? उद्या तंबाखूला वीस रुपये किलो दर मागितला तर विडी त्या प्रमाणात महाग होणार–आमचं त्यात काय जाणार ? काहीच नाही. पण तुम्ही जे म्हणता की आम्ही शेतकऱ्याची लूट करतो ते मात्र चुकीचं आहे !

आमच्या निपाणी भागातील शेतकरी फार शहाणे आहेत. ते आमच्यासारख्या व्यापाऱ्याना दबून रहाणार नाहीत, सहजासहजी लुटू देणार नाहीत. इकडच्या शेतकऱ्याचा माल चोख असतो, त्याला लुटण्याचा प्रश्नच येत नाही. व्यापाऱ्याला 'कॉपेनसेट' करण्यासाठी वेगवेगळया सुटीचे रिवाज ठरवलेले असतात. तुम्ही ह्या रिवाजाबद्दल उगाचच गैरसमज करून घेतलाय. आता एका भागात चोवीस किलोचा मण हा रिवाजच आहे, त्यात दोन किलो काढीमाती सूट धरावीच लागते. शेतकऱ्यानीच केलेला रिवाज आहे तो !

आता कापशी भागात वीस किलोचा मण असा रिवाज आहे–हे रिवाज किंवा वेगवेगळया ज्या सुटी धरल्या जातात त्या शेतकऱ्याबरोबर 'निगोसिएशन्स' करून ठरविल्या जातात. इथं कुणावरही बळजबरी नसते. उलट आम्हीच शेतकऱ्यांना सागत असतो की, माल जरा स्वच्छ करून आणा, तुम्हालाच चांगला भाव मिळेल. पण शेतकरीच आम्हाला सागतात, काही तरी एक-दोन किलो सूट धरून घेऊन टाका की हो ! मग आमचा नाइलाज होतो.

प्रश्न : शेतकऱ्याला पैसे हवे असतात म्हणून तंबाखू विकायची घाई झालेली असते आणि म्हणूनच तो ह्या निगोसिएशन्स मान्य करतो ना ?

मानवी : छे, छे. त्याला अजिबात घाई झालेली नसते ! आम्ही त्याचा माल घ्यायचा ठरवल्यानंतर दोन दोन महिने तंबाखू शेतकऱ्याच्या घरीच पडून असतो. तो माल घेऊन जा म्हणून आम्हाला कधीच घाई करत नाही !

प्रश्न : अहो, पण तंबाखू विकल्याशिवाय घरी खायला नाही अशी त्याची परिस्थिती असताना ते माल विकण्याची घाई करत नाहीत हे जरा आश्चर्याचं आहे !

मानवी : अहो, आमच्याकडून पैसे घेऊन जातात ना लागतील तितके ! ह्या धद्यात काय आहे, एकदा सौदा ठरला की सहसा मोडत नाही. शेतकऱ्यानी अमुक इतका तंबाखू अमुक इतक्या किमतीला एखाद्याला विकायचा, असा सौदा ठरला की शेतकरी तो सौदा मोडत नाही. त्याबाबतीत इकडचे शेतकरी इमानदार आणि चागले आहेत.

मार्केटमध्ये जेव्हा तेजी किंवा मदी होते तेव्हा आम्ही कधी सौदा झाल्यानंतरदेखील शेतकऱ्याला सागतो की मंदी आहे, तुम्ही आम्हाला आता एखाद किलो चढ द्या ! ते खुषोनं देतात ! अशा प्रकारची ही सर्वसाधारण पद्धत आहे.

आता इतर सागायचं म्हणजे, तंबाखूची जी सुधारलेली नवीन जात आहे ना, त्याचे प्रयोग करणारे शेतकरी चागलं उत्पादन काढतात. ही नवीन जात गुजराथमधून आली आहे. त्याचं उत्पादन जास्त येतं; पण इकडच्या स्थानिक जातीमधील गुणधर्म हायब्रीडमध्ये नाहीत. त्याचबरोबर पाणी देण्याची सोय असल्याखेरीज ह्या नवीन जातीचं पीक येत नाही. रासायनिक खतं पण वापरावी लागतात आणि एकदा तुम्ही ही रासायनिक खतं वापरायला लागलात की पुढच्या वर्षीपासून ती वापरत रहाणं भागच पडतं. नाही तर काहीच पीक येणार नाही !

इथं आम्ही पारंपारिक पद्धतीनं म्हणजे प्रथम ताग पेरायचा, तो जमिनीत गाडून मग शेणखतं वापरायची. त्यामुळं ज्या उत्तम दर्जाचा तंबाखू पिकतो त्याची सर रासायनिक खतं घालून काढलेल्या ह्या हायब्रीड तबाखूला नाही ! तबाखूच्याबाबतीत गुजराथबरोबर आमची मोठी स्पर्धा असते. रुपयातला दोन आणे तंबाखू निपाणीला पिकतो; पण विडीवाल्याना स्वादासाठी निपाणीचा तंबाखू घ्यावाच लागतो. गुजराथच्या तंबाखूला असा स्वाद नाही. गुजराथच्या तंबाखूमध्ये निपाणीचा तबाखू मिसळला तरच विडीला स्वाद येतो. हा उत्तम दर्जाचा तंबाखू बेळगाव जिल्ह्यातील चिकोडी, हुक्केरी आणि गोकाक तालुक्यातील दहा-वीस खेडी इथंच प्रामुख्यानं पिकतो. आता यदाची परिस्थिती सांगायची म्हणजे ज्या तंबाखू पिकविणाऱ्या खेड्याना हिडकल धरणाच्या पाटाचं पाणी मिळणार ती गावं तंबाखू करायचं सोडून देणार हे निश्चित. यंदा उसाला भाव मिळाला तेव्हा पाण्याची सोय असलेले शेतकरी तंबाखूच्या भानगडीत पडणारच नाहीत–ते ऊस लावणार ! आता माझंच उदाहरण घ्या, यंदा मी दोन एकर ऊस लावला होता, बाकीचा सात-आठ एकर तंबाखू–पण आता मी दहा एकर ऊसच लावणार ! तंबाखूत असा किती फायदा सुटणार ?

¤

तंबाखूचे प्रतिष्ठित व्यापारी गोविंदराव मानवी ह्यांची मुलाखत आटोपून मी आणि सुभाष जोशी घराकडं परतत होतो. एक अॅम्बॅसॅडर गाडी भरधाव वेगात आम्हाला ओलाडून पुढ गेली आणि काचकन ब्रेक मारून थाबली. 'अहो जावईबापू, तुम्ही इकडं कुठं ?' असं म्हणत एक पन्नाशीचे गृहस्थ गाडीतून उतरले आणि संथ हसत माझ्या दिशेनं पावलं टाकत आले.

हे कोण ?–आणि जावईबापू म्हणून कुणाला हाक मारताहेत ? प्रथम मी ओळखलंच नाही आणि मग एकदम ट्यूब पेटली. हे माझ्या सासऱ्याचे खास स्नेही ! माझ्या बायकोला–सरोजाला–हे स्वतःच्या मुलीप्रमाणे मानत. निपाणीच्या परिसरात ह्याची मोठी शेती होती. ह्या भागातील ते एक प्रसिद्ध जमीनदार ! माझे सासरे त्याना थट्टेने 'जहागीरदार' म्हणायचे. त्याचा एकूण रुबाब नेहमी जहागीरदाराप्रमाणेच असायचा ! लहानपणी सरोजा दिवाळीच्या सुटीत अनेक वेळा ह्याच्या गावी गेलेली. सुमारे दहा वर्षांपूर्वी आपली सर्व शेती विकून, निपाणी सोडून त्यानी दुसरा व्यवसाय सुरू केल्याच मी ऐकलं होतं. सुभाष जोशीला ते अर्थात ओळखतच होते.

माझ्या पाठीवर जोरजोराने थापटत ते म्हणाले–'इथं निपाणीत कुठं ? आणि सरोजा कुठं आहे ? मुली ?–आणि सुभाष जोशीच्याबरोबर कुठं निघालात ? आमच्या घरी जाऊन आलात की नाही ? इथं किती दिवस मुक्काम ? कोल्हापूरला थाबलात ? डॉक्टर (म्हणजे माझे सासरे) काय म्हणतात ? बेळगावला जाणार का ? आईची तब्येत कशी ?'

'जागीरदार'साहेबाची ही खासियत. उत्तराची वाट न

बघता नुसती प्रश्नाची सरबत्ती करणं! ते श्वास घेण्यासाठी थांबले तेव्हा सुभाष म्हणाला, 'चला घरी–तिथं निवांत गप्पा मारता येतील!'

सुभाषच्या घरी सुनीताअक्का चहा आणेपर्यंत मी त्यांना माझ्या निपाणी–दौऱ्याची थोडक्यात माहिती दिली आणि आत्ताच गोविंदराव मानवीची मुलाखत घेतल्याचंही सांगितलं. सचिंत चेहऱ्यानं ते म्हणाले, 'संभाळून. तुला इकडची विशेष माहिती नाही. माझं आयुष्य इथं उजाड व्हायची वेळ आली म्हणून तर मी निपाणी सोडलं. हे व्यापारी फार नीच आहेत!'

त्यांना तंबाखू हा विषय अजिबात नको होता; पण मी बळे-बळेच त्यांना अनेक प्रश्न विचारून बोलतं केलं. पूर्वीच्या अन्याय-कारक आठवणींनं काहीसं चिडून पण उद्विग्नपणे ते म्हणाले–

'तबाखूची शेती किफायतशीर होत नाही ह्याला सर्वस्वी जबाबदार निपाणीतील तबाखू व्यापारी आहेत. आम्ही कितीही चांगला तंबाखू पिकवला तरी We were at the mercy of these traders. 'टोबॅको किंग' देवचंदशेठ आणि चार पाच इतर व्यापाऱ्यांची ह्या व्यवहारात 'मोनॉपॉली'! अरे, सामान्य शेतकऱ्याच्या अडचणी काय असतील हे तर विचारूच नकोस; आम्ही जे काही स्वतःला प्रतिष्ठित म्हणवून घेणारे होतो ना, त्यांची अवस्थादेखील तोंड दाबून बुक्क्यांचा मार अशी! तुझ्या सासऱ्यानादेखील ह्याची कल्पना नाही, वास्तविक ते माझे जवळचे स्नेही; पण त्यांना आमची खरी परिस्थिती सांगायची कुठल्या तोंडानं? ते आम्हाला जागीरदार म्हणायचे. आम्हीही खोटा रुबाब करत मिरवायचो; पण काही खरं नव्हतं!

'आज तुला म्हणून सांगतो, सत्तर-पंचाहत्तर हजार रुपयांचा तंबाखू मी पिकवायचो; पण ह्या नीच व्यापाऱ्यांनी मला कधी एक रकमी पाच हजार रुपये दिलेलं स्मरत नाही! पैशासाठी सदा ह्यांचे पाय धरावे लागायचे. दहा खेटे मारावे तेव्हा हजार पाहिजे असतील तर हे हातावर दोनशे टिकवणार! असले हे हरामखोर!

'अरे, तुला सांगितलं तर खरं वाटणार नाही; पण माझ्या मुलीचं लग्न ठरवलं तेव्हा ह्या व्यापाऱ्यांना विचारून मला मुहूर्त काढावा लागला. माझे पन्नास हजार रुपये व्यापाऱ्यांकडून येणं होतं; पण मागायची सोय नाही. त्याला सांगितलं, मुलीला दागिने करायचे आहेत. म्हणाला, कितीचे? मी म्हटलं पंचवीस हजाराचे! हा म्हणतोय, इतके कशाला? दहाचे करा!–ऐकून घेण्याशिवाय गत्यंतर नाही. बरं हे दहा हजार तरी रोख देणार? छ, नाव नाही! हा त्याच्याच भाईबंद सराफाला चिठ्ठी लिहून देणार ती घेऊन आम्ही कुत्र्यासारखं सराफाच्या दारात जायचं, तो देईल ते दागिने घेऊन मुकाट परत यायचं! हे नको, ते नको म्हणायचं नाही. लग्नासाठी कापड खरेदी करायचं, अहेर घ्यायचा–सगळी यादी व्यापाऱ्याला दाखवायची. तो कापडदुकानदाराला चिठ्ठी लिहून देणार–तो देईल तो माल मुकाटयानं घ्यायचा. आम्ही कसे दिवस काढले आमचे आम्हाला माहीत! इतरांच्या दृष्टीनं आम्ही मोठे जमीनदार, जहागीरदार–पण ह्या व्यापाऱ्याच्या दारातील कुत्र्याइतकीदेखील आम्हाला किंमत नसायची!

'हे व्यापारी अत्यंत हलकट आणि नीच आहेत. तू ह्यांच्या फंदात पडू नकोस. अभ्यास करायला तुला तंबाखू हा एकच विषय सापडला? –ह्याचा नाद सोड आणि दुसरीकडं कुठं तरी जा! माझं एवढं ऐक!'

माझ्या सासऱ्याचे हे स्नेही अचानक भेटले. काही मिनिटांच्या बातचितीमध्ये त्यांनी तबाखू शेतकऱ्याची नेमकी व्यथा सांगितली आणि चहा पिऊन होताच ते निघून गेले. निपाणीतील एक-एक नवलकथा ऐकत असताना माझ्या मनातील प्रश्नांचा गुंता बराचसा सुटत चालला होता–चित्र बरंचसं सुस्पष्ट होऊ लागलं होतं. □

थंडीचे दिवस असूनही दुपारच्या हवेतील उष्मा जाणवण्याइतका कडक होता. आमची गाडी एका धुळीच्या रस्त्यानं अकोळच्या दिशेनं चालली होती. दुतर्फा तबाखूची शेतं. अनेक शेतामधून खुडणी झालेली. काही ठिकाणी तंबाखूची पानं वाळायला टाकलेली. क्वचित एखादं उसाचं शेत. परिसर तसा बराचसा उजाड आणि उघडा-बोडकाच.

निपाणीतील एक नंबरचा सर्वोत्कृष्ट दर्जाचा जवारी तंबाखू ज्या नावानं देशभर प्रसिद्ध आहे तेच हे अकोळ गाव. अकोळच्या तंबाखू पिकविणाऱ्या शेतकऱ्यांच्या तरुण मुलांनी युवक संघ स्थापन करून १९७३–७४ सालापासूनच तबाखूच्या लढ्याची पायाभरणी केली. निपाणीतील प्रसिद्ध तंबाखू दलाल देवचंद शहा हे अकोळचे सुपुत्र; पण त्यांचा ह्या गावावर राग फार!

मला अकोळच्या युवक सघाच्या कार्यकर्त्यांना भेटायचं होतं. तंबाखूच्या लढ्याची माहिती विचारायची होती. आम्ही एका जुन्या वाड्यासारख्या दिसणाऱ्या इमारतीत शिरलो. एका प्रशस्त खोली-मध्ये, एका कोपऱ्यात पाच-पन्नास तंबाखूची पोती आणि मध्यभागी अंथरलेल्या जाजमावर अकोळच्या युवकसंघाचे कार्यकर्ते आणि पाच-पन्नास तंबाखू उत्पादक शेतकरी. एकाच्या हातात प्लास्टिकचं व्यवस्थित कव्हर घातलेलं, 'माणूस' दिवाळी अंकातील 'योद्धा शेतकरी'चं टाचण. त्या लेखाचे लेखक अशी सुभाष जोशीनं माझी थोडक्यात ओळख करून दिली. चर्चेला सातान्याचे शेटके, आय. एन. बेग, जक्काप्पा, डॉ. पाटील, गनी पटेल, नाईक वगैरे मंडळी उपस्थित होती गोपीनाथ धारियादेखील होते.

मी सुरुवातीलाच सर्वांना स्पष्टपणे सांगितलं–'शरद जोशींनी नासिक आंदोलन उभं केलं तेव्हा मी आणि माझी बायको त्यांच्या-बरोबर अनेक दौऱ्यावर गेलो. एकोणीस दिवस चाललेलं आंदोलन आम्ही जवळून अनुभवलं; पण शेतकऱ्याला त्याचा उत्पादनखर्च भरून मिळत नसल्यामुळं त्याची शेती किफायतशीर होत नाही ह्या एका मूळ सिद्धांताशिवाय मला जास्त माहिती नाही. माझी स्वतःची शेती नाही. आम्ही बाल्कनीमध्ये एखाद्या कुंडीमध्ये तुळशीचं रोप लावलं तर तेदेखील धड उगवेल ह्याची गॅरंटी नाही. तंबाखूशेतीची काडीचीही माहिती नाही–ह्या दोन दिवसात झाली असेल तेवढीच. तंबाखूचा संबंध सिगरेट ओढणे आणि पान खाणे इतकाच! तुम्ही

**'माझं आयुष्य इथं उजाड व्हायची वेळ आली म्हणून तर मी निपाणी सोडलं!'**

अकोळला पूर्वी तंबाखूचं आंदोलन करण्याचा एक प्रयत्न केलात असं समजलं, त्याविषयी विस्तारानं जेवढं सांगता येईल तेवढं ऐकवा–'

'योद्धा शेतकरी'च्या लेखकाला बाल्कनीमध्ये साधं तुळशीचं रोप वाढवता येत नाही हे ऐकून अकोळचे मुरब्बी शेतकरी काहीसे 'नर्व्हस' झाले असावेत! कुणीच तोंड उघडेना मी सिगरेट पेटवून मजेत नाकातोंडातून धूर काढत थांबलो! बराच वेळ शांतता. कर्र-कर्र असा जकाप्याच्या अडकित्त्याचाच काय तो आवाज. त्यानं बारीक कातरलेली सुपारी तळहातावर ठेवली तेव्हा 'सर' काहीसं चेष्टेनं म्हणाले–'आम्ही काही मुलगी बघायला आलो नाही–तंबाखूबद्दल बोलायला आलोय आणि तुम्ही बोलायचं आहे–आम्ही नुसतं ऐकणार, मधून मधून प्रश्न विचारणार–करा सुरू!'

सराचा इशारा मिळताच एकदम चार-पाच जणं बोलू लागले. प्रत्येकाला ह्या विषयावर अर्थातच खूप बोलायचं होतं आणि ते देखील पोटतिडिकीनं; पण सगळेच एकदम बोलू लागले तर काहीच समजणं शक्य नव्हतं. मी हात उचावून विनंती केली–'कृपा करून एका वेळी एकानच बोललं तर बरं!' पुन्हा शांतता. त्यानंतर 'तुम्ही बोला–तू सांग' वगैरे एकमेकाना आग्रह आणि मग घसा खाकरून एक जण सांगू लागला–

'आम्ही तंबाखूचे शेतकरी नुसती तंबाखूच पिकवत राहिलो. आमच्या तंबाखूला योग्य दर मिळाला पाहिजे हे आमच्या आधी कधी डोक्यातच आलं नाही. अकोळला आम्ही जे आंदोलन केलं ते देखील योग्य भाव मिळावा म्हणून नव्हे. आम्ही आंदोलन केलं ते तंबाखूची खरेदी करताना वेगवेगळ्या रिवाजाच्या नावाखाली शेतकऱ्यावर जे अन्याय होतात ते दूर व्हावेत म्हणून! उत्पादन-खर्चाच्या हिशेबात भाव मिळाला पाहिजे हे तेव्हा आमच्या ध्यानात-तच आलं नाही!

'त्या वेळी तंबाखूची खरेदी मणाच्या हिशेबानं व्हायची, किलोच्या नाही अकोळला सतरा किलोचा मण, अकोळपासून तीन मैलावर खडकलाट ह्या गावी वीस किलोचा मण, सदलग्याला अठ्ठावीस किलोचा मण! खरेदी-विक्री किलोच्या हिशेबात व्हावी हा मार्केटकायदा होऊन अनेक वर्षं लोटली तरी त्याची अंमलबजावणी निपाणी परिसरातील तंबाखू खरेदीच्या वेळी केली जात नव्हती.

'रिवाजाच्या नावाखाली सर्व व्यवहार मणाच्या हिशेबात, प्रत्येक गावचा मण वेगळ्या किलोचा आणि प्रत्येक मणाचा दर देखील वेगळा! म्हणजे अकोळच्या सतरा किलोच्या मणाला पंचाहत्तर रुपये भाव असेल तर खडकलाटच्या वीस किलोच्या मणाला साठ रुपये! असला विचित्र प्रकार शेतकऱ्यानी व्यापाऱ्याला असं का? म्हणून विचारायचं नाही. रिवाजाच्या नावाखाली गप्प बसायचं हा देखील रिवाजच!–तर हा रिवाज मोडावा म्हणून आम्ही पाच-सहा वर्षांपूर्वी आंदोलन केलं. व्यापाऱ्यानी मणाऐवजी किलोमध्ये व्यवहार करायचं मान्य केलं–पण एक किलो तंबाखूचा काय भाव असावा हे मात्र व्यापारीच ठरवणार!'

निपाणीमधील तंबाखूचे प्रतिष्ठित व्यापारी गोविंदराव मानवी हे तर म्हणत होते की, १९४३ सालापासून सर्व 'रिवाज' बंद झाले होते. वजनदेखील किलोवर आणि काटेकोरपणे केलं जातं; पण अकोळचे शेतकरी दुसरच काही सांगत होते. 'रिवाज' मोडण्यासाठी त्यांना अगदी पाच–सहा वर्षांपूर्वीदेखील आंदोलन करण्याची वेळ आली होती. यंदाच्या वर्षी तंबाखूला चांगला भाव मिळणं कठीण, असं गोविंदराव मानवींनी मुलाखतीत सांगितलं होतं, ते आठवून मी म्हणालो–

'ह्या वर्षी काही भागातील तंबाखू अवेळी पावसामुळं भिजला अशी बोंब आहे–किंवा व्यापारी मुद्दाम तशी बोंब मारत असण्याची शक्यता आहे. तंबाखू भिजून खराब झाला असेल तर एकूण-उत्पादन कमी येणार. चांगल्या तंबाखूचा तुटवडा असणार. तुटवडा असला तरच शेतमालाला चांगला भाव मिळतो असा सर्वसाधारण अनुभव. भुईमुगाचं उदाहरण शरद जोशी नेहमी देतात. भुईमुगाचं पीक बुडालं तर बाजारात शेंगेला चांगला दर मिळतो, अफाट पिकला तर भाव घसरतो. मागच्या वर्षी भुईमुगाचं पीक बुडाल्यामुळं शेतकऱ्याला अडीच–तीन रुपये भाव मिळाला–एरवी एक आणि दीड रुपया! यंदा काही भागातील तंबाखू खरोखरीच भिजल्यामुळं चांगल्या दर्जाच्या तंबाखूचं एकूण उत्पादन कमी येणार असेल तर न भिजलेल्या तंबाखूला चांगला दर मिळालाच पाहिजे!'

भिजलेल्या तंबाखूचं निमित्त करून यंदा व्यापारी शेतकऱ्याला *नाडणार ह्याची कल्पना अकोळच्या शेतकऱ्यांना निश्चितच होती.* युवक संघाचा एक कार्यकर्ता खिन्नपणे म्हणाला–

'तुम्ही म्हणता ते खरं आहे हो–तसं व्हायला पाहिजे, चांगल्या प्रतीच्या तंबाखूला ह्या वर्षी चांगला भाव मिळाला पाहिजे, हे सगळं खरं–पण प्रत्यक्षात तसं होणार नाही. ह्या वर्षी नको तेव्हा पडलेल्या पावसानं व्यापाऱ्याना आयतं निमित्त मिळालं आहे. न भिजलेला उत्तम प्रतीचा, अगदी मागच्या वर्षी साठवलेला तंबाखू जरी आम्ही विकायला काढला तरी हे व्यापारी म्हणणार–माल भिजलेलाच आहे! आणि भाव पाडून मागणार! शेतकऱ्यानं कितीही चांगला तंबाखू पिकवला तरी दरवर्षी काही तरी खुसपट काढून हे व्यापारी भाव पाडूनच खरेदी करतात.

'पूर्वी काही शेतकऱ्यानी तंबाखूच्या सरीमधून मिश्र पीक म्हणून ज्वारी पेरली. तेव्हढाच दोन–चार पोती घरचा जोंधळा आणि जनावराना कडबा म्हणून! हे व्यापारी लगेच कुरकुर करू लागले, तुम्ही तंबाखूत शाळू पेरलाय, त्यामुळं तंबाखूचा स्वाद कमी झालाय. निकोटीनचं प्रमाण घटलय! एक ना दोन, काय वाटेल ते म्हणू लागले. शेतकऱ्यानं वैतागून मिश्र पीक घ्यायचंच सोडून दिलं. काही शेतकऱ्यानी तंबाखू लावायचंच सोडून दिलं. एक–दोघांनी जमिनी विकून, शेतीचा व्यवसाय नको म्हणून बेळगावचा रस्ता पकडला! इकडच्या व्यापारी–दलालाची तंबाखू-शेतकऱ्यावर फार मजबूत पकड आहे.

'आता ह्या वर्षी कसलाही तंबाखू त्याच्याकडं नेला की ते म्हणणार, भिजलेलाच आहे! आम्हाला नको!, देणार तर आम्ही सांगू त्या दरानं दे! काही तरी निमित्त करून दरवर्षी शेतकऱ्याला अडचणीत आणायचं असच ह्यांचं धोरण!

'जानेवारी महिन्यात, म्हणजे आत्ता तंबाखूची कापणी सुरू झाली की फेब्रुवारी अखेरपर्यंत शेतकरी घाईला आलेला असतोय. कडब्याला पैसे, धान्याला पैसे, लग्नाला पैसे, मुंजीला पैसे अशी त्याची अवस्था असते; पण हे व्यापारी सरळ सांगतात की, मार्च महिन्यात बजेट फुटल्याखेरीज आम्ही दर काढणार नाही. खरेदी सुरू करणार

नाही. म्हणजे ह्यांनी काढलेला दर तंबाखूच्या प्रतीवर नसून बजेट-वर असतो !

'पूर्वी पद्धत वेगळी होती. तंबाखूचा फड उभा असताना—म्हणजे दसरा-दिवाळीच्या सुमारास—त्या वेळी शेतामध्ये तंबाखू अगदी जोरात असायचा. त्या वेळी हे व्यापारी स्वत गावोगावच्या शेतावर फिरायचे. तेव्हा ह्या व्यापाऱ्यानादेखील थोडे कष्ट करायची सवय होती. आतासारखे ते मोटारीत बसून फिरायचे नाहीत !

'गावोगाव हे लोक अगोदर 'चिल्लर' व्यापारी म्हणून आपआपले कारकून घेऊन आले आणि हळूहळू स्थायिक झाले. तेव्हा ते आमच्यात मिळून-मिसळून वागायचे. त्याचं खाण-पिणं, वागणं, रहाणं आणि आमचं जीवनमान ह्यात काहीही फरक नव्हता. आमच्यासारखेच ते !

'आता मात्र पूर्वीचे हे सगळे चिल्लर व्यापारी कोटयाधीश झालेत आणि आम्ही भिक्षाधीश ! आता आम्हाला उमजायला लागलंय की, आमचंच लुटून हे लोक लक्ष्मीपती झालेत आणि आम्ही असे नंगे फकीर होऊन फिरतोय !

'सांगायचा मुख्य मुद्दा काय, तर त्या काळी हे व्यापारी शेतीची पहाणी करायचे. एखादा शेतकरी अर्धा-पाऊण एकरवाला असला तर विचारायचे, 'तुझा फड कितीला ? शेतकरी जर म्हणाला पंधराशे, तर व्यापारी म्हणायचा बाराशेला ठरला ! तुझा तंबाखू घेतला ! कापून आणून वखारीत टाक !

'शेतकरी त्याप्रमाणे तंबाखू नेऊन टाकायचा आणि मिळतील तेव्हा, मिळतील तितके पैसे घेऊन घर चालवायचा, खर्च रेटायचा. व्यापारी आपल्याला जरूर पडेल तेव्हा खर्चापुरते पैसे देतो हे जणू उपकारच करतो, अशी शेतकऱ्याची भावना असायची.

'१९४०–४२ च्या सुमारास तंबाखूवर ड्यूटी बसली, एक्साईजचा कायदा लागला तेव्हापासून खरेदीची ही पद्धत बदलली. हा कायदा झाल्यापासून तंबाखूचं उत्पादन किती, शेतामध्ये किती रोपं लावलीत, हे कळवण्याचं बंधन शेतकऱ्यावर आलं. शेतकरी त्याप्रमाणे एकरी लावलेल्या रोपाचा हिशेब ठेवू लागला. त्यानंतर तंबाखूची कापणी करून, वजन करून ते सरकारला कळवणं ह्याची जबाबदारीदेखील शेतकऱ्यावर आली. घरात ठेवलेल्या तंबाखूचं परमिट काढूनच तो व्यापाऱ्याकडे विकायला घेऊन जायचा, असं शेतकऱ्यावर बंधन असे. त्यामुळं पूर्वी तंबाखू शेतातच असताना दिवाळीच्या सुमारास जी खरेदी होत असे, ती प्रथमच जानेवारीला कापणी संपेपर्यंत हळूहळू लांबत, आता बजेटच्या निमित्तानं मार्च-एप्रिल इतकी उशीरा केली जाते.

'व्यापाऱ्यांचा उद्देश एकच-शेतकऱ्याला पैसे वेळेवर मिळू नयेत ! शेतकऱ्यानं सतत अडचणीत असावं आणि व्यापाऱ्यांचं मिंधं बनून जगावं ! जानेवारी ते मार्च हे तंबाखू शेतकऱ्याच्या जीवनातले तीन महिने अत्यंत हलाखीचे !

'सुरुवातीला तंबाखूला एक्साईज ड्यूटी एका किलोला दहा-बारा आणे होती – नंतर दीड रुपया झाली आणि अखेर साडेतीन-चार इतकी झाली. एवढी ड्यूटी वाढवून देखील सरकारला पैसे कमी पडू लागले तेव्हा तंबाखूवरची ड्यूटी उगीच थोडी कमी करून सरकारनं विडीवर ड्यूटी बसवली. एक हजार विडीला एक रुपया ! एक किलो तंबाखूची पाच हजार विडी तयार होते. त्यामुळं सरकारला तंबाखूपासून भरमसाठ उत्पन्न मिळू लागलं. विडीवरची ड्यूटी दोन रुपये केली की एका किलोमागं सरकारला दहा रुपये मिळू लागले. सरकारला ह्या पैशाची लालूच लागली. हे पैसे मिळवून देणाऱ्या तंबाखू पिकविणाऱ्या शेतकऱ्याची मात्र सरकारला जरासुद्धा फिकीर नव्हती. तो मेलाय का जगलाय ह्याची जरासुद्धा पर्वा नव्हती !

'ब्रिटिश सरकारनं ही जी एक्साईजची पद्धत सुरू केली ती स्वातंत्र्यानंतर आपल्या सरकारनं वाढवतच नेली.'

अकोळचा कार्यकर्ता हे सांगत असताना माझ्या मनात शरद जोशींची वाक्यं घुमत होती— —सत्तेचाळीस साली इंग्रज निघून गेले तेव्हा आपल्या येथील काही धूर्त आणि आपमतलबी लोकांच्या ध्यानात आलं की इंग्रज गेले तरी गंगा इथंच राहिली ! आता तिचा ओघ आपल्याकडे वळवून घ्यायचा... इतके दिवस इंग्रज जो फायदा लुटत होते तोच नफा आता आपण लुटायचा ! शेतकऱ्यांना लुटायची ही नामी संधी कोण वाया घालवणार ? आणि मग ह्या धूर्त मंडळींनी इंग्लंडसारखाच दुसरा एक देश आपल्याच भूमीवर तयार केला... त्याला आपण 'इंडिया' म्हणू ! आणि मग ही 'इंडियन' माणसं, इंग्रज ज्याप्रमाणं आमचं शोषण करीत होते, त्याच धर्तीवर आमचं रक्त पीत राहिली !' मन अस्वस्थ झालं होतं तरी प्रयत्नपूर्वक एकाग्रचित्त होऊन मी ऐकू लागलो. अकोळच्या युवकसंघाचा तरुण तंबाखू शेतकरी सांगत होता—

'पूर्वी तंबाखू हे दुय्यम दर्जाचं पीक होतं. ह्या भागातील शेतकरी ज्वारी, हरभरा, उडीद, भुईमूग हेच पीक अगोदर घेत असे. तंबाखू हे खालच्या जमातीतील लोकांनी लावायचं पीक असा एक समज त्या काळी रूढ होता सरकारला उत्पन्नाची जरूर भासू लागली तेव्हा त्यानं शेतकऱ्याला तंबाखू लावण्यासाठी प्रोत्साहन दिलं आणि ह्या भागात तंबाखूची शेती वाढत गेली.

'सुरुवातीला शेतकऱ्याला उडीद–हरभऱ्यापेक्षा तंबाखूमध्ये दोन पैसे जास्त सुटू लागले. ते पाहून सर्वच शेतकऱ्यांनी तंबाखू लावायला सुरुवात केली. जसजसं तंबाखूचं उत्पादन वाढत गेलं तसं व्यापाऱ्यांनी भाव पाडायला आणि शेतकऱ्याला नाडायला सुरुवात केली. त्याच सुमारास गुजरायमध्येदेखील तंबाखूचं अफाट पीक निघायला सुरुवात झाली. त्या जोरावर तंबाखूचे बहुसंख्य गुजराथी व्यापारी इकडच्या शेतकऱ्याला पाहिजे तसं नाचवू लागले. फक्त जगण्यापुरते पैसे मिळतील अशी व्यवस्था करून तंबाखू शेतकऱ्याला धड मरू देखील देईनात ! शेतकरी अशिक्षित, तंबाखू पिकवायला आपल्याला खर्च किती येतो ? भाव काय मिळाला पाहिजे ? हे त्याला काहीच कळेना.

'पूर्वी शेतकरी इतका तंबाखू लावीत नसे. माळरान जमिनीत भुईमूग असायचा, गुराढोरांना कडबा पाहिजे म्हणून थोडा जुधळा

**'पूर्वीचे हे सगळे चिल्लर व्यापारी कोटयाधीश झाले आहेत आणि आम्ही भिक्षाधीश !'**

असायचा, बागायत असेल तर घरच्यापुरता भात आणि गहू आणि उरलेल्या क्षेत्रात तंबाखू अशी प्रवृत्ती होती; पण निपाणीच्या विशेषत: अकोळच्या तंबाखूची ख्याती वाढत गेली. विडीला लागणाऱ्या जर्द्यात निपाणीचा जर्दा मिसळला नाही तर विडीला स्वादच येत नाही असं सर्व म्हणू लागले आणि त्यामुळं उत्पादन वाढत गेलं.'

हे ऐकत असताना माझ्या मनात उगाचच शंकेची पाल चुकचुकली. निपाणीचा तंबाखू मिसळल्याशिवाय विडी होत नाही किंवा विडीला स्वाद येतच नाही हे कितपत खरं आहे ? ह्याला काही शास्त्रीय आधार? आज निपाणीपरिसरात पूर्वीचा जवारी तंबाखू खरोखरच पिकतो का ? आजच्या विडीमध्ये गुजराथचा तंबाखू किती आणि निपाणीचा किती हे ग्राहकाला समजण्याचा शास्त्रीय मार्ग उपलब्ध आहे का ? निपाणीमधील मूठभर धूर्त व्यापारी लोकांनीच 'अकोळी जर्द्याशिवाय दर्जेदार विडी बनत नाही' अशी सोयिस्कर आणि किफायतशीर अफवा पसरवली असण्याची शक्यता ? आज निपाणी-मधील हेच तंबाखू व्यापारी गुजराथमधील लाखो किलो तंबाखू आठ आणे-रुपया दरानं खरेदी करून त्यामध्ये काही हजार किलो निपाणीचा 'दर्जेदार' तंबाखू मिसळून, हेच मिश्रण 'अकोळ नंबर एक' ह्या नावानं प्रख्यात विडीकारखानदाराना पंधरा-वीस रुपये किलोनी विकतात ना ?मग ह्यातील खरं काय आणि खोटं काय ? खरं-खोटं देवचंदशेठच जाणे ! कार्यकर्ता पुढं काय सांगतोय ते मी एकू लागलो. तो म्हणत होता—

'१९६० सालचं उदाहरण ! एक मण तंबाखूला तेव्हा सत्तर-पंचाहत्तर रुपये दर मिळायचा. समजा,एक एकरात वीस मण तंबाखू होत असेल किंवा त्याच ठिकाणी वीस मण जोंधळा निघत असेल, जोंधळ्याचं पोतं तेव्हा चाळीस रुपयाला मिळायचं !शेतकरी म्हणा-यचा, तंबाखू पिकवून त्या बदल्यात अर्ध्या किंमतीला ज्वारी मिळून गरज भागत असेल आणि वर चार पैसे हातात येत असतील तर ज्वारी लावाच कशाला ?—आणि मग सगळे शेतकरी संपूर्ण जमिनीत तंबाखूच लावू लागले.

'आमच्या भागात तंबाखूचं पीक वाटेकऱ्याला चौथाईनं देऊन लावायची पद्धत आहे. मालक निष्काळजी—त्यानं शेताकडे पाहिलं नाही तरी चालण्यासारखं. चौथाईच्या आशेनं वाटेकरी उत्कृष्ट पीक काढणार. त्यामुळं जे शेतकरी पूर्वी संतुलित शेती करून उडीद, हरभरा, भुईमूग, जोंधळा, भात, गहू आणि उरलेल्या क्षेत्रात तंबाखू अशा प्रकारे पिकं घ्यायचे ते सगळे नुसता तंबाखू लावू लागले.

'गुजराथमध्ये तंबाखूवर संशोधन होऊन नवीन संकरित जाती निर्माण करण्यात आल्या. उत्पादन भरमसाठ वाढू लागलं. निपा-णीच्या दर्जेदार आणि स्वाद असणाऱ्या तंबाखूबद्दल मात्र काहीच संशोधन झालं नाही. हे गाव दुर्दैवी—कर्नाटक महाराष्ट्राच्या सीमा-वादात अडकलेलं किंवा मुद्दाम अडकवून ठेवलेलं ! त्यात जाती-पाती, मराठी-कानडी असले अनंत वाद पुढाऱ्यांनी निर्माण करून ठेवलेले. कोणी म्हणतोय, भाषेचा प्रश्न सोडवा; दुसरा म्हणतोय, 'पाणवठ्या'चा प्रश्न अगोदर सोडवा ! जे राष्ट्रीय 'लव्हल' चे पुढारी इथं आले ते फक्त सीमाप्रश्नाबाबत बडबड करणारे. तंबाखू समस्येत कुणीही लक्षच घातलं नाही. सुभाष जोशीसारखे ताज्या दमाचे प्राध्यापक ह्या प्रश्नाचा अभ्यास करतात हा एकच अपवाद. सुदैवानं ते 'पुढारी' नाहीत.

'ह्या सर्व कारणांमुळे तंबाखू शेतकऱ्यांची एकी करणं ह्या परि-सरात महाकठीण होऊन बसलं. बेळगाव जिल्ह्यातील चार तालुके आणि सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातील चार तालुके एवढ्याच भागात तंबाखू हे प्रमुख पीक आहे. पण हे प्रमुख पीक घेणारा शेतकरी मात्र संघटित नाही. तो जरा संघटीत होतो असं दिसलं की, व्यापारी मंडळीच्या खिशातील नेतेमंडळींनी 'शिवाजीमहाराज की जय' म्हणायचं, पाच-पंचवीस तरुण कार्यकर्ते हाताशी धरून पंचवीस-तीस हजार रुपये उडवायचे आणि सीमा-प्रश्नाचं मढं उकरून काढायचं ! त्यांनी हे मढं उकरलं की, त्या वादात पाणवठावाले, जातीपुढारी, विषमता निर्मूलनवाले, शेतकरी विरुद्ध शेतमजूरवाले ह्यांनी आप-आपला गोंधळ घालून प्रसिद्धी मिळवायची ! सीमा-प्रश्नाच्या भुता-मुळं मराठी-कानडी वाद पेटायचा; त्यात ह्या समाजाची चिंता वाह-णाऱ्या इतर चळवळ्यांच्या उपद्व्यापाची भर ! भांडाभांडचा सुरू व्हायच्या आणि तंबाखू पिकविणाऱ्या शेतकऱ्याचा प्रश्न आपसूकच मागे पडायचा.

'शेतकऱ्यांचे आणि कष्टकऱ्यांचे प्रश्न डोकं वर काढू लागले की, दरखेपेला त्यांनी सीमा-चळवळीचं पिल्लू सोडलंच म्हणून समजा ! त्याचबरोबर चार-दोन निरुद्योगी समाजवादी भांडणात उतरलेच म्हणून समजा ! आम्ही अकोळला आंदोलन उभं करण्याचा प्रयत्न केला तेव्हादेखील हेच झालं आणि आतादेखील तेच होतंय, आम्ही इथं शेतकरी संघटित करण्याचा प्रयत्न करतोय तर पुढारीमंडळी सीमा-प्रश्नाचा वाद काढून बेळगावहून मुंबईला कधी मोर्चा काढा-यचा ह्याच्या योजना आखण्यात गुंतलीत ! '

¤

अकोळला जाण्यापूर्वी वाटत होतं, तंबाखू प्रकरणातील अनेक प्रश्नाचा गुंत सुटत चाललाय, चित्र स्पष्ट होऊ लागलंय, पण पर-तीच्या वाटेवर लक्षात आलं की, हा प्रश्न वाटतो त्यापेक्षा फारच कठीण आणि गुंत-गुंतीचा आहे. इथ सगळ्यांच्याच तंगड्या ऐक-मेकात अडकल्या आहेत.

आज संध्याकाळपर्यंत निपाणी सोडून पुणं गाठायचं होतं. अजून तंबाखू खरेदी-विक्री सहकारी संघ स्थापन करणारे एस. टी. चौगुले आणि विडी कामगार-स्त्रियांचं नेतृत्व करणारी वाघीण आयेशा दिवाण ऊर्फ 'चाची' ह्यांच्याशी बातचीत करायचं शिल्लक होतं.

(क्रमशः)


# व्हान गॉग

'लस्ट फॉर लाइफ' या आयर्व्हिंग स्टोनच्या जगप्रसिद्ध कलाकृतीचा मराठी अनुवाद

अनुवादिका : माधुरी पुरंदरे

प्रकाशक

प्रसाद पुरंदरे, पर्वती, पुणे

# रॉकी

## जैसा बाप वैसा बेटा

'बापाची गादी मुलानं चालवावी' असा आग्रह कायमच प्रत्येकाचा बाप धरत असतो. त्याप्रमाणेच तो मुलाला 'डेव्हलप' करत असतो. ही सर्वत्रैव पसरलेली सर्वमान्य पद्धती आहे. ह्या पद्धतीनुसार प्रत्येकाचा बाप वागत असतो आणि मुलगा त्याच्या इच्छेला 'आज्ञाधारक'या नात्याने मान तुकवत असतो; मग त्याच्या आवडी-निवडीचा, त्याच्या बौद्धिक क्षमतेचा, गुणात्मकतेचा विचार इथं अप्रस्तुत ठरतो.

आसपासच्या घरात डोकावलं तरी हेच दिसत. मग फिल्मी धंद्यात हे 'नामुमकीन' कसं ठरेल? इथे असल्या बापाची आपल्या मुलाना पुढे आणण्यासाठी सध्या स्पर्धाच लागली आहे.

काही वर्षांपूर्वी लागलेला राजकपूरचा 'बॉबी' हा चित्रपट आणि नुकतेच प्रदर्शित झालेले राजेंद्रकुमारचे 'लव्ह स्टोरी' आणि सुनील दत्तचा 'रॉकी' हे चित्रपट ह्या प्रवृत्तीचेच द्योतक आहेत. ह्याचा असा अर्थ नाही की बापाने मुलाला वाऱ्यावर सोडून द्यावं. परंतु त्याचबरोबर गुणात्मकतेचा विचार न करता केवळ पैशाच्या, पदाच्या ताकदीवर या 'राखीव जागा' तयार कराव्यात, मग तिथे स्वतःच्या मुलांचीच भरती करून यातून फक्त आपल्या मुलांचं पाहिजे तेवढं कोडकौतुक करून घेता येईल, जाहिरात करता येईल असं पहावं, हेही योग्य नाही.

चित्रपट पाहण्याचं व्यसन लागलेल्या काही प्रेक्षकांचा तात्पुरता प्रतिसादही याला मिळेल, परंतु त्याचा असा अर्थ नाही की, आपल्या मुलानं बापाचं नाव काढलं! खरं तर राजकपूर वगळता इतर दोघे नाव काढण्याइतकेही मोठे नाहीत. परंतु हे घडलं आहे. 'रॉकी' मध्ये सुनीलदत्तने आपला मुलगा संजयदत्तला, तर 'लव्ह स्टोरी'त राजेंद्रकुमारने कुमार गौरवला पुढं आणलं आहे. सध्या या फिल्म दुनियेत मुलाला, मुलीला नात्या-गोत्यातल्या पुतण्या-पुतणीला पुढे आणण्याची लाटच आली आहे. सरसकट सगळेच (नट-नट्या) आपल्या घरच्या मंडळीसह या लाटेत सामील झाले आहेत.

या धंद्याचं मर्म ओळखणारा राजकपूर या लाटेचा निर्माता आहे. काही वर्षांपूर्वी ऋषीकपूर या आपल्या मुलाला पुढे आणण्यासाठी राजकपूरने 'बॉबी' सादर केला.

चित्रपटाच्या कथेत नाविन्य नव्हतं. तीच चोथा झालेली प्रेमकथा, तारुण्यातील प्रेमाचा अवखळपणा, घरचा विरोध, प्रेमासाठी पळून जाणं वगैरे वगैरे. पण राजकपूरने ती अशा बहारीनं आणि सफाईनं सादर केली की 'बॉबी' हिट्ट ठरला.

काहीशा मॅगळट, थोराड आणि बेंगरूळ नटाच्या पिढ्या पचवून थकलेल्या प्रेक्षकाना *राजेश खन्नाने दिलासा दिला त्याच्या* 'फ्रेशनेस' मुळे. पण पुढे तोही एकसुरी ठरला. डालडाचा डबा पुन्हा पुन्हा पुसून ठेवल्यासारखा. या सर्वांवर मात करणारा 'अमिताभ युग' येण्यापूर्वीचा तो काळ! राजकपूरने वेळ साधली आणि सादर केली 'बॉबी'!

'बॉबी'च्या निमित्ताने ऋषिकपूर—डिंपल कापडिया ही शाळकरी जोडी 'राजदूत'च्या नव्या मोटारसायकलवर बसून रुपेरी पडद्यावर आली ती न फिटलेला प्रणय आणि नग्नता घेऊनच. प्रेक्षकांनी वारेमाप स्वागत आणि कवतीक केले, पण त्यामागे होते धंदेवाईक राजकपूरचे कसब. फिल्मी संगीताच्या लोकप्रियतेचं गमक ओळखलेल्या राजकपूरने संगीत, नाच, गाणी आणि तरुण पिढीची कोवळी उत्स्फूर्त आणि सहज प्रणयाची भूक लक्षात घेऊन आपल्या मुलाचे प्रणयी चाळे 'खुले आम' सादर केले. फिल्मच्या बाजारात 'बॉबी' खपला. हपापलेला प्रेक्षकही मिळाला. तात्पुरता का होईना, 'बॉबी' चा 'फ्रेशनेस' बरा वाटला.

'ट्रेंड मेकर' राज कपूरच्या 'बॉबी'चाही 'ट्रेंड' निर्माण झाला. पैशासाठी हपापलेल्या निर्मात्यांनी या संधीचा हवा तसा वापर आणि व्यापार केला. न फिटलेल्या, कोवळ्या नग्नतेच्या नावाखाली अर्धनग्न दृश्याची रेलचेल असलेले चित्रपट सादर केले!

पण 'बॉबी' सादर करण्यामागे राजकपूरचा मुख्य हेतू होता 'राज-नर्गीस' जोडीप्रमाणे 'ऋषी डिंपल' ही जोडी सादर करणं. राज कपूरच्या अभिनयक्षमतेबाबत मतभेद असू शकतात, पण ऋषिकपूरच्या अभिनयाबाबत मतभेदसुद्धा नाहीत. आणखी एका अभिनयशून्य नटाने या निमित्ताने हिंदी चित्रपटसृष्टीत प्रवेश केला. 'बॉबी'ला मिळालेल्या यशात त्या वेळी या बायकी, बेढब ऋषिकपूरची दखल कोणी घेतली नाही. पण पुढे काही वर्षांतच त्याचा निकाल लागला— तो टिकाव धरू शकला नाही. त्याचे चित्रपट एकामागून एक येत गेले, येत राहतील पण ऋषि कपूर हा लक्षपूर्वक दुर्लक्ष करण्याजोगा नट म्हणूनच गणला जाईल.

आणि आता 'लव्ह स्टोरी' व 'रॉकी'-च्या निमित्ताने पुन्हा हेच घडत आहे. कुमार गौरवला पुढे आणण्यासाठी राजेंद्रकुमार या एके काळी उगाचच यशस्वी ठरलेल्या नटाने 'लव्ह स्टोरी'त *पैसा ओतला आहे*, तर सुनील दत्त या बेंगरूळ नटाने 'संजय दत्त' साठी 'रॉकी'चा थाट मांडला आहे. राजकपूरच्या पावलावर पाऊल टाकून आपल्या मुलाचे पाय रोवण्यासाठी धडपडणारी ही मंडळी आज घसरली नाहीत तरी उद्या निश्चितपणे घसरणार आहेत. कारण पुन्हा गुणात्मकतेचा विचार न करता उतावीळपणे हे सर्व चाललं आहे.

आता 'रॉकी'चच पहा ना! बांधकाम कामगाराचा नेता शंकर (सुनील दत्त) रतनसेठ (अन्वर हुसेन) या कंत्राटदाराकडे कामगारांच्या जीवन विम्याची मागणी करतो. रतनसेठ जे. डी ला (रणजित) या कामगार-नेत्याला 'शांत' करण्यासाठी पैसे देतो. जे. डी. या निमित्ताने शंकरला खतम करतो आणि रतनसेठलाही खतम करून त्याची प्रॉपर्टी गिळंकृत करतो जे. डी. ला या कामी रतनसेठचा वफादार नोकर रामवतार (सत्येन कप्पू) मदत करतो. बस! पहिली उपकथा संपते.

पुढच्या कथेच्या पार्श्वभूमीसाठी या सर्वांची 'अपत्ये' मौजूद असतात. शंकरची विधवा पत्नी पार्वती (राखी) आणि तिचा मुलगा रॉकी (संजय दत्त), रतन सेठच्या जायदादची एकमेव वारीस रेणू (टीना मुनीम), जे. डी. चा खलनायक पुत्र आर. डी. (श्यामकुमार), रामवतारची मुलगी लाजवंती (रीना रॉय),

शिवाय जोडीला शंकरच्या कुटुंबाला पोसणारं अमजदखान-अरुणा इराणी यांचं कुटुंब !

झालं ! ही पात्रं कथेच्या ओघात आणण्यासाठी काही तरी निमित्ताने जवळ आणली जातात, घुसडली जातात. मग कधी काश्मीरचं निमित्त घेतलं जातं, कधी लाजवंतीवर झालेल्या बलात्काराचं, तर कधी डिस्को डान्सचं !

समज–गैरसमज यांच्या विचित्र विसंगतीमधून कथा पुढे ढकलली जाते आणि 'क्लायमक्स'चा शॉट व्हिलनच्या दरबारात साजरा होतो. 'रॉकी'च्या आईला, त्याला पोसणाऱ्या अरुणा इराणी व बहिणीला बांधून ठेवलं जातं आर. डी. जे. डी. मार्फत रेणूशी विवाहाची मागणी करतो. रॉकी येतो ढिश्यूऽऽ ढिश्यूऽऽऽ होते. दुष्टाचा पराजय, सुष्टाचा विजय होतो–अमजदखान या विजयावर प्रतिक्रिया व्यक्त करतो 'जैसा बाप वैसा बेटा !'

खरोखरच संजय दत्त हा सुनील दत्ताचीच आवृत्ती आहे. नर्गिसच्या मृत्यूच्या पार्श्वभूमीवर अनेकांनी संजय दत्ताचे तोंड भरून कौतुक केलं; पण अभिनयाची जाण ठेवणाऱ्या नर्गिसचं भान ठेवून बोललं तर संजय दत्त 'रॉकी'मध्ये अभिनयाच्याबाबतीत फार फिका पडला आहे. तो तरुण, तगडा नट जरी असला तरी त्याचा लांबट व काहीसा सुजलेला चेहरा चित्रपटाच्या 'फ्रेम'मध्ये बोजड वाटतो. कृत्रिम डायलॉगडिलीव्हरीमुळे तो अनेक दृश्यामध्ये 'ऑकवर्ड' दिसतो.

सुनीलदत्तच्या 'नालंदा' मुव्हीजची ही आपल्या मुलासाठी केलेली 'अॅड' असल्यामुळे 'रॉकी'चा दर दहा मिनिटांनी 'क्लोज अप्' घेणं अपरिहार्य ठरलं आहे आणि हेच नेमकं चित्रपटात पाहावत नाही.

स्त्री–देहप्रदर्शनासाठी हिंदीवाले कशाचा वापर करतील ते 'रॉकी'मध्ये स्पष्टपणे जाणवतं. इथे सुनील दत्तने टीना मुनीम योगसनं करतानाच दृश्य टाकून स्त्रीदेहाचं सर्व अंगांनी प्रदर्शन करण्याच्या नामी युक्तीचाच वापर केला आहे. तर लाजवंतीच्या उपकथेद्वारे तिच्यावर जे. डी कडून होणाऱ्या बलात्काराचे दृश्य टाकून बलात्कारित स्त्रीपुढील फक्त दोन पर्यायाचं समर्थन पुन्हा एकदा केलं आहे. अशा स्त्रीपुढे आत्महत्या किंवा कोठीवर नाच–गाणी करण्याचाच पर्याय हिंदीवाल्यांना दरवेळी सुचवावासा वाटतो, यातच त्यांची लपलेली पारंपारिक मूल्ये उघडी पडतात.

तेव्हा 'रॉकी'त सुनीलदत्त या निर्माता–दिग्दर्शकाला सांगायचं काहीच नाही, फक्त दाखवायचं आहे– हा माझा मुलगा बघा ! बघा, बघा तो कसं प्रेम करतो, नाचतो, उड्या मारतो–भलताच डॅशिंग आहे...!' वगैरे, वगैरे खर तर सुनील दत्तने इतर वितरक–निर्मात्यांसाठी केलेल्या 'अॅड'पलीकडे यात फारसं काही नाही. आता कौतुक करण्यासारख्या काही गोष्टी आहेत. उदा. दिलावरखान या रॉकीच्या डमीचे मोटारसायकलवरील अचाट प्रयोग; पण एवढं तेवढं बऱ्याच चित्रपटात असतं.

इथं 'बोट' दाखवावं असं काही दिसत नाही. दिसतो तो फक्त 'रॉकी !' तेव्हा बोट दाखवायचंच असेल तर गुणात्मकता नसताना आपल्या मुलांना पैशाच्या ताकदीवर पुढे आणण्याच्या या प्रवृत्तीकडे दाखवावं लागेल की जी आता फिल्मी दुनियेत पूर्णपणे फोफावली आहे.

—कलंदर

# चित्रपटाबाहेर . . .

## राष्ट्रपती पारितोषिकाचा 'तमाशा'

२३ एप्रिलला राष्ट्रपतींनी या वर्षाची राष्ट्रीय चित्रपट पारितोषिकं जाहीर केली. ज्या पारितोषिकांचा उल्लेख करून आम्ही नेहमी अभिनयाचे मोजमाप करण्याच्या फंदात पडत असतो त्या पारितोषिकांवर शिक्कामोर्तब करणाऱ्या ज्युरी ( सदस्य ) ची बुद्धिमत्ता काय असते, ते काय उचापती आणि भानगडी करतात, याचे वाभाडे नुकत्याच एका इंग्रजी साप्ताहिकाने काढले आहेत. २६ मार्च ते ६ एप्रिल या काळात पारितोषिकांसाठी मागविण्यात आलेले चित्रपट सदस्यांनी बघितले आणि ते पहात असताना त्यांनी व्यक्त केलेल्या प्रतिक्रियांचीही या साप्ताहिकाने नोंद घेतली आहे

सर्वोत्कृष्ट चित्रपटाचे पारितोषिक पटकविणाऱ्या मृणाल सेन यांच्या 'अकालेर सधाने' या चित्रपटातील एका दृश्यात एक गावकरी मी कार्ल मार्क्सची भूमिकासुद्धा केली आहे, असं चित्रपटातील दिग्दर्शकाला सांगतो. जगातील प्रत्येक गोष्टीबाबत शंका घ्या, असं म्हणणाऱ्या कार्ल मार्क्सबाबत शोभना समर्थ या ज्यूरीने शंका विचारली, 'हा कार्ल मार्क्स कोण ?' चित्रपट चालू असताना त्या अंधाऱ्या खोलीत जे. बी. टिळक या तेलगू दिग्दर्शकाने 'तो एक प्रसिद्ध लेखक होता' असं सांगण्याचा प्रयत्न केला आणि कोणी तरी कुजबुजलं 'जेम्स हॅडली चेससारखा . !'

मणी कौल यांच्या गजानन माधव मुक्तिबोध यांच्या जीवनावर आधारित 'सतह से उगता आदमी' या चित्रपटाबाबत सदस्यांनी चित्रपट चालू असतानाच, 'हा चित्रपट आहे की डाक्युमेंटरी', या न संपणाऱ्या वादावर बराच काळ वाद घातला. अनेकांना चित्रपट पाहण्याचा कंटाळा आला. १५ सदस्यांचे नेतृत्व करणारे व्ही. शांताराम या चित्रपटानंतर सदस्यांना म्हणाले की, 'मला हे समजत नाही, सरकार अशा अमूर्त चित्रपटावर पैसे का खर्च करतं ?'

'आक्रोश' व 'गहराई' चित्रपटांचे मूल्यांकन करताना या चित्रपटाऐवजी जयू पटवर्धन यांनी विजय तेंडूलकरांबाबत '२२ जून'च्या संदर्भात त्यांना आलेले अनुभव सांगितले

हे सर्व २६ मार्च ते ६ एप्रिल दरम्यान घडलं. आणखीही बरंच काही घडलं; पण त्याआधी व्ही. शांताराम यांनी नेतृत्व स्वीकारताना काही अटी घातल्या होत्या, त्याचा परिणामही काही पारितोषिकांवर झाला. २८ वर्षांनंतर प्रथमच व्ही. शांताराम यांनी 'व्हेटो'चा अधिकार व हे सर्व मुंबई मुक्कामी घडेल, अशी नेतृत्व स्वीकारताना अट घातली आणि केंद्रीय माहिती व नभोवाणीमंत्री वसंत साठ्यांनीही बिनबोभाटपणे ती मान्य केली.

त्यामुळं झालं एवढंच की, शांताराम यांच्या आग्रहापोटी काही चित्रपट निरर्थक ठरले, काहींची वाट लागली गेली, काही

चित्रपट ' म्हणूनही मान्य ठरले नाहीत.

सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचं पारितोषिक देताना सुहासिनी या तामीळ चित्रपटातील अभिनेत्रीला आठ सदस्यांनी निवडलं, तर ' चक्र '-मधील भूमिकेसाठी स्मिता पाटीलला व्ही. शांतारामसह सात सदस्यांनी निवडलं. शेवटी ' व्हेटो ' चा अधिकार वापरून स्मिता पाटीलला पारितोषिक मिळालं.

तेव्हा कलात्मकता तपासतानासुद्धा ' बहुमताला ' बळी पडणाऱ्या लोकशाहीची इथेही जपणूक होते आहे, हे पाहून सर्वांनाच समाधान वाटेल. आता यापुढे ही पारितोषिकं देताना ' चित्रपट का चांगला आहे ' याची चर्चा करण्यास सदस्यांना संधी न देता चित्रपट पाहून झाला की त्यांच्यापुढे मतपेटी फिरवावी आणि मग या पेटीतून ज्याचे नशीब फळफळेल त्याला पारितोषिकाचा मानकरी ठरविण्याचा प्रघात पाडला जावा, अशी सूचनाही आम्हाला करावीशी वाटते. अर्थात् हेही बहुमताच्या लोकशाहीचा आब ठेवूनच !

## वॉन्टेड अमिताभ

फिल्म दुनियेत सध्या एकाच प्रश्नाने सर्वांना वैताग आणलाय. तो म्हणजे 'डेट प्रॉब्लेम'. सेल व्हॅल्यू असलेल्या लोकप्रिय नट-नट्यांच्या तारखा मिळविणे, त्या मिळाल्या तर त्यांची इतर कलाकारांच्या तारखांशी संमती लावणे अथवा अतिशय बेमुमानपणे ' या तारखा कॅन्सल करा' असा फोन येऊ न देण्यासाठी या नटांच्या पी. ए. ची सरबराई करणे. तेव्हा चंदेरी तारे–तारकांपेक्षा तारखांचं महत्त्व सध्या वाढलं आहे.

' मल्टीस्टार कास्ट' चित्रपट काढण्याच्या नादात निर्माते– दिग्दर्शक घायकुतीला आले आहेत आणि वितरक–अर्थदाते काखा वर करू लागले आहेत. या ' प्रेशिअस तारखांची' जुळणी योग्य प्रकारे करणाराच या अनिश्चित उद्योगात आज यशस्वी निर्माता गणला जात आहे.

तर, या 'डेट प्रॉब्लेम' चं भयानक स्वरूप स्पष्ट करणारी एक जाहीरात फिल्म उद्योगाच्या ' ट्रेड गाईड' मध्ये प्रसिद्ध झाली आहे. ' वॉन्टेड अमिताभ' या शीर्षकाखाली देण्यात आलेल्या जाहिरातीत काकुळतीला आलेल्या अनेक निर्मात्यांनी ' अमिताभ'ला पकडून देण्याची (अर्थात जिवंत) विनंती केली आहे... त्यांच्या चित्रपटांसाठी !

' डेट प्रॉब्लेम'च्या स्वरूपाबाबत बोलताना राजकपूरनेही नुकतीच एका मुलाखतीत खंत व्यक्त केली आहे. राजकपूरसारखा निष्णात धंदेवाईक म्हणतो की, 'सत्यम, शिवम, सुंदरम ' या चित्रपटाच्यावेळी माझा सख्खा भाऊ शशीकपूरच्या डेटस मिळणं मुश्कील झालं होतं, तर माझा मुलगा (तोही सख्खा) ऋषीकपूरनेही मला तारखांबाबत बराच त्रास दिला !'


प्रत्यक्ष घरच्या मंडळींकडून झालेल्या त्रासाने उद्विग्न झालेल्या राजकपूर म्हणतो ' नट-नट्या कलाकार नसून 'टॅक्स्या ' आहेत !' राजकपूर म्हणतो ते खरंच आहे. ज्याच्यावळ पैसे आहेत ते मीटर पाडून 'टॅक्सी'ने जाऊ शकतात; बाकीचे नुसते हात हलवत बसतात!

अमिताभ बच्चन, शशीकपूर, जितेंद्र आणि ऋषी कपूर किंवा कोणताही ' सेल व्हॅल्यू ' असलेला नट चित्रपटासाठी हवा असेल तर फक्त तुम्ही त्याला सांगा ' माझ्या चित्रपटात सहा गाणी, दहा मारामारीची दृश्यं आणि एक ड्रॅमॅटिक सीन ! शिवाय, तुला हवी ती नटी (रेखा किंवा परवीन) आणि ऑफकोर्स, पहिला हप्ता ...' बस एवढं केलं की ही टॅक्सी तुम्ही तुम्हाला पाहिजे तशी वळवू शकता !

वेळोवेळी तो म्हणेल तशी मान हलवली आणि तो सांगेल तसं तुम्ही केलं, अर्थात त्याचबरोबर पैशाचा पुरवठा सातत्याने केला तर 'डेट प्रॉब्लेम इज नॉट प्रॉब्लेम', असं एका निर्मात्याचं म्हणणंही खोटं ठरत नाही ते यामुळंच !

—बिलंदर


# तिसरी आवृत्ती



# सांगत्ये ऐका

रसिकांची, समीक्षकांची,
सर्वसामान्य वाचकांची
मान्यता लाभलेले
हंसा वाडकर यांचे
अनोखे आत्मचरित्र

किंमत : बारा रुपये

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

**MANOOS** (Marathi Weekly) **100 Paise** Regd. No. PNC–W 28
(Licensed to post without prepayment of postage–No. 11)


# सुशिक्षित बेकाम

आपल्या देशापुढील
एक प्रचंड प्रश्न



देशातील कल्पक आणि जिद्दी तरुणांना
महाबँक व्यवसाय मार्गदर्शन आणि अर्थसहाय्य करते.
अधिक माहितीसाठी आपल्या नजिकच्या
आमच्या शाखेस आजच भेट द्या.

बँक ऑफ महाराष्ट्र
(भारत सरकारचा उपक्रम)

मुख्य कचेरी: लोकमंगल १५०१ शिवाजीनगर पुणे - ४११ ००५

बँकिंग सेवा
व्यक्तिगत जिव्हाळा.

NAWADKAR